बाब क्र. १

अधिसभा १५ मार्च, २०२२

# मुंबई विद्यापीठ

# अधिसभा इतिवृत्त

दिनांक ७ व ८ ऑक्टोबर, २०२१

# मुंबई विद्यापीठ

मसुदा                                                                 अधिसभा इतिवृत्त

क्र.२/२०२१-२२                                                    दि. : ७ व ८ ऑक्टोबर, २०२१

अधिसभेची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक ७ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु झाली. तसेच सदर सभा शुक्रवार दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठाच्या सर कावसजी जहाँगीर हॉल (दीक्षांत सभागृह) मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे पुन्हा सुरु झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती ०७/१०/२०२१ | उपस्थिती ०८/१०/२०२१ |
|---|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) (अध्यक्ष) | उपस्थित | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र- कुलगुरू) | उपस्थित | उपस्थित |
| ३. | प्रा. (डॉ.) राजेश खरात | उपस्थित | उपस्थित |
| ४. | प्रा.(डॉ.) अनुराधा मजुमदार | उपस्थित | उपस्थित |
| ५. | प्राचार्य (डॉ.) अजय भामरे | उपस्थित | उपस्थित |
| ६. | प्राचार्य (डॉ.) अनिता आनंद मोहन स्वामी | उपस्थित | उपस्थित |
| ७. | डॉ. विनोद पाटील | उपस्थित | उपस्थित |
| ८. | डॉ.(सीए.)प्रदीप कामथेकर (प्र. वित्त व लेखा अधिकारी) | उपस्थित | उपस्थित |
| ९. | प्राचार्य. (डॉ.) किशोर सुखटणकर | उपस्थित | अनुपस्थित |
| १०. | डॉ. सुचित्रा नाईक | उपस्थित | उपस्थित |
| ११. | डॉ. समीर कुलकर्णी | उपस्थित | उपस्थित |
| १२. | डॉ. सोनाली रोडे, उ.शि.सं. संचालकांचे प्रतिनिधी | उपस्थित | उपस्थित |
| १३. | श्री. प्रमोद नाईक, तं.शि.सं. संचालकांचे प्रतिनिधी | उपस्थित | उपस्थित |
| १४. | श्रीमती ॲन्ड्रीआ पिंटो | उपस्थित | उपस्थित |
| १५. | डॉ. सुनिल पाटील | उपस्थित | उपस्थित |
| १६. | डॉ. मोहन आमृळे | उपस्थित | उपस्थित |
| १७. | प्राचार्य (डॉ.) विठ्ठल सुबराव शिवणकर | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १८. | प्राचार्य शाम रघुनाथ जोशी | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १९. | प्राचार्य (डॉ.) तुषार मोहन देसाई | अनुपस्थित | अनुपस्थित |
| २०. | प्राचार्य (डॉ.) नागेन्द्रनाथ बेचन पांडे | अनुपस्थित | अनुपस्थित |
| २१. | प्राचार्य (डॉ.) अनुजा नारायण पळसुलेदेसाई | उपस्थित | उपस्थित |
| २२. | प्राचार्य विठ्ठल बळीराम रोकडे | उपस्थित | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| २३. | प्राचार्य (डॉ.) महादाप्पा गंगाराम गोंडा | उपस्थित | उपस्थित |
| २४. | प्राचार्य धनाजी शंकर गुरव | उपस्थित | उपस्थित |
| २५. | श्री. हृषिकेश गजानन पोळ | अनुपस्थित | अनुपस्थित |
| २६. | श्री. संजय बाबुराव शेटे | उपस्थित | अनुपस्थित |
| २७. | ॲड. निल गिरीश हेळेकर | उपस्थित | उपस्थित |
| २८. | श्री. हसमुख देवजी राम्भिया | उपस्थित | उपस्थित |
| २९. | श्रीमती शिल्पा शशिकांत पटवर्धन | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ३०. | डॉ. सुभाष कृष्णा वाघमारे | उपस्थित | अनुपस्थित |
| ३१. | प्रा. वैभव एकनाथ नरवडे | उपस्थित | अनुपस्थित |
| ३२. | डॉ. अनंत नाना लोखंडे | उपस्थित | उपस्थित |
| ३३. | डॉ. चंद्रशेखर सदानंद कुलकर्णी | उपस्थित | उपस्थित |
| ३४. | डॉ. निशा मनोज मुनी | अनुपस्थित | उपस्थित |
| ३५. | डॉ. गुलाबराव बापू राजे | उपस्थित | उपस्थित |
| ३६. | श्री. रविकांत बाळकृष्ण सांगुर्डे | उपस्थित | उपस्थित |
| ३७. | डॉ. रविंद्रनाथ सोन्याबापू रसाळ | उपस्थित | उपस्थित |
| ३८. | श्री. प्रकाश दामोदर दातार | उपस्थित | उपस्थित |
| ३९. | डॉ. आरती प्रसाद | उपस्थित | अनुपस्थित |
| ४०. | डॉ. सुरेश नामदेव मैंद | उपस्थित | उपस्थित |
| ४१. | डॉ. संगीता निवृत्ती पवार | उपस्थित | उपस्थित |
| ४२. | डॉ. मृदुल जगन्नाथ निळे | उपस्थित | उपस्थित |
| ४३. | श्री. महादेव बापूराव जगताप | उपस्थित | उपस्थित |
| ४४. | श्री. प्रदीप बाळकृष्ण सावंत | उपस्थित | उपस्थित |
| ४५. | श्री. प्रविण महदेव पाटकर | उपस्थित | उपस्थित |
| ४६. | डॉ. सुप्रिया गजानन करंडे | उपस्थित | उपस्थित |
| ४७. | श्री. मिलिंद हरिश्चंद्र साटम | उपस्थित | उपस्थित |
| ४८. | श्रीमती शितल स्वप्निल देवरुखकर-शेठ | उपस्थित | उपस्थित |
| ४९. | श्री. निखील यशवंत जाधव | उपस्थित | उपस्थित |
| ५०. | डॉ. धनराज नीलकंठ कोहचाडे | उपस्थित | उपस्थित |
| ५१. | श्री. शशिकांत काशिनाथ झोरे | उपस्थित | उपस्थित |
| ५२. | श्री. राजन वसंत कोळंबेकर | उपस्थित | उपस्थित |
| ५३. | श्री. मंदार सावंत-देसाई | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५४. | श्री. रविंद्र प्रभूदेसाई | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५५. | श्री. धनेश सावंत | उपस्थित | उपस्थित |
| ५६. | श्री. जहांगीर सेथना | अनुपस्थित | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७. | डॉ. डी. पी. मेहता | उपस्थित | उपस्थित |
| ५८. | ॲड. वैभव थोरात | उपस्थित | उपस्थित |
| ५९. | फादर मॅगी मुर्झेलो | उपस्थित | उपस्थित |
| ६०. | श्री. दिपेश मेहता | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ६१. | श्री. राजीव काशीकर | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ६२. | श्री. सुधाकर शंकर तांबोळी | उपस्थित | उपस्थित |
| ६३. | श्री. रुपेश मालुसरे | उपस्थित | अनुपस्थित |
| ६४. | श्री. साहेबराव घुले | उपस्थित | उपस्थित |
| ६५. | ॲड. अनिल परब (वि.प.सं.) | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ६६. | प्रा. बळीराम गायकवाड (प्रभारी कुलसचिव) | उपस्थित | उपस्थित |

सभेची सुरुवात वंदे मातरम् या गीताने झाली.

**श्रद्धांजली :**

महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि कला इत्यादी क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्तींचे निधन झाल्यामुळे समाजाचे व विद्यापीठाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे, असे निवेदन प्रा. बळीराम गायकवाड, प्रभारी कुलसचिव यांनी केले व श्रद्धांजली प्रस्ताव मांडला.

श्री. आनंद अंतरकर, श्री. रॉबी डिसिल्वा, श्री. जयंत पवार, श्री. सदाशिव साठे, श्री. वासू परांजपे, श्री. सुनिल यादव, श्री. चंदन मित्रा, श्री. सिद्धार्थ शुक्ला, डॉ. त्रि. ना. धर्मधिकारी, श्रीमती अरुणा भाटीया, श्री. शरद भाटे, श्री. केसरीनाथ पाटील, श्री. ऑस्कर फर्नांडीस, श्री. प्रकाश येवारे, श्रीमती आशा गांधी, प्रा. टी. पद्मनाभन, श्री. सीताराम काकतकर, श्री. शरद रणपिसे, श्रीमती कमला भसीन, डॉ. राम बारोट, श्री. कुमार गोखले, श्री. सदाशिव निंबाळकर, श्री. द. मा. मिरासदार, श्री. डी. आर. धनुका, श्री. घनश्याम नायक या सर्व महनिय व्यक्तींनी देशासाठी व विविध संस्थांसाठी अनमोल योगदान दिले आहे.

वरील सर्व मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तद्नंतर नियमित कामकाजाला सुरुवात झाली.

**स्वागत आणि अभिनंदन :**

मा. कुलगुरू यांनी खालील सदस्यांची प्रथम बैठक असल्याने त्यांचे हार्दिक अभिनंदन केले व त्यांच्याकडून विद्यापीठाला लाभ होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

१. डॉ. सुचित्रा नाईक (प्रभारी संचालक, ठाणे उपपरिसर)

२. श्रीमति ॲन्ड्रीआ अ. पिंटो (प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र)

श्री. संजय शेटे यांनी मा. कुलगुरू व त्यांचे सर्व सहकारी, सर्व सिनेट सदस्य, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नॅक मुल्याकंन यशाबद्दल अभिनंदन केले आणि सर्वांनी त्यांचा सन्मान करावा अशी सभागृहाला विनंती केली.

प्रा. गुलाबराव राजे यांनी श्री संजय शेटे सरांच्या ठरावाला अनुमोदन दिले.

मा. कुलगुरूंनी सर्व सहाका-यांच्या आणि ज्यांनी ज्यांनी या मुल्यांकनास सहकार्य केले, अशा सर्वांच्यावतीने अभिनंदनाचा स्विकार केला. ब-याच अडचणी कोरोनामुळे आल्या पण सर्व अडचणींवर मात करून सर्वांनी जे सहकार्य केल्याबद्दल मा. कुलगुरूंनी सर्वांचे आभार मानले. पूर्ण भारतामध्ये नविन पद्धतीने जे मुल्यांकन होत आहे त्यात मुंबई विद्यापीठ ७ वे आहे आणि त्या निमीत्ताने विद्यापीठाची इच्छा आहे की, हे मुल्याकंन मिळाल्याबद्दल अधिसभेच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याचाही यथोचित सत्कार करावा म्हणुन या अधिसभेची सुरुवात होण्याअगोदर मा. कुलगुरूंनी सर्वांना मुंबई विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह देवून गौरविले.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी सभागृहातील सर्व उपस्थित सर्व सदस्य, अध्यक्ष, कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा नियत्रंक यांचे अभिनंदन केले आणि मुंबई विद्यापीठ अधिक सक्षम आणि कार्यकुशल होण्यासाठी प्रयत्न करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

मा. प्र-कुलगुरू यांनी एन.आर.एफ. ची प्रक्रिया विशद केली. मुंबई विद्यापीठ २०१७-१८ मध्ये १८० व्या स्थानाच्या आसपास होते. त्यानंतर आपण सातत्याने सुधारणा करून पहिल्या १०० मध्ये स्थान मिळवले व हि कायम स्थिती राखली आहे. यावेळीस आपले स्थान ९६ झाले आहे. आत्ताची येणारी रॅकिंग आपण ऑक्टोबरमध्ये प्रस्तुत करणार आहोत. मुंबई विद्यापीठ जे आता प्रस्तुत करणार आहे त्यात नॅकच्या गुणांचाही समावेश होईल. येणा-या काळामध्ये मुंबई विद्यापीठ अव्वल स्थानी असेल असे अधिसभा सदस्यांना आश्वासित केले.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी विद्यापीठाचे कर्मचारी, अधिकारी वर्ग, सहायक कुलसचिव, उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठाचे विभाग संचालक यांचाही सत्कार करावा, अशी सूचना केली.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी स्थायी आणि अस्थायी कर्मचाऱ्यांचाही सत्कार करावा अशी सूचना केली.

श्री. प्रदिप सावंत यांनी विद्यापीठाने राजकिय दबावाला बळी पडून मास्टर दिनानाथ मंगेशकर संगीत महाविद्यालयाला जागा देण्यासदंर्भात दिरंगाई केली म्हणून काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला.

श्री. रविकांत सांगुर्डे आणि श्री. प्रदीप सांवत यांनी सांगितले कि, विद्यापीठ कुलसचिव पदासाठी आपल्याच विद्यापीठातील उपकुलसचिव आणि सहायक कुलसचिव यांचा विचार करावा.

डॉ. धनराज कोहचाडे यांनी विद्यापीठामध्ये जवळपास २०० प्राध्यापकांच्या जागा रिक्त असताना सुध्दा विद्यापीठाला नॅकचे नामांकन कसे मिळाले त्याची चौकशी केली जावी, असे सांगितले.

मा. कुलगुरू यांनी सभागृहाला नॅकची गुणांकन पद्धत सांगितली. प्रत्येक गोष्टीला गुण असतात आणि तशा पध्दतीने गुण दिलेले आहेत आणि काही शंका असतील तर प्र-कुलगुरू किंवा कुलगुरू यांना प्रत्यक्ष येवून भेटून विचारा, अशी सूचना केली.

प्रभारी कुलसचिवांनी विद्यापीठातील काही उल्लेखनीय बाबी मांडल्या.

<u>१२ मार्च २०२१ ते ७ ऑक्टोबर २०२१ काळातील काही उल्लेखनिय बाबी :</u>

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम शैक्षणिक सुविधा आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी मुंबई विद्यापीठाने सिंधुदुर्ग मधील सावंतवाडी येथे उप- परिसराची स्थापना केली. १२ सप्टेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल तथा कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते.

२. देशातील अग्रगण्य विद्यापीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई विद्यापीठाला नॅककडून 'अ++' श्रेणीचा दर्जा बहाल करण्यात आला आहे. राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्ययन परिषदेकडेकडून (नॅक) मुंबई विद्यापीठास ३.६५ सी.जी.पी.ए. गुणांकन देण्यात आले आहे. नॅककडून सर्वाधिक गुण मिळवणारे मुंबई विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

३. मुंबई विद्यापीठात पहिल्यांदाच सर्व शैक्षणिक विभागांतील पदव्यूत्तर अभ्यासक्रमांचे प्रवेश हे केंद्रीय पद्धतीने करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला. विद्यापीठाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने यासाठी ऑनलाईन प्रवेश प्रणाली तयार केली आहे. विद्यापीठातील विविध विद्याशाखानिहाय राबविण्यात येणाऱ्या एकूण ४८ पदव्यूत्तर अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रिया या प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली.

४. मुंबई विद्यापीठातील मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी; आधीचे अर्थशास्त्र विभागाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. १ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी १०:३० वाजता आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी डॉ. कृष्णमूर्ती सुब्रमण्यम, मुख्य आर्थिक सल्लागार, भारत सरकार यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय "पोस्ट कोव्हिड इकोनॉमिक रिफॉर्म्स" हा होता.

५. शरीरसौष्ठत्व, विविध खेळ आणि त्यातील करीअरच्या संधी यासह आरोग्यदायी समाज घडविण्याच्या हेतूने मुंबई विद्यापीठात लवकरच "सेंटर ऑफ एक्सलेंस इन

स्पोर्ट्स सायन्स अँड मॅनेजमेंट" या केंद्राची स्थापना करण्यात येत आहे. नुकत्याच पार पडलेल्या क्रीडा मंडळाच्या बैठकीत यास मान्यता देण्यात आली. मुंबई विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी क्रीडा शास्रातील शास्त्रोक्त अध्ययन आणि व्यवस्थापनाचे धडे गिरविण्यासाठी या केंद्राची भूमिका महत्वाची असणार आहे.

६. मुंबई विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील महाड आणि चिपळूण येथे झालेल्या अतिवृष्टिमुळे आणि उद्भवलेल्या पूरपरिस्थितीमुळे अनेकांवर संकटकालिन परिस्थिती ओढवली होती. अशा परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत मुंबई विद्यापीठाने महत्वाचे पाऊल उचलून गरजवंताना अन्नाचे वाटप करण्यासाठी महाड येथे हिरवळ महाविद्यालयाचे व्यवस्थापन यांच्या सहकार्याने व मुंबई विद्यापीठ आणि डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूण यांच्या सहकार्यांने दुसरे 'कम्युनिटी किचन' सुरु केले. मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि विद्यार्थी विकास विभागाने याकामी पुढाकार घेतला होता.

७. मुंबई विद्यापीठाच्या १६५ व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ आणि लायन्स क्लब ऑफ मिलेनियम यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. सुहास पेडणेकर, प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांच्यासह विविध प्राधिकरणांच्या सदस्यांच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्र-कुलगुरू प्रा.रविंद्र कुलकर्णी यांच्यासह ४२ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

८. मुंबई विद्यापीठाच्या १६५ व्या वर्धापन दिनानिमित्त लोकसभेचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे "विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत विद्यापीठांचे स्थान" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर, प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी, प्रभारी कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांच्यासह विविध प्राधिकरणातील सदस्य उपस्थित होते.

९. 'प्रश्न विद्यार्थ्यांचे उत्तर कुलगुरूंचे' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांकडून प्रश्न मागविण्यात आले होते. अनेक प्रश्नांची समर्पक उत्तरे कुलगुरूंनी दिली. सहा हजाराहून अधिक विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

१०. मुंबई विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांमध्ये संशोधनवृत्तीला चालना आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी लघु संशोधन प्रकल्पांना आर्थिक सहाय्य म्हणून मुंबई विद्यापीठाने पहिल्या टप्प्या अंतर्गत एकूण मंजूर

निधीच्या ७० टक्के निधी म्हणजेच २ कोटी ९४ लाख ५४ हजार निधी लघु संशोधन प्रकल्पासाठी मंजूर केला. शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी विविध शाखांतर्गत शिक्षकांनी सादर केलेल्या प्रकल्पांपैकी एकूण ११७९ लघु संशोधन प्रकल्पांसाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे.

११. मुंबई विद्यापीठात या शैक्षणिक २०२१-२२ वर्षापासून "आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरीक अध्ययन" विभागाची सुरुवात करण्यात आली आहे. लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या हस्ते या केंद्राचे उदघाटन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरीक अध्ययन क्षेत्रात अभ्यास आणि संशोधनाचे मोठे दालन यानिमित्ताने उपलब्ध होणार आहे.

१२. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिवस हा स्वराज्याची, सार्वभौमत्वाची आणि स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. याच दिनाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र व प्रा. बाळ आपटे विद्यार्थी आणि युवा चळवळ अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "शिवस्वराज्य दिन" हा कार्यक्रम आभासी पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला.

१३. मुंबई विद्यापीठात नविन दोन जैव-विविधता उद्याने तयार होत आहेत. घाणेरी, जास्वंद, मोगरा, कणेर, चांदणी, जमाईकन, स्पाईक लिंबू, गाल्पेनिआ, अबोली, पेव, कृष्णकमळ, पेंटास हॅमेलिया इक्झोरा, सोनचाफा, अर्जून, तूती आणि कोलियस अशा विविध प्रजातींची सुगंधी आणि शोभेच्या रोपांची लागवड मुंबई विद्यापीठाच्या मरीन ड्राईव्ह उपपरिसर आणि कलिना परिसरामध्ये करण्यात आली. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने दोन्ही परिसरात सुमारे एक हजार रोपांची लागवड करण्यात आली आहे. मरिन ड्राईव्ह उपपरिसर येथील सुमारे चार हजार चौरसफूट आणि कलिना परिसरातील पाच हजार चौरसफूट जागेवर एक ते दीड महिन्यांच्या कालावधीत दोन्ही परिसरात फुलपाखरू उद्याने तयार होतील.

१४. मुंबई विद्यापीठाच्या बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र प्रा. बाळ आपटे सेंटर फॉर स्टडीज इन स्टूडंट अँड यूथ मुव्हमेंट आणि आयकेअर यांच्या सयुंक्त विद्यमाने 'ऑनलाईन अवेरनेस अँड ट्रेनिंग कॅंपेन ऑन सडन कार्डियाक अरेस्ट' या विषयावर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये भारतातील प्रसिध्द हृदयरोग तज्ज्ञ डॉ. यश लोखंडवाला यांच्यासह प्रसिध्द हृदयरोग तज्ज्ञ डॉ. ब्रायन पिंटो, हेल्थ सायकोलॉजिस्ट, डॉ. किंजल गोयल, प्रशिक्षक सुमया राघवन, आनंद श्रीवास्तव, सह-पोलिस आयुक्त कायदा व सुव्यवस्था, श्री. विश्वास नांगरे पाटील, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर, प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी, प्रभारी कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, प्राचार्य डॉ. अजय भामरे यांच्यासह विविध प्राधिकरणाचे सदस्य उपस्थित होते.

१५. मुंबई विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या वतीने बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने 'भगवान बुद्धांची विश्वाला देणगी' या विषयावर

प्रा. दामोदर मोरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या प्रसंगी डॉ. हूबनाथ पांड्ये यांनी संपादित केलेले 'कबीर विमर्श' या पुस्तकाचे मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मागील वर्षी संत कबीर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वेबिनारमध्ये ज्या संशोधकांनी संशोधन पत्रिका सादर केले होते. त्यावर आधारीत मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. राजेश खरात यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

१६. दिनांक २० मे २०२१ रोजी मुंबई विद्यापीठात नव्याने स्थापन झालेले साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले, उद्घाटक म्हणून ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस होते. आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार सामाजिक कार्यकर्ते व साप्ताहिक विवेकचे सहकार्यकारी संपादक श्री. रविंद्र गोळे हे होते.

१७. मुंबई विद्यापीठातर्फे आभासी पद्धतीने ६१ व्या महाराष्ट्र राज्य वर्धापन दिनानिमित्त सयुंक्त महाराष्ट्र चळवळीचे गाढे अभ्यासक आणि ज्येष्ठ संशोधक तथा शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. अशोक चौसाळकर यांच्या व्याखानाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रभारी कुलसचिवांनी दिनांक १२ व १३ मार्च, २०२१ रोजी झालेल्या वार्षिक अभिसभेच्या सभेचे इतिवृत्त अधिसभेसमोर मंजूरीसाठी सादर केले.

ॲड. नील हेळेकर यांनी सांगितले कि बाब क्र. १ हे सभेचे इतिवृत्त लिहिण्यासाठी समिती गठित केलेली होती. समितीने अतिशय चोख काम पार पाडले आणि हे कठिण काम सोपं करून दिले. प्राचार्य विठ्ठल रोकडे, डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी, श्रीमती शीतल शेठ-देवरुखकर या सन्माननिय सदस्यांचे आभार मानले. सभेचे इतिवृत्त लिहिण्यासाठी आपण तंत्रज्ञानाचा वापर केला तर होणरा उशीर टाळता येईल. ॲड. नील हेळेकर यांनी सर्व सभागृहाला विनंती केली की, तत्रंज्ञानाचा अधिकाधिक वापर करून हा वेळ आपण कमी करू शकू.

डॉ. सुप्रिया करंडे आणि श्री. रविकांत सांगुर्डे यांनी ॲड. नील हेळेकर यांच्या प्रस्तावाला अनुमोदन दिले.

मा. कुलगुरूंनी या संदर्भात सभागृहाची संमती घेण्यासाठी सुचविले कि, कार्यसूची, कार्यवाही अहवाल, इतिवृत या सर्वांच्या छापील प्रती खूप मोठ्या होत आहेत. या ब-याचशा गोष्टी डिजीटल फॉर्ममध्ये पाठवता येतील. पेपरलेस कारभार हे एक आपल स्वप्न आहे, कमीत-कमी पेपरचा वापर करून अधिकाधिक डिजीटल पद्धतीने काम करावे. अधिसभा जशी संमती देईल तसे पुढचे प्रयोजन करता येईल.

ॲड. नील हेळेकर आणि डॉ. धनराज कोहचाडे यांनी मा. कुलगुरूंच्या प्रस्तावाला अनुमोदन दिले आणि अधिसभेचे व्यवहार जास्तीत जास्त डिजीटल करावे असे सुचविले.

प्रभारी कुलसचिव यांनी सदर प्रस्तावाची नोंद घेतली.

डॉ. सुप्रिया करंडे, डॉ. धनराज कोहचाडे आणि ॲड. वैभव थोरात यांनी पत्राचे उत्तर व्यवस्थापनाकडून वेळेवर मिळत नाही, म्हणून नाराजी व्यक्त केली.

प्रा. गुलाबराव राजे आणि श्री. राजन कोळंबेकर यांनी देखील मागील बैठकीचा उल्लेख करून विद्यापीठाकडून कागदपत्रे मिळाली तर अभ्यास करून बैठकीला उपस्थित राहता येईल, असे सुचविले.

डॉ. सुप्रिया करंडे आणि श्री. सुधाकर तांबोळी यांनी व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मिळावे म्हणुन आग्रह धरला असता त्याला उत्तर देतांना मा. प्र-कुलगुरूंनी सांगितले की, सर्व माहिती आणि इतिवृत्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. कुलगुरूंनी सूचना दिल्या की, यापुढे अधिकाधिक लवकरात लवकर या डिजीटल फॉर्ममध्ये, ईमेल फॉर्ममध्ये सर्व सदस्याना माहिती पाठवावी. त्याच्यासाठी आवश्यक ती यंत्रणा ही सुरवात झालेली आहे आणि ती अतिशय चांगल्या पध्दतीने त्याचे नियोजन होईल, असे करावे.

ॲड. वैभव थोरात यांनी गेल्या ४ वर्षातील उत्तरे प्रलंबित असल्याची तक्रार केली असता प्रभारी कुलसचिवांनी व्यक्तिगत लक्ष घालण्याचे आश्वासन दिले.

श्री. प्रविण पाटकर यांनी विद्यापीठाच्या कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षण सत्र घेणे आवश्यक आहे, असे सुचविले.

ॲड. वैभव थोरात यांनी पेट आणि संशोधन व मान्यता समिती संदर्भात जी मागणी केली होती आणि त्याच्यावर प्र-कुलगरूंनी जे उत्तर दिले होते त्याचा कोणताही उल्लेख इतिवृत्तामध्ये किंवा कार्यवाही अहवालामध्ये आलेला नाही आहे, अशी तक्रार केली.

श्री. गुलाबराव राजे, श्री. सुधाकर तांबोळी, डॉ. अनंत लोखंडे आणि डॉ. वैभव नरवडे यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे नियत्रंण करणारी विद्यापीठ ही एकमेव संस्था नसून डी.टी.ई., ए.आय.सी.टी.ई. सुद्धा समाविष्ट असल्याने आज आपण स्मरणपत्र देवूनसुद्धा डी.टी.ई. चे कोणीही अधिकारी वेतन न होणे, अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या समस्या या प्रश्नांसंबंधी उत्तर न देण्यास उपस्थित नसल्याने तक्रार केली.

प्रभारी कुलसचिवांनी डी.टी.ई. प्रतिनिधी दुपारी अधिसभेत येणार असल्याचे सांगितले.

डॉ. रविंद्रनाथ रसाळ यांनी कुलसचिवांमार्फत तातडीने श्री. अभय वाघ यांना बोलावून घ्यावे ते नामनिर्देशित सदस्य असल्याने त्यांनी स्वतः उपस्थित राहिले पाहिजे असे सांगितले. या विनंतीला दुजोरा देताना श्री. सुधाकर तांबोळी यांनी याबाबतचे अनुभव कथन करताना सदर अधिकारी (डी.टी.ई.) कार्यालयामध्ये कधीच भेटत नसल्याचे सांगितले. याच विषयावर डॉ. राजे यांनाही बोलायचे होते पण मा. अध्यक्षांनी

याविषयी सविस्तर उत्तर देण्याची मागणी स्विकारून सदस्यांनी कृपया नियमावलीचे पालन करून सहकार्य करण्याची विनंती केली. एकच मुद्दा अनेकजण बोलत असल्याचेही त्यांनी सांगितले. श्रीमती शितल देवरूखकर-शेठ यांनी त्या गोष्टी महामहिम राज्यपाल महोदायांना लेखी स्वरुपात कळवाव्या आणि त्याची एक-एक प्रत सदस्यांना पाठवावी अशी विनंती केली. यावर अध्यक्षांनी पुन्हा पुन्हा तेच तेच मुद्दे मांडू नका असे आग्रहपूर्वक सांगितले, तसेच संचालक हे विद्यापीठाच्या अधिपत्याखाली नसल्याने त्यांना कुलगुरू या नात्याने आदेश देता येत नाही. तसेच प्रत्येकाला हवे ते बोलायला देणे हे अडचणीचे ठरेल हे कृपया समजून घ्या, असे सांगितले.

सभागृहाला दिलेली आश्वासने पाळली जात नाहीत हे देखिल महामहिम राज्यपालांना कळवावे असा मुद्दा ॲड. वैभव थोरात यांनी मांडला.

श्री. प्रदिप सावंत यांनी, गतकाळातील बृहत आराखडा बाजुला ठेवून शासनाने युतीच्या काळात आपल्या पद्धतीने तो मंजूर केला होता आणि महामहिम राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिले परंतू विद्यापीठाने त्यासंदर्भात पाठपुरावा केला नाही, या संदर्भातली माहितीही राजभवनला पाठवावी अशी मा. अध्यक्षांना विनंती केली.

डॉ. गुलाबराव राजे यांनी दोन मुद्दे उपस्थित केले.

१. कोरोना काळामध्ये विद्यार्थ्यांच्या कमी झालेल्या संख्येबद्दल विद्यापीठाने माहिती देणे अपेक्षित होते, परंतु तसे झाले नाही.

२. विद्यापीठाकडून अधिसभा सदस्यांना जी कागदपत्रे पाठविली जातात ती फार उशिराने मिळतात, त्या संदर्भात मनुष्यबळाच्या कमतरतेबाबत काय उपाययोजना केल्या हे समजले पाहिजे. अन्यथा प्रत्येक वेळी हे उशिरा मिळत जाईल म्हणून याबाबत चर्चा करून उत्तर द्यावे.

मा. प्र-कुलगुरूंनी उपरोक्त प्रश्नांच्या उत्तरादाखल माहिती दिली. कोरोनाचा परिणाम म्हणून प्रवेश नोंदणी कमी झाली होती, परंतू तो तात्कालिक परिणाम होता. निकालांची टक्केवारी आता जास्त असल्याने म्हणजे ७०% ऐवजी ९५% आणि १२वी ९८% अशी स्थिती असल्याने जादा तुकड्या आणि जादा संख्यांची मागणी होताना दिसत आहे. दुसरे असे की मधल्या काळात आपण ५०% क्षमतने कर्मचारी कामावर होते, आता पूर्णांशाने झालेले असल्याने कामाचा वेग वाढेल.

श्री. राजन कोळंबेकर यांनी भवन्स महाविद्यालय, गिरगाव येथील विद्यार्थ्यांचे फॉर्म उशिरा पाठवले तर अंधेरीच्या भवन्स महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या जादा जागा भरण्याची क्षमता ओलांडून जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, अशी तक्रार मांडली. श्री. प्रदीप सावंत यांनी यासंदर्भात बोलताना ॲडमिशन मॉनिटरिंग समितीचे काम बंद पडलेले आहे. विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयांकडून शिक्षण सहसंचालक त्याची माहिती मागवून घेत आहेत. परंतु विद्यापीठाने आश्वासन देऊनही समित्या पाठविल्या नाहीत.

डॉ. प्रकाश दातार यांनी गेल्यावर्षीच नाही तर त्याआधीही ग्रामीण भागातील विद्यार्थी संख्या कमी झाल्याने प्राध्यापकांच्या नोकरीच्या संदर्भात प्रश्न निर्माण होऊ शकतात तसेच रोजगाराची अनुपलब्धता आणि निसर्गाची अवकृपा यामुळे विद्यार्थ्यांना फी भरणे कठीण झाले आहे. यासंदर्भात विद्यापीठाच्या वतीने काही मदत करता येईल का, अशी विचारणा केली. यासाठी आपत्ती फंडातून मदत करण्याची सूचना श्री. राजन कोळंबेकर यांनी केली.

डॉ. प्रकाश दातार यांनी प्राध्यापकांच्या कॅससाठी प्रत्येक स्तरावर रु.४९९०/- घेतले जातात, त्याबाबतच्या आश्वासनाचे काय झाले, असे विचारले.

डॉ. प्रकाश दातार यांच्या प्रश्नाला उत्तर देताना या प्र-कुलगुरूंनी सांगितले की, कॅसची फी एकदाच घेतली जाते. यावर प्रा. वैभव नरवडे यांनी ऑनलाईन फी घेणारी जी कंपनी किंवा एजन्सी ठेवलेली आहे. त्यातला एकही पैसा विद्यापीठाला मिळत नाही त्याचा हिशोब दिला जात नाही. या संदर्भातली एक सदस्यीय समिती नेमली होती. त्याचे पुढे काय झाले? असे विचारले. श्री. रविकांत सांगुर्डे यांनीही पदोन्नतीसाठी पैसे घ्यायचे, ही कल्पनाच हास्यास्पद आहे, असे सांगून ती बंद केली पाहिजे असे सांगितले.

श्री. महादेव जगताप यांनी चर्चा भरकटत चालल्याचा मुद्दा मांडून खुलासा मागीतला. डॉ. चंद्रकांत कुलकर्णी यांनी इतिवृतामध्ये जे आहे त्याला बगल देऊ नये, परिनियमाप्रमाणे कामकाज चालविले पाहिजे, यावर निर्णय मागितला. दरम्यान प्रा. वैभव नरवडे यांनी प्रभारी कुलसचिवांना उद्देशून मागणी केली की, प्रक्रियेप्रमाणेच चर्चा झाली पाहिजे आणि आता अधिक उशिर नको असे आवाहन केले.

श्री. महादेव जगताप यांनी सदस्यांना पाठविल्या जाणाऱ्या ऑनलाईन माहितीबद्दल तक्रार करताना पाठविला गेलेला पासवर्ड आम्हाला मिळत नाही किंवा दुसराच कोणीतरी वापरतो, त्यामुळे संगणक तंत्रज्ञानाच्या प्रगतीमध्ये या त्रुटी कशा राहतात असे विचारले. यावर मा. प्र-कुलगुरूंनी उत्तर देताना सांगितले की, सुरुवातीला प्रणालीद्वारे पासवर्ड तयार होत असतो नंतर तो बदलायचा असतो. त्यावर श्री.जगताप यांचे समाधान झाले.

श्रीमती शितल देवरुखकर-शेठ यांनी मागच्या वेळी हरकतीचा मुद्दा मांडताना बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत तीन दिवसाच्या आत मिळावी असे म्हटले होते, त्यावर उत्तर देताना विद्यापीठाच्या संकेत स्थळावर देत असल्याचे म्हटले होते पण तसे होताना दिसत नाही. त्यावर कुलसचिवांनी त्याची दुरुस्ती केली जाईल, असे आश्वासन दिले.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी १४२ कोटीच्या बँकेच्या पैशाचा मुद्दा पुन्हा उपस्थित करताना दोषींविरुद्ध काय केले असे विचारले. ॲड. वैभव थोरात यांनी या संदर्भात त्यांच्याकडे असलेले ध्वनिमुद्रण सभागृहात ऐकवण्याची परवानगी मागितली, ज्यामुळे १४२ कोटींच्या प्रकरणावर प्रकाश पडेल असा त्यांचा दावा होता परंतु मा. अध्यक्षांनी आता इतिवृत्तावर चर्चा चालू आहे, इतर विषयावर आता बोलता येणार नाही. ते ध्वनिमुद्रण तुम्ही प्रशासनाकडे सादर करू शकता. इथे ते ध्वनिमुद्रण ऐकवायला

परवानगी देता येणार नाही. इतर काही सदस्यांनीही सदर ध्वनिमुद्रण ऐकवण्याची मागणी लावून धरली परंतु हे नियमाला धरून नाही असे सांगून, बोलायला परवानगी आहे इतर गोष्टींना नाही असे अध्यक्षांनी स्पष्ट केले. ॲड. निल हेळेकर यांनीही नियमाप्रमाणे इतिवृतातील सुधारणाबाबत प्रथम चर्चा पुढे चालू ठेवावी. सदर ध्वनिमुद्रण प्रथम अध्यक्षांना ऐकवावे आणि नंतर त्यांच्या परवानगीने पुढे जाता येईल. प्रा. डॉ. अजय भामरे यांनी इतिवृताबाबतची चर्चा पुढे चालू ठेवावी असे आवाहन केले. डॉ. सुप्रिया करंडे यांनी सदर पाच सदस्यीय समितीचे फलित काय आहे, त्याबद्दल उत्तर मिळाले पाहीजे, अशी मागणी केली.

श्री. मेहता यांनी यासंदर्भात त्यांची स्वतःची तसेच यासंदर्भातला आरोपी अशा सर्वांचे स्टेटमेंट रेकॉर्ड करण्यात आले असून त्यानंतर चौकशी अधिकारी या सगळ्यांचा सांगोपांग विचार करून महिन्याभरात पूर्ण अहवाल सादर करतील अशी अपेक्षा आहे. शेवटी तो मा. कुलगुरू यांना सादर करण्यात येईल, अशी माहिती सभागृहासमोर सांगितली.

श्री. संजय शेट यांनी यासंदर्भात तपशिलवार विवेचन केले. समितीच्या स्थापनेनंतर दुसऱ्याच दिवशी समितीचे कामकाज सुरू झाले. ज्याची माहिती मागच्या अधिसभेमध्येही देण्यात आली होती. १४२ कोटी रुपयांपैकी ७५ कोटी रुपये येस बँकेकडून २ दिवसातच परत मिळाले. या वर्षाच्या मार्चमध्ये व्याजासकट १४२ कोटी रुपये वसूल झाले आहेत. चौकशी समितीसमोर श्री. संजय शेटे यांच्यासह सगळ्यांच्या उलट तपासणीही पूर्ण झाल्या असून आता अंतिम अहवाल अपेक्षित आहे. अर्थात सदरचे काम अधिक गतीने आणि तंत्रज्ञानाची मदत घेऊन होणे अपेक्षित होते, ते अजून झालेले नाही. अर्थात मा. अध्यक्षच यावर अंतिम निर्णय घेतील, अशी अपेक्षा श्री. संजय शेटे यांनी व्यक्त केली.

यावर मा. प्र-कुलगुरूंनी सांगितले की, समितीचा अहवाल साधारणतः १७ ऑगस्ट, २०२० ला मिळाला. त्या अनुषंगाने त्या संबंधित कर्मचाऱ्याला कारणे दाखवा नोटीस २४ ऑगस्ट, २०२० ला दिल्यानंतर एक चौकशी अधिकारी १९ ऑक्टोबर, २०२० ला नियुक्त झाला आहे. २७ ऑक्टोबर, २०२० रोजी निलंबन आदेश व दोषारोप पत्र दिले गेले आहे. तसेच विद्यापीठातर्फे सादरकर्ता अधिकारी नियुक्ती २९ ऑक्टोबर, २०२० ला झाली असून त्याची पहिली सुनावणी ३० ऑक्टोबर, २०२० ला झाली. संबंधीत कर्मचारी ३१ ऑक्टोबर, २०२० ला सेवानिवृत्त होण्यापूर्वीच त्यांना त्यांच्या निलंबनाचे आदेश दिले गेलेले आहे. त्यांच्या जवळपास १७ सुनावण्या झाल्यानंतर त्यांचा अहवाल चौकशी अधिकाऱ्यांकडून अपेक्षित आहे आणि त्या अहवालाच्या आधारावर कारवाई केली जाणार आहे. हा विषय अत्यंत गांभीर्याने घेऊन चौकशी अहवाल आला की त्यावर लगेच कारवाई होईल असे आश्वासन प्र-कुलगुरू यांनी सभागृहात दिले.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी सुनावणीसाठी बाहेरून नियुक्त झालेल्या व्यक्तीवर झालेला खर्च हा संबंधित आरोपित व्यक्तीकडून घेण्यात यावा, अशी सूचना केली.

डॉ. सुप्रिया करंडे, ॲड. वैभव थोरात आणि डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी, आपले सर्व कायदेशीर शुल्क संबंधीत कर्मचाऱ्यांकडून घेण्यात यावे. विद्यापीठावर हा बोजा पडू नये असे सांगून लवकरात लवकर निर्णय घेण्याची विनंती केली.

श्री. राजन कोळंबेकर यांनी परत आलेले १४२ कोटी रुपये आपण कुठे गुंतवणूक करतोय, ते कोणत्या बँकेमध्ये करतोय आणि ते कुठच्या शिर्षकाखाली आपल्याकडे जमा होत आहेत, आणि कोणत्या बँकेमध्ये ते डिपॉझिट करतो ती माहिती अधिसभा सदस्यांना लेखी स्वरूपात उपलब्ध करून द्यावी, ही विनंती केली.

श्री सुधाकर तांबोळी आणि डॉ. सुप्रिया करंडे यांनी सूचना केलेली की 'टॅली पॅकेज' घेऊन संगणकीकरण करून विद्यापीठाच्या देयकांच्याबाबतीत ज्या समस्या होत आहेत, त्या व्यवस्थित सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत.

मा. अध्यक्षांनी अधिसभेसाठी उपस्थित सदस्यांना इतिवृत्ताबाबत काही सूचना असल्यास कराव्यात म्हणजे त्याप्रमाणे योग्य तो बदल करण्यात येईल अशी सूचना केली.

डॉ. वैभव नरवडे यांनी टंकलेखनाच्या चुका होणार नाही, याची काळजी घ्यावी. यावर मा. प्र-कुलगुरूंनी सांगितले की, बऱ्याच वेळा unicode मधील मराठीचे pdf फाईलमध्ये रुपांतर करताना अडचण येते, पण हे दुरुस्त करण्यात येईल.

तसेच काही महाविद्यालयांनी शिक्षकांना पगार दिलेला नसल्याची तक्रार व त्यासंदर्भात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डॉ. वैभव नरवडे यांनी केली.

डॉ. गुलाबराव राजे यांनी इतिवृतामधील दुरुस्ती करण्याबाबत असे सुचविले की, संबंधित महाविद्यालय देवगड नाही तर ते भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण असे आहे. तसेच या महाविद्यालयाने विद्यापीठाची परवानगी न घेता अभ्यासक्रम बंद करण्याचा आरोप केला. एस.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय नसून सरदार पटेल (एस.पी.) अभियांत्रिकी महाविद्यालयाने असे आहे. डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी सांगितले की, अंधेरी येथील महाविद्यालयचे नाव एस.पी.डी.टी. महाविद्यालय, अंधेरी असे टाकण्यात यावे.

डॉ. वैभव नरवडे यांनी, तासगांवकर महाविद्यालयाचा मुद्दा उपस्थित करून तासगांवकर महाविद्यालयाचे प्रकरण गेली ३ वर्षे अधिसभेमध्ये सुरु असून विद्यापीठ प्रशासनाने काय पाऊले उचलली त्याचे फक्त स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी केली.

डॉ. मृदुल निळे यांनी सांगितले की, प्रा. अमर कडाळे यांना गेले ३२ महिने निलंबित केलेले आहे आणि त्या प्रकरणामध्ये आपण अजूनही पुढे गेलेलो नाही आहोत. दुसरे महत्त्वाचे म्हणजे दोषारोप आहेत आणि ज्या प्राचार्यांवर दोषारोप लावलेले आहेत ते प्राचार्य आता निवृत्त झाले असून त्या प्राचार्यांनी विस्तार कालावधीकरिता अर्ज केलेला असून जोपर्यंत हा मुद्दा निकाली निघत नाही तोपर्यंत अर्जावरती कार्यवाही होऊ नये.

डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी सांगितले की, मागासवर्गीय शिक्षक आणि त्यांना मिळणारी वागणूक यासंदर्भात आपल्याकडे भरपूर प्रकरणे प्रलंबित आहेत, यासंदर्भात

एक Fast Track Committee लवकरात लवकर गठीत व्हावी जेणेकरून संबंधित शिक्षकांचे प्रश्न मार्गी लागतील. या संदर्भात समिती स्थापन झालेली आहे, समितीने भेटी सुद्धा केलेल्या आहेत, त्यांचा अहवाल अपेक्षित आहे. असे प्रभारी कुलसचिव यांनी सभागृहाला सांगितले.

डॉ. गुलाबराव राजे यांनी विचारणा केली की, कायद्याप्रमाणे सी.डी.सी. बऱ्याचशा महाविद्यालयांमध्ये गठीत झालेली नाही, अशा महाविद्यालयांचे संलग्नीकरणाचे नूतनीकरण थांबवायचे आहे, ते थांबवलेलं आहे का? यावर काय कार्यवाही करणार आहात?

डॉ. वैभव नरवडे यांनी सांगितले की, त्यांनी सदर केलेल्या स्थगन प्रस्तावाबाबत सभागृहात अतिशय अभ्यासपूर्ण आणि प्रगतिशील चर्चा झाली असा उल्लेख इतिवृतात आहे. पण काय चर्चा झाली, कोणत्या महाविद्यालयांचे वेतन झाले नाही, किती महिने पगार थकलेत, याचा उल्लेख आलेला नाही. प्रशासन म्हणून आपण या महाविद्यालयांना पाठीशी घालतोय का? त्या महाविद्यालयांची नावे का टाकली गेली नाहीत. नेमकी काय चर्चा झाली तिचा किमान सारांश तरी इतिवृतात आला पाहिजे, अशी सूचना केली. प्र-कुलगुरूंनी त्याचा इतिवृत्तामध्ये समावेश करून घेऊ, असे आश्वासित केले.

डॉ. सुरेश मैंद यांनी सांगितले की, शहापूर महाविद्यालयामध्ये एखाद्या व्यक्तीच्या नेमणूकीमध्ये कसे गैरप्रकार होतात यासंदर्भामध्ये सभागृहात सविस्तर चर्चा झाली होती, या माध्यमातून विनंती आहे की, किती दिवसात कारवाई होईल, सांगितले तर बर होईल. प्रभारी कुलसचिव यांनी डॉ. सुरेश मैंद यांना यासंदर्भात माहिती घेऊन लगेच देतो, असे सांगितले.

डॉ. संगीता पवार यांनी सांगितले की, पान क्रमांक ५१ Respected Chairperson of today's Senate meeting, in the last Annual Senate I had given an adjournment motion which were running into 5 points. There are some specific assurances provided on pg. no.: 52. So, if I have to very precisely go with the 5 points, I guess only three of them are being jotted down in the form of giving me the assurances based on which I had taken back my adjournment motion.

Registrar: Madam, on page number 52, you suggested some more information to be added, we will definitely look into this and add the more information that you had given in the original speech, we will rectify those things madam.

श्री. मंदार सावंत-देसाई यांनी सांगितले की, डॉ. वैभवजी नरवडे यांनी कोन्फ़िसिअस अभ्यासक्रमाबद्दल सांगितले की, सगळ्या देशांमध्ये चीनबद्दल एक अविश्वास आहे. ह्या अभ्यासक्रमाबद्दल विद्यापीठाने पूर्ण माहिती घ्यावी जिथे असेल तिथे मदत करूच नये, असे माझे तरी मत आहे, तर मला वाटते डॉ. वैभव नरवडे यांना मी पाठिंबा देतो आणि ह्या अभ्यासक्रमाबद्दल माहिती घेतली जावी.

डॉ. धनराज कोहचाडे यांनी सांगितले की, आपण संशोधन व मान्यता समितीची बैठक चार वेळा घेण्याचं मान्य केले होते. मागील सभेच्या इतिवृत्तामध्ये संशोधन व मान्यता समितीची बैठक दोन वेळा असे म्हटलेले आहे व PET ही दोन वेळा घेण्याचं मान्य केले होते, तर त्याच्यात दुरुस्त्या करण्यात यावी. संशोधन व मान्यता समितीच्या बैठकीचे वेळापत्रक अजूनही कुठे वेबसाईटवर उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले.

ॲड. वैभव थोरात यांनी सांगितले की, मागील स्थगन प्रस्तवावर चर्चा करण्यास जी मला परवानगी दिली होती. त्यामध्ये दोन स्थगन प्रस्ताव मांडले होते, त्यातल्या एका प्रस्तावावर चर्चा करायला मला परवानगी दिली होती आणि दोन स्थगन प्रस्ताव मी आपल्या विनंतीला मान देऊन मागे घेतले होते, त्याचाकुठेही उल्लेख झालेला नाही आहे. तीनही स्थगन प्रस्ताव मांडलेत असे दाखविण्यात आलेले आहे तर ते दोन प्रस्ताव आपल्या विनंतीला मान देऊन मागे घेतलेले आहे.

डॉ. रवींद्र रसाळ यांनी ५०० आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मुलांचे वसतिगृह बांधण्याच्या प्रत्यक्ष कामास कधी सुरुवात होणार याची विचारणा केली. डॉ. गुलाबराव राजे यांनी ठाणे व पालघर हे दोन्ही जिल्हे आदिवासी बहुल आहेत. आणि मुंबई विद्यापीठात त्यांच्यासाठी वसतिगृह असू नये. ही खेदाची बाब आहे असे मत व्यक्त केले. प्र-कुलगुरूंनी यावर माहिती दिली की, ६७ कोटींचा प्रस्ताव RUSA ला दिलेला आहे. त्यांच्याकडून मंजुरी आली की कामाला सुरुवात होईल. डॉ. सुरेश मैंद यांनी या संदर्भात समिती नेमण्याची मागणी केली. म्हणजे ही समिती पाठपुरावा करील. सुरुवातीला बैठका, चर्चा होणे महत्त्वाचे आहे. प्र-कुलगुरू सर्वांना अवगत करत म्हणाले की, प्रस्ताव एकत्रित आहे. त्यानुसार आपण आपल्या मास्टर प्लॅनमध्ये तो समाविष्ट करीत आहेत. श्री. प्रदीप सावंत यांनी हरकत घेत विचारले की, जागेशिवाय प्रस्ताव कसा देणार असे तुम्ही सांगितले व दुसरीकडे आराखडा तयार करण्याचे काम चालले असल्याचे सांगितले आहे. डॉ. धनराज कोहचाडे यांनी विचारणा केली की, वसतिगृहासंबंधी विद्यापीठाने महामहिम राज्यपाल महोदयांकडे नेमकी कुठली मागणी केली आहे, असा प्रश्न सभागृहाला विचारला. यावर प्र-कुलगुरूंनी स्पष्ट केले की, विद्यापीठ स्तरावर वसतिगृहाचा उपक्रम सुरू आहे. श्री. प्रदीप सावंत म्हणाले की, आपण सगळे प्रस्ताव महामहिम राज्यपालांकडे पाठवतो. पण महामहिम राज्यपालांकडे काही यंत्रणा आहे का? की प्रस्ताव पाठवल्यावर ते तपासून बघतील. काही तर्कच लागत नाही. डॉ. संगीता पवार सदर माहितीत भर घालत म्हणाल्या की, असा प्रस्ताव समाज कल्याण विभागातर्फे मांडला होता. कालांतराने आदिवासींसाठी विशेष प्रस्ताव आला. तो वेगळा करा. यावर अध्यक्ष यांनी संमती दर्शवत म्हणाले की, वेगवेगळ्या रकान्यांमध्ये व्यवस्थितपणे माहिती देण्यात येईल.

श्री. प्रवीण पाटकर यांनी तक्रार मांडत म्हणाले की, इथे चर्चेसाठी सकाळपासून संध्याकाळपर्यंत बसायला लागते. तर खुर्च्या योग्य व आरामदायी मिळायला हव्यात अशी मागणी केली. सदर मागणी मा. अध्यक्षांकडून तात्काळ मान्य करण्यात आली.

डॉ. गुलाबराव राजे यांनी सभागृहाला विचारले की, किती प्राध्यापकांनी एकापेक्षा अधिक वेळा रु.४,९००/- भरले आहेत? या प्राध्यापकांची यादी परिशिष्टात अपेक्षित होती. आपण त्यांचे पैसे त्यांना कधीपर्यंत परत करणार आहोत? डॉ. अनंत लोखंडे यांनी स्पष्ट केले की, ज्यांना विनाकारण हा भुर्दंड भरावा लागला त्यांचे पैसे लवकर परत करण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री. संजय शेटे यांनी सभागृहात प्रतिपादन केले की, सभागृहापुढे जे इतिवृत्त सादर केले आहे ते मंजूर करावे. या सूचनेला प्रा. डॉ. अजय भामरे यांनी अनुमोदन दिले, आणि कुलसचिवांनी ते मंजूर झाल्याचे जाहीर केले.

डॉ. महादेव जगताप म्हणाले की, कोरोना महामारीच्या काळामध्ये आपण RTPCR आणि Antigen Test या संदर्भात चर्चा केलेली होती. तरीही RTPCR लॅब विद्यापीठात का तयार झाली नाही, याची विचारणा केली.

डॉ. सुरेश मैंद यांनी महामारीच्या काळामध्ये विद्यार्थ्यांकडे प्रवेश घ्यायला पैसे नाहीत. सगळे ऑनलाईन चालले आहे. घरी मोबाईल नाही. त्यांनी फॉर्म कसा भरावा, ऑनलाईन परीक्षा कशी द्यावी, असे विद्यार्थ्यांचे प्रश्न उपस्थित केले.

डॉ. धनराज कोहचाडे यांनी अध्यक्ष महोदयांना प्रश्न केला की, प्रश्न उत्तरांमध्ये उत्तरे देतांना इंग्रजी भाषेचा उपयोग केला जातो बाकी बरीचशी उत्तरे ही मराठीतच दिली जातात. श्री. महादेव जगताप यांनी नमूद केले की, राज्य शासनाची भाषा मराठी असून पत्रव्यवहार मराठीत होणे गरजेचे आहे.

डॉ. धनराज कोहचाडे यांनी अर्थशास्त्र विभागाच्या प्रकल्पाविषयी बोलताना मुद्दा उपस्थित केला की, बरेचसे आदिवासी स्वयंसेवक या प्रकल्पामध्ये काम करत होते परंतु त्यापैकी बऱ्याच मुलांना मानधन मिळाले नाही. अधिक माहिती देताना डॉ. धनराज कोहचाडे यांनी पुढे नमूद केले की, बरेचसे स्थानिक स्वयंसेवक ही मानधनावर नेमले गेले होते, परंतु त्यापैकी एकालाही पैसे देण्यात आले नाहीत. या मुद्द्यावर त्यांनी मा. कुलगुरू यांना लक्षात आणून दिले की, या सर्व बाबतीत कुठलीच कायदेशीर कारवाई केली जात नाही त्यामुळे त्यावर ताबडतोब कारवाई करा आणि जबाबदार व्यक्तीला दोषी ठरवून तात्काळ शिक्षा करण्यात यावी. यावर प्रभारी कुलसचिव यांनी यासंबंधातील कुठलीही लेखी स्वरूपाची तक्रार आलेली दिसत नाही तरीदेखील याविषयी सविस्तर माहिती घेऊन कार्यवाही अहवाल देतो अशी ग्वाही दिली. यावर श्री. महादेव जगताप यांनी माहिती देतांना सांगितले की, सव्वाशे कोटींचा प्रकल्प शहापूरमध्ये जे आदिवासी कातकरी लोक आहेत त्यांच्यासाठी केला आहे. हा पूर्ण निधी वापरला गेला तरी त्यातील संबंधित व्यक्तींना आपण रिलीव्ह कसे केले असा प्रश्न त्यांनी सभेमध्ये उपस्थित केला. कुलगुरूंनी लेखी स्वरुपात तक्रार आहे का, अशी विचारणा केली असता श्री. जगताप म्हणाले की, अधिसभेमध्ये त्यावर स्थगन आहे. तसेच डॉ. धनराज कोहचाडे यांनी माहिती दिली की, यवतमाळचे श्री. उत्तम मोरे यांनी देखील विद्यापीठाला पत्रव्यवहार केलेला आहे. त्यावर श्री. प्रदीप सावंत म्हणाले की, जो कार्यवाही अहवाल प्रशासनाकडून

मिळतो तो पूर्ण माहितीनुसार नसतो. त्यामुळे असे कार्यवाही अहवाल हा सभागृहाची दिशाभूल करणाराच असतो. आम्हाला यातून अर्धवट माहिती दिली जाते. प्रभारी कुलसचिव यांनी नमूद केले की, हा शासनाचा प्रकल्प होता. त्यावर श्री. प्रदीप सावंत म्हणाले की, शासनाचा प्रकल्प असला तरी आपण चौकशी केली पाहिजे. प्रभारी कुलसचिव म्हणाले की, संबंधित व्यक्तीला कार्यमुक्त केले नाही तर काही अटींच्या आधीन राहून कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यावर श्री. प्रदीप सावंत आणि श्री. जगताप यांनी प्रशासनाला संबंधित माहिती विचारली. त्यावर मा. प्रकुलगुरू यांनी माहिती दिली की, कुठलीही प्रक्रिया सेवानिवृत्ती किंवा भविष्यनिर्वाह निधी, पेन्शन याबद्दल आपण एकही पाऊल उचलले नाही. तसेच आर्थिक दस्तऐवज लागतात ते देखील दिलेले नाही. त्यावर श्री. प्रदीप सावंत म्हणाले योग्य माहिती कार्यवाही अहवालामध्ये असती तर आता चर्चा करण्याची वेळच आली नसती.

मा. कुलगुरूंनी सभागृहाला संबोधित केले की, विद्यापीठाच्या सुधारणेसाठी ज्या-ज्या गोष्टींची गरज आहे त्यावर चर्चा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या सुधारणेसाठी ज्या-ज्या गोष्टींची गरज आहे त्यावर चर्चा अपेक्षित आहे. या ठिकाणी सर्वच अधिसभा सदस्यांच्या सहकार्याची फार गरज आहे. सध्या चारही बाजूंनी मर्यादा आहेत. कोरोनामुळे आर्थिक परिस्थिती ढासळलेली आहे अशावेळी सर्वांच्या सहकार्याची आणि सामंजस्याची नितांत गरज आहे. चुका दाखवणे, समाजाचे प्रतिनिधित्व करणे हे अधिसभेचे काम आहे. त्याचबरोबर भविष्यात काय करणे गरजेचे आहे त्यावर चर्चा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करा. मा. कुलगुरू म्हणाले पुढे जेव्हा परिनियम बदलले जातील त्यामध्ये सभेमध्ये एक तास असा ठेवण्यात यावा की ज्यामध्ये विद्यापीठाच्या विकासावर चर्चा होईल असा प्रस्ताव ठेवला पाहिजे.

ॲड. नील हेळेकर यांनी सदर विषयाबाबत सभागृहासमोर आपले मत मांडताना म्हणाले की, अधिसभेत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा झाली त्यात प्रामुख्याने दोन महत्त्वाचे प्रश्न समोर आले, निर्णय प्रक्रियेला होणारी दिरंगाई आणि योग्य वेळी न मिळालेली माहिती किंवा उत्तरे. ॲड. नील हेळेकर यांनी सुचवले की, आज वेगवेगळ्या आस्थापनांमध्ये ई.आर.पी. प्रणाली राबविण्यात येत आहे त्यामुळे आपण दिलेल्या पत्राचा प्रवास कुठे चालला आहे हे वेळोवेळी आपणाला कळते. ई.आर.पी. प्रणाली विद्यापीठांमध्ये वापरली तर बरेचसे प्रश्न निकाली लागतील. दुसऱ्या मुद्द्यावर बोलताना ॲड. नील हेळेकर म्हणाले की, आपल्याकडे मनुष्यबळ कमी पडत आहे. या सर्वांचा ताळमेळ बसविण्यासाठी विद्यापीठाने वर्क ऑडिट केले पाहिजे जेणेकरून कुठल्या विभागाला कुठल्या कामासाठी किती कर्मचारी पाहिजे ते कळेल.

ॲड. नील हेळेकर यांच्या मताशी सहमति दर्शविताना श्री. प्रदीप सावंत यांनी बायोमेट्रिक अटेंडन्स वेतनाशी थेट जोडला जावा. पुढे त्यांनी अशी सूचना मांडली की, ई.आर.पी. प्रणाली चालू झाली तर त्याचा फायदा होईल आणि अर्धा वाद जो उत्तरे मिळत नाहीत म्हणून होतो तो दूर होईल.

कार्यवाही अहवालावर चर्चा सुरू आहे परंतु सभागृहामध्ये सदस्य बऱ्याच वेळेला फार छोट्या गोष्टींमध्ये चर्चा करण्याकरिता वेळ घालवतात व महत्त्वाच्या विषयांकडे लक्ष देण्याचे राहून जाते, असे प्रा. डॉ. महादेव गोंडा यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले. त्यांनी नमूद केले की, मागील चार वर्षांमध्ये विद्यापीठांमध्ये अनेक सकारात्मक कामे झाली आहे.

मा. कुलगुरू यांनी सांगितले की, विद्यापीठ आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी चर्चा घडून येणे आवश्यक आहे आणि त्यासाठी पुढील अधिसभेपासून एक स्वतंत्र तास चर्चेसाठी ठेवणे आवश्यक आहे ज्यामध्ये अधिसभा सदस्य अभ्यास करून विविध भागात विद्यापीठ कशी सुधारणा करू शकते. याबद्दल आपापली मते व्यक्त करू शकतील त्यातून विकासाचा आराखडा तयार करता येईल. पुढे कुलगुरूंनी असेही सांगितले की, विद्यापीठात आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये शिकणारी मुले पदवीनंतर काय करत आहेत हे माहित असणे देखील गरजेचे आहे त्याकरिता माजी विद्यार्थी संघ हा अधिक बळकट होणे गरजेचे आहे त्यामध्ये श्री. मिलिंद साटम हे बरेचसे काम करत आहेत त्यांनाही सहकार्य करण्याची गरज आहे.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी यावर मत मांडताना सांगितले की, मा. कुलगुरूंनी एक तास विशेष चर्चेसाठी ठेवणे हा योग्य आणि आवश्यक मुद्दा मांडला.

डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी कार्यवाही अहवालासंदर्भात बोलताना मुद्दा क्रमांक ११ मध्ये सरस्वती एज्युकेशन सोसायटीला कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली आहे, असे विधान आहे. त्या संस्थेवर प्रशासक नेमण्यासाठी सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात येईल व व्यवस्थापन परिषदेचा ठराव शिक्षण संचालक यांना पाठवण्यात येईल. त्याचप्रमाणे इतर महाविद्यालयाबाबतीत याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल, ही बाब आहे. परंतु त्याला उत्तर देताना बराचसा गोंधळ हा दिसून आला आहे. अंतर्गत संप्रेषण असलेले पत्र उत्तरादाखल दिलेले आहे. सगळेच विसंगत वाटते आहे असा मुद्दा या ठिकाणी डॉ. कुलकर्णी यांनी मांडला. त्याला उत्तर देताना प्र-कुलगुरू म्हणाले मसुदा मंजुर झाला आहे. महाविद्यालयाला पाठवला गेला महाविद्यालयाकडून उत्तर पण आले. उत्तर शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर घेतले आहे.

डॉ. वैभव नरवडे यांनी देखील कार्यवाही अहवालामधील याच बाबींवर आपले मत मांडताना म्हणाले की, बऱ्याच महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे त्यावर उत्तरे देखील आले आहेत त्यापुढे विद्यापीठ प्रशासनाने काय केले याची कल्पना नाही. सरस्वती महाविद्यालयाचा मुद्दा गेल्या अनेक अधिसभेमध्ये आपण घेत होतो पण नेमकं त्याबाबत काय करण्यात येईल याचा कार्यवाही अहवालामध्ये कुठेच उल्लेख दिसत नाही. अभियांत्रिकी आणि फार्मसी महाविद्यालयांमध्ये वेतन होत नाही, अशा प्रकारचे मुद्दे आपण वेळोवेळी मांडतो पण विद्यापीठ प्रशासन काहीच करत नाही. सध्या तरी सर्व कागदावरच आहे, त्यामुळे त्यांनी अध्यक्ष महोदयांना विनंती केली की, या सगळ्या महाविद्यालयाबद्दल आपण काय केले, कारणे दाखवा नोटीस पाठवल्यानंतर पुढे

कार्यवाही काय असणार आहे, याबद्दल सभागृहाला अवगत करावे. या प्रश्नाच्या अनुषंगाने प्र-कुलगुरूंनी एकूण ४२ महाविद्यालयांना आपण कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे त्याबद्दलचा तपशीलही तुम्हाला देतो, असे आश्वासन दिले.

श्री. महादेव जगताप यांनी सभागृहात विचारले की, त्वरित कार्यवाही काय केली आहे याची विचारणा करत या महाविद्यालयांनी लाखो-करोडो रुपये घ्यायचे आणि विद्यार्थ्यांना छळायचे आणि अशा महाविद्यालयांवर जर तुम्ही सहा-सहा महिने कुठलीही कारवाई करणार नसाल तर याला त्वरित उत्तर समजायचे का?

प्र-कुलगुरूंनी यावर उत्तर देत सांगितले की, सत्यशोधन समितीचा अहवाल विद्यापरिषदेपुढे सादर केला आहे. त्यावर कोणती कार्यवाही करायची याचा अधिकार मा. कुलगुरू महोदय यांना दिलेला आहे. आपल्या कायदे सल्लागारांच्या सल्ल्यानुसर मा. कुलगुरू महोदय योग्य कार्यवाही करतील. त्यावर श्री. महादेव जगताप यांनी स्पष्ट केले की, कार्यवाही अहवालामध्येच कार्यवाही झाली पाहिजे.

डॉ. वैभव नरवडे यांनी पुढे मुद्दा उपस्थित केला की, संचालक तंत्रशिक्षण हे मागील दोन अधिसभांच्या बैठकीसाठी गैरहजर आहेत. संचालकांना अधिसभेच्या बैठकीला उपस्थित राहणे बंधनकारक आहे. यावेळी महामहीम राज्यपाल महोदय यांना याबाबत माहिती देणारे विद्यापीठ प्रशासनाने पत्र द्यावे, अशी मागणी श्री. प्रदीप सावंत यांनी केली आणि त्यासंदर्भात महामहिम राज्यपाल महोदयांची भेट घेण्यात येईल असे आश्वासन मा. प्र-कुलगुरू यांनी दिले. त्याचप्रमाणे त्यांनी महामहिम राज्यपाल महोदयांबरोबर शिष्टमंडळाची जी आधी बैठक झाली त्यात काय चर्चा झाली याची विचारणा केली. श्री. प्रदीप सावंत यांनी सांगितले की, महामहिम राज्यपाल महोदयांसोबत झालेली बैठक ही साधारण बैठक होती. या अनुषंगाने प्र-कुलगुरूंनी स्पष्ट केले की, बैठक औपचारिक असली तरी त्यात प्रत्येकाचे एक-एक प्रतितिधी घेतले होते. ती पहिलीच बैठक असल्याने आपण ती साधारणच ठेवली होती.

महाविद्यालयांमध्ये सी.डी.सी. गठीत करणे अनिवार्य आहे, परंतु अनेक महाविद्यालय सी.डी.सी. गठीत करत नाहीत किंवा अहवाल जमा करीत नाहीत. आत्तापर्यंत ९०० पैकी १६४ महाविद्यालयानी आपल्याकडे सीडीसी गठित केल्या आहेत, हे स्पष्टपणे जाणवते. त्यासाठी आत्तापर्यंत सहा वेळा महाविद्यालयांना स्मरणपत्रे पाठवल्यानंतर ९०० महाविद्यालयांपैकी फक्त १६४ महाविद्यालयांनी प्रतिसाद दिला तो फक्त १८.२२% आहे. याबाबत विद्यापीठाला काही ठोस निर्णय घ्यावा लागेल, असे प्रतिपादन डॉ. गुलाबराव राजे यांनी केले. यावर प्र-कुलगुरू यांनी लक्षात आणून दिले की, परिशिष्टामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, जे महाविद्यालय सी.डी.सी.चा अहवाल पाठवणार नाही त्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ च्या संलग्नीकरणाचा विचार केला जाणार नाही. वेतन पूर्तता आणि सी.डी.सी. कामकाज या दोन गोष्टी संलग्नतेच्या अटीचा भाग केलेल्या आहेत.

ज्या महाविद्यालयांना कायमस्वरूपी संलग्नीकरण आहे त्यांचे आपण काय करणार आहात? या प्रश्नाला उत्तर देताना प्र-कुलगुरू म्हणाले की, यादीमध्ये असे जाणवते की, अशी ५० पेक्षा अधिक महाविद्यालये आहेत आणि अनुदानित महाविद्यालये आहेत त्यामुळे याचा विचार करावा लागेल. डॉ. राजे यांनी पान क्रमांक पाच मुद्दा क्रमांक १६ नवीन शिक्षण धोरण अंमलबजावणीबाबतीत बोलत असताना, मिश्र शिक्षण चर्चेमध्ये असे मांडले गेले होते की, ४०% अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने घ्यावा लागेल व ६०% अभ्यासक्रम हा ऑफलाइन पद्धतीने घ्यावा लागेल. भविष्यात दोन्ही माध्यमांचा वापर आपल्याला करावा लागेल अशी चर्चा होती. डॉ. राजे यांनी सुचविले की, ऑनलाईन विकल्पाचा विचार करताना विद्यार्थ्यांसाठी Digital infrastructure उभा करण्यासाठी प्रयत्न करावा लागेल. त्यावर प्र-कुलगुरू यांनी उत्तर देताना म्हणाले अजून निर्णय पूर्ण झालेला नाही सगळ्यांच्या विचारासाठी तो ठेवला आहे.

डॉ. सुरेश मैंद यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, यामध्ये मी स्थगन प्रस्ताव दिलेला होता. परंतु त्याचा कार्यवाही अहवालामध्ये समावेशच नाही. तरी त्याचा समावेश करावा. त्यावर प्र-कुलगुरुंनी डॉ. सुरेश मैंद यांच्या मुद्याचा समावेश करून घ्यावा असे निर्देश प्रभारी कुलसाचिवांना दिले.

श्री. प्रदीप सावंत यांनी सांगितले की, महाविद्यालयासंदर्भात व्यवस्थापन परिषदेत एक समिती नियुक्त करणार असे सांगितले, पण अजून नियुक्त केलेली नाही. त्यावर प्र-कुलगुरूंनी माहिती दिली की समिती स्थापन झाली आहे आणि लवकरच आपण त्यांची सुनावणी घेऊ.

डॉ. अनंत लोखंडे यांनी विचारणा केली की, विद्यार्थ्यांना ऑनलाईन स्थलांतर प्रमाणपत्र दिले जाते का आणि ते दिले जात असेल तर ते कोणत्या पद्धतीने दिले जाते त्यानंतर RLE चा निकाल दहा दिवसांत दिला जाईल असे त्या बैठकीत सांगण्यात आले होते. त्यासंदर्भात कोणती कार्यवाही झाली? याचीही विचारणा केली.

डॉ. विनोद पाटील यांनी प्रतिपादन केले की, स्थलांतर प्रमाणपत्र देण्यासाठी आपण आता ऑनलाईन अर्ज आणि ऑनलाईन पेमेंट व्यवस्था केली आहे. विद्यार्थ्याला त्याच्या पोस्टाच्या पत्त्यावर स्थलांतर प्रमाणपत्र पाठविण्याचे काम सुरू झाले आहे. त्यासंदर्भात परिपत्रकसुद्धा लवकरच निर्गमित करण्यात येणार आहे. तसेच RLE च्या बाबतीत निकाल जाहीर होण्यापूर्वीच महाविद्यालयांना परिपत्रक निर्गमित करून RLE चे गुण म्हणजे निम्न परीक्षेचे गुण भरण्यासाठी कळवले जाते.

श्रीमती शितल देवरुखकर-शेठ यांनी सभागृहामध्ये मुद्दा उपस्थित केला की, मागच्या अधिसभेत त्यांनी स्थगन प्रस्ताव मांडला होता. त्यामध्ये विद्यापीठाच्या कलिना उपपरिसरातील परीक्षा विभागाच्या नवीन इमारतीतील स्थलांतरासाठी झालेली दिरंगाई तसेच नवीन परीक्षा भवनाच्या इमारतीमधील धूळ खात पडलेले फर्निचर, बंद लिफ्ट, ए.सी. या सारख्या अनेक गोष्टी आपल्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यांनी नमूद केले की, आजच्या कार्यवाही अहवालामध्ये याचा उल्लेख नाही.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी सांगितले की, नवीन इमारतीमध्ये झालेल्या नुकसाना बाबत ठेकेदारावर कोणती कारवाई केली याचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणे एक रुग्णवाहिका एनजीओच्या माध्यमातून विद्यापीठाला मिळणार होती. तिचं काय झालं याची विचारणा केली.

प्रभारी कुलसचिवांनी यावर निवेदन केले की, या कार्यवाही अहवालामध्ये आपण सादर केलेल्या स्थगन प्रस्तावाची बाब आली नाही. याबाबत मी माहिती देण्यास संबंधित कर्मचाऱ्यांना सांगितले आहे. श्री. सुधाकर तांबोळी म्हणाले की, विद्यापीठाच्या परिसरामध्ये बाहेरच्या गाड्या येऊन पार्क होतात. आपला उपपरिसर हा सार्वजनिक उपपरिसर आहे का? आपली जागा जर कोणी बळकावत असेल तर ते योग्य आहे की अयोग्य? श्री. प्रदीप सावंत सदर चर्चेत प्रश्न उपस्थित केला की, रस्त्याच्या बाजूने आपली जमिन आहे. त्यात एस.आर.ए. होत आहे. तिकडचे अतिक्रमण काढण्यासाठी काही प्रयत्न केले आहेत का? प्रभारी कुलसचिव यांनी सदर मुद्याबाबत सभागृहास माहिती दिली की, मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसराची २४३ एकरची पूर्ण जागा आपली आहे. ही आपण भूमापन अधिकाऱ्यांकडून मोजणी करून घेतली आहे. जे अतिक्रमण होते ते काढण्यात आले आहे.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी सांगितले की, इथे अतिक्रमण करणाऱ्यांनी आता रेशन कार्डसुद्धा काढली आहेत. ही सगळी जागा आपल्या विद्यापीठाची आहे आणि आपण त्याची कुठेही दखल घेतलेली नाही. दुसरा महत्त्वाचा विषय की, बी.के.सी. पोलीस स्थानकाची एक चौकी या आपल्या उपपरीसरामध्ये असावी. यासाठी पत्र दिले होते. आपल्याला त्यांना एक छोटीशी जागा द्यायची आहे. जेणेकरून आपली अंतर्गत सुरक्षासुद्धा त्याने मजबूत होईल. यावर प्र-कुलगुरूंनी सभागृहात माहिती दिली की, उपरोक्त विषयाबाबत विद्यापीठ प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. आपण पोलिसांना चौकीसाठी त्यांना जागा उपलब्ध करून दिलेली आहे.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी नाराजी व्यक्त करीत सांगितले की, नॅक संदर्भात आपण सन्माननीय सदस्यांना कुठल्याही ठिकाणी सहभागी करून घेतले नाही. प्र-कुलगुरू यांनी सभागृहा माहिती दिली की, नॅकची कार्यपद्धती ठरलेली असते. त्यांचा भेटीचा कार्यक्रम त्यांच्याकडून आपल्याकडे येतो. त्यानुसार फक्त व्यवस्थापन सदस्यांसोबत त्यांची बैठक होती आणि ती झालेली आहे.

प्रभारी कुलसचिवांनी १२ व १३ मार्च रोजी झालेल्या अधिसभेच्या बाब क्र. ३ आश्वासनावरील कार्यवाही अहवाल यावर चर्चा अध्यक्षांच्या परवानगीने पुढे नेण्याची सूचना केली.

मा. कुलगुरूंनी सभा सुरू करण्यापूर्वी सर्व अधिसभा सदस्यांना विनंती वजा सूचना केली की, जे काही बोलायचे असेल ते अध्यक्षांना उद्देशून बोलावे आणि अध्यक्षांची परवानगी घेवूनच बोलावे. जेणे करून सगळयांना बोलण्याची संधी मिळू शकेल. प्रभारी कुलसचिवांना पुढची प्रक्रिया सुरू करण्याची सुचना केली.

ॲड. वैभव थोरात, श्रीमती शितल देवरुखकर-सेठ, श्री. प्रदिप सांवत, डॉ. सुप्रिया करंडे, डॉ. धनराज कोहचाडे यांनी स्थगन प्रस्ताव आधी घेण्यासाठी अध्यक्षांना आग्रहाची विनंती केली.

श्री. प्रदिप सावंत यांनी एस.आर.ए. सुनावणीला विद्यापीठातील अधिकारी उपस्थित राहिले नाहित, त्याचे कारण विचारले. प्रभारी कुलसचिवांनी अशा प्रकारची कोणतीही नोटीस विद्यापीठाला प्राप्त झालेली नाही असे स्पष्टीकरण दिले. श्री. प्रदिप सावंत, श्री. शशिकांत झोरे आणि श्री. प्रविण पाटकर यांनी संबधित विभागावर व संबधित व्यक्तीवर कारवाई करण्याची मागणी केली. श्री. सुधाकर तांबोळी यांनी विद्यापीठ जमिनीवर अतिक्रमणाचा विषय मांडला, इतके वर्ष ज्या आवारामध्ये अतिक्रमण झालेले आहे. तिथे सुरक्षा भिंत असायला पाहिजे, अशी सूचना केली. मा. कुलगुरू यांनी यासाठी समिती तयार करण्यात असे आश्वासन दिले. श्री. महादेव जगताप आणि श्रीमती शितल देवरुखकर-सेठ यांनीदेखील अतिक्रमण कधी आणि कुणाच्या कारकिर्दीत झाले आहे, त्याची कारणे काय याची विचारणा केली.

श्री. सुधाकर तांबोळी, श्री. प्रदिप सावंत, ॲड. वैभव थोरात, श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ यांनी परीक्षा भवन येथे ज्यांनी काम केले होते जे निकृष्ट प्रतिचे होते. तुम्ही त्याच्यावर कारवाई करू म्हटलं होत. नविन काही केले असेल तर त्याचा अहवाल दया, दंड करणे, समिती का नेमली जात नाही? अशी विचारणा केली. प्रभारी कुलसचिव यांनी सदर मुद्याच्या अनुषंगाने जी काही कार्यवाही केली त्याची माहिती देण्याचे आश्वासन दिले.

श्री. धनेश सावंत आणि श्री. प्रविण पाटकर यांनी विनंती केली की, पी.एम.सी. नियुक्त करतो याबाबतीत काही प्रक्रिया झाली की नाही? याबाबत विचार करायला हवा. डॉ. विनोद पाटिल, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी नविन परीक्षा भवनाबाबत सर्व सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत सविस्तर माहिती दिली. कंत्राटदार नेमलेला आहे, पी.एम.सी. पण नेमलेले आहेत. २०१४ पासून हे काम सुरू झालेले आहे. फिक्स फर्निचर न करता मॉड्युलर केले आहे.

प्र-कुलगुरू यांनी पान नं. ३२ इतिवृत्ताचे वाचून दाखवित सांगितले कि, ओ.सी. भाग सगळा आपल्या हातात नसून बृहनमुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात आहे. तसेच एक समिती यावर पाठपूरावा करून देखरेख करेल. प्रभारी कुलसचिव व संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्यापीठ अभियंता याचा पाठपुरावा करतील.

मा. प्र-कुलगुरू यांनी सांगितले की, नविन एम.ओ.यु. समिती केली आहे. प्रत्येक सुधारीत एम.ओ.यु. त्या एम.ओ.यु. समितीने बघितले आहेत व जिथे आवश्यक्ता आहे तिथे सुधारणा करून नव्याने करून घेतले आहेत. श्रीमती शितल देवरूखकर-शेठ यांनी मुद्दा मांडला की, मार्च, २०२० मध्ये जी अधिसभा झाली त्याचा कार्यवाही अहवाल अजूनही मिळालेला नाही. मा. प्र-कुलगुरू यांनी सांगितले की, कार्यवाही अहवाल सगळयांना मिळालेला आहे.

डॉ. सुरेश मैंद आणि डॉ. अनंत लोंखडे यांनी कार्यवाही अहवाल आणि कॅसच्या संदर्भामध्ये सहयोगी प्राध्यापक होताना पी.एचडी. डिग्री आवश्यक आहे का? असा प्रश्न विचारला होता. याबाबत सांगावे, अशी विनंती केली. मा. श्रीमती सोनाली रोडे, सह-संचालक, उच्च शिक्षण संचालनालय यांनी कार्यालयामधून पूर्ण माहिती घेवून चर्चा करते, असे आश्वासन दिले.

डॉ. गुलाबराव राजे यांनी सांगितले की, महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांचे कॅसचे प्रस्ताव आहेत, ते प्रस्ताव विद्यापीठाकडे किंवा सह-संचालकांकडे पाठविण्यात आले नव्हते. अद्याप काही कार्यवाही झालेली नाही. श्री. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी मुद्दा मांडला की, कॅसच्या वेळी छाननी समिती जाते त्याच दिवशी अहवाल अपलोड करते आणि नंतर फाईल १५ दिवसाच्या आत विद्यापीठाकडे पाठविते. याच्यात बराच वेळ जातो व तेवढया काळात प्राध्यापकांचे आर्थिक नुकसान होते. मा. कुलगुरूंनी सभागृहाला आश्वासन दिले की, या अधिसभेपासून तंत्रज्ञानाचे वेगवेगळे पोर्टल्स वापरू आणि जो वेळ जातो तो वाचेल याची दक्षता आपण सर्वांनी घेवू या.

श्री. प्रदिप सावंत आणि श्री. महादेव जगताप यांनी श्री. सुधीर पुराणिक यांचा सत्कार करायचा प्रस्ताव मांडला. डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी प्रस्तावाला अनुमोदन देत सांगितले की, चिपळूण आणि महाडमध्ये जो पूर आला त्यात भयानक अवस्था झाली होती. लाखो हात मदतीसाठी चिपळूण आणि महाड नागरिकांसाठी धावून आले होते. त्याच्यामध्ये मुंबई विद्यापीठाने प्रामुख्याने एन.एस.एस. विभागाने फार मोठा पुढाकार घेतला होता श्री. सुधीर पुराणिक यांच्या मार्गदर्शनाखाली एन.एस.एस. विभागाने काम केले. एन.एस.एस. विभागाचे संचालक व विद्यार्थी आणि विद्यापीठाच्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि खरोखर हा अत्यंत महत्वाचा सत्कार आहे. डॉ. सुरेश मैंद यांनी अनुमोदन दिले.

मा. प्र-कुलगुरूंनी सांगितले की, दि. १२ मार्च, २०२० चा कार्यवाही अहवाल जो होता तो २५ ऑगस्टच्या सभेत येणे अपेक्षित होते, आपण आश्वासन दिले होते, त्यावेळी कोरोनामुळे १५ टक्के लोक कार्यरत होते. कार्यवाही अहवाल देण्याबाबत झालेली दिरगांई मान्य आहे. त्यानंतर आपण दि.१२ व १३ मार्च २०२१ रोजी झालेल्या अधिसभेत जो कार्यवाही अहवाल दिलेला आहे, त्यामध्ये हा कार्यवाही अहवाल समाविष्ट केलेला आहे. कृपया परिशिष्ठ 'ब' पहावे, तो पटलावर पण आलेला आहे. त्याची चर्चा पण झालेली आहे आणि तो ई-मेलने पण पाठविला गेला आहे. प्रभारी कुलसचिव १२ व १३ मार्च, २०२१ रोजी झालेल्या अधिसभेचे आश्वासनावरील कार्यवाही अहवाल आपल्या समोर मांडण्यात आल्याचे सांगितले.

डॉ. धनराज कोहचाडे यांनी पेट आणि संशोधन व मान्यता समितीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला तसेच विद्यापीठात बरीचशी पदे रिक्त आहेत. ही पदे विद्यापीठ कधी भरणार आहे याची या सभागृहाला माहिती दया, अशी विनंती केली. मा. प्र-कुलगुरूंनी उत्तर दिले की, अधिष्ठाता पदाच्या जाहिराती दिलेल्या आहेत. त्याच्यावर

चर्चा चालू आहे अंतिम किती पदांना मंजूरी मिळेल ते आपल्याला लवकरच कळेल. संचालकांबाबत उच्च शिक्षण संचालनालयासोबत बैठक ५ तारखेला होती.

डॉ. विनोद पाटील यांनी सांगितले की, १२ व १३ मार्च, २०२० चा कार्यवाही अहवाल जो होता, तो प्र-कुलगुरूंनी सांगितल्याप्रमाणे २५ ऑगस्ट, २०२० रोजी ऑनलाईन सभा झाली त्यावेळेला देणे अपेक्षित होते, पण कोरोनामुळे विद्‌यापीठ २ ते ३ महिने बंद होते त्यामुळे आपण देवू शकत नव्हतो. २५ ऑगस्टला जेव्हा चर्चा झाली तेव्हा मा. कुलगुरू महोदयांनी जे आश्वासन दिले. त्या आश्वासनाचा पुढील कार्यवाही अहवाल १२, १३ मार्च, २०२१ च्या अधिसभेमध्ये १२, १३ मार्च, २०२० च्या कार्यवाही अहवालावर चर्चा झालेली आहे. मा. कुलगुरू यांनी ध्वनीमुद्रण भोजन कालावधीमध्ये तपासून घेण्यास सांगितले.

सभेचे अध्यक्ष प्रा. सुहास पेडणेकर यांनी प्रभारी कुलसचिव डॉ. गायकवाड यांना स्थगन प्रस्ताव पटलावर घेण्याची सूचना केली असता, प्रभारी कुलसचिवांनी ॲड. वैभव थोरात यांना स्थगन प्रस्ताव मांडण्यास सूचित केले.

ॲड. वैभव थोरात यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. प्रदिप सावंत यांनी अनुमोदन दिले.

*१. <u>स्थगन प्रस्ताव</u>*

*IDOL कडे प्रशासन करत असलेल्या दुर्लक्ष्यामुळे IDOL मधील विद्‌यार्थी संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यामुळे IDOL बंद करण्याचा विद्‌यापीठ प्रशासनाचा डाव आहे की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. IDOL कडे लक्ष वेधण्यासाठी सदर सभागृह १५ मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावे.*

ॲड. वैभव थोरात यांनी सांगितले की, आयडॉलबाबत २०१८ पासून सतत आपल्याकडे मागणी करतो आहे की, नविन अभ्यासक्रम चालू करा पण आपल्याकडून प्रत्येक वेळेला सांगण्यात येते कि, आम्ही चालू करणार आहोत, या बद्‌लची प्रक्रीय सुरू झालेली आहे. २०१८ पासून २०२१ पर्यंत मागणी करतो आहे म्हणजे ४ वर्षे झाली. तरी नविन अभ्यासक्रम आपण चालू करू शकलो नाही. यामुळे आपली विद्‌यार्थी संख्या घटत चाललेली आहे. २०१६-२०१७ ला आपल्याकडे ८० हजार तर सध्या आयडॉलमध्ये ६४ हजार विद्‌यार्थी आहेत. आपली लोकसंख्या वाढत असताना विद्‌यापीठाची विद्‌यार्थी संख्या का कमी होते. याचा आपण विचार केला पाहिजे. याउलट यशवंतराव चव्हाण मुक्त विद्‌यापीठाची विद्‌यार्थी संख्या जर पाहिली तर ८ ते १० लाखांमध्ये असून दरवर्षी पूर्ण महाराष्ट्रात कार्यरत आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या आज १२ ते १३ कोटी आहे आणि मुंबई विद्‌यापीठात जिथे कार्यक्षेत्र आहे त्या ठिकाणची लोकसंख्या ही ४ कोटीपर्यंत आहे. तरीसुध्दा मुंबई विद्‌यापीठाची विद्‌यार्थी संख्या फक्त ६४ हजार ८० हजाराहून आपण एकदम ६४ हजारावर आलो आहे. ८० हजारावून आपण २ लाखाच्यापुढे जायला

हवे होते परंतु याच्यासाठी कारणे कोणती? सगळयात महत्वाचे कारण ४ ते ५ प्राध्यापकांवर आपण संपूर्ण आयडॉल चालवतो आहे. आपल्याकडे ८०० संलग्नित महाविद्यालये आहेत आपण त्यांना संलग्नता देतो, तरीसुध्दा एकही महाविद्यालय आपले केंद्र घ्यायला तयार होत नाहित. सगळे यंशवंतराव चव्हाण विद्यापीठाचे केंद्र घेत आहेत मग हा विरोधाभास का? मुंबई विद्यापीठाचा महाविद्यालयांवर अंकुश नाही का? या महाविद्यालयांमध्ये मुंबई विद्यापीठाचे केंद्र का नाही चालू करत? यंशवंतराव चव्हाण विद्यापीठाचे केंद्र घेण्यासाठी तयार होतात असे का? आज जर आपल्याला अभ्यास साहित्य पाहिले असेल तर माझा पालघरचा आदिवासी विद्यार्थी चार-पास तास प्रवास करून कलिनाला येतो. तेव्हा कुठे २ वेळा फे-या मारल्या नंतर त्याला त्याचे अभ्यास साहित्य मिळते. आपण पालघरच्या विद्यार्थ्याला पालघरमध्येच त्याच्या गावात, त्याच्या तालुक्यातल्या महाविद्यालयामध्ये अभ्यास साहित्य का उपलब्ध करून देत नाहित. त्याचे परीक्षा केंद्रे आपण पालघर मध्ये देवू शकतो. तालुक्यामध्ये आपण ग्रामीण भागाचा विचार केला तर आपले आयडॉलचे परीक्षा केंद्र देत नाहित? आर्थिक बाजूचा विचार केला ना तर सर्वात जास्त उत्पन्न देणारे विभाग असेल ना? तर ते आपले आयडॉल आहे. जवळ-जवळ ४० ते ५० कोटी उत्पन्न हे आपले आयडॉल देत आहे, आणि या आयडॉलकडे आपण दुर्लक्ष करतो आहे. आपण आयडॉलकडे जास्त लक्ष दिले पाहिजे. आपले विद्यार्थी कमीत कमी ३ ते ४ लाखापर्यंत गेले पाहिजेत. यासाठी काय करता येईल? कोणते अभ्यासक्रम आणता येईल. यंशवंतराव चव्हाण विद्यापीठात विचारले तर ३० ते ३५ अभ्यासक्रम चालू आहेत आणि आपल्याकडे १७ अभ्यासक्रम आहेत. आपले स्टडी मेटेरियल आहे प्रत्येक पानावर आपल्याला व्याकरणाच्या चूका दिसतील. आयडॉलमध्ये विद्यार्थी संख्या घटत चालली आहे? याला जबाबदार कोण? आपल्या ग्रंथालयाचा वेळ का वाढवत नाही? आम्ही जेव्हा मागणी केली की वाचन कक्षाची वेळ वाढवा, कारण आयडॉलचे विद्यार्थी नोकरी करून अभ्यास करायला येतात. त्यांना आपण वाचनासाठी वेळ दिला पाहिजे, व्याख्याने कधी योग्यरित्या होत नाही. त्याच्यामुळे आपण आयडॉलवर गांभीर्याने विचार करावा. आणि आयडॉलसाठी आपली जी महाविद्यालये आहेत त्याच्यामध्ये आपल्या आयडॉलच्या परीक्षा झाल्या पाहिजेत आपल्या आयडॉलमध्ये ऑनलाईन प्रक्रिया नाही. विद्यार्थ्यांना काहीही ऑनलाईन मिळत नाही. ऑनलाईन फॉर्म भरायचा असेल तर तो ४ ते ५ वेळा फॉर्म अपलोड करावा लागतो. विद्यार्थ्यांना अनेक त्रास, अडचणी येतात त्या समस्या सोडविल्या पाहिजेत. श्री. प्रदिप सांवत यांनी सदर चर्चेत सहभाग घेताना सांगितले की, आयडॉलमध्ये अभ्यास साहित्याची समस्या आहे. यावर आजपर्यंत उपाय का निघत नाही ते कळत नाही. दरवेळी प्रवेश झाल्यानंतर कमीत कमी ७ ते ८ महिन्यानंतर अभ्यास साहित्य बाबत विद्यार्थ्याला उत्तर दिले जाते की, अभ्यास साहित्य सॉफ्टकॉपी उपलब्ध आहे, मुंबई विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांना आयडॉलच्या ऑफलाईन परिक्षेबाबत अधिसभा सदस्यांना फोन करावा लागतो की, आयडॉलला परिक्षेला केंद्र दया.

तुमच्याकडून संदेश गेला पाहिजे. त्यांच्या काही परीक्षा असतील तर एकत्रित न करता त्यांनी आयडॉलसाठी केंद्र दिले पाहिजे. बोरीवलीचा विद्यार्थी अंधेरीला येवून परिक्षा देतो का तर बोरीवलीला केंद्र नाही. विद्यार्थ्यांकडून आपण पुर्ण फी घेतो आहे. अभ्यास साहित्य कसे वेळेत उपलब्ध होईल, ते बघा. श्री. मिलींद साटम यांनी सांगितले की, आयडॉलचा विषय खुप गंभीर आहे. ॲड. वैभव थोरात यांनी ज्या गोष्टी मांडल्या त्या खुप संक्षिप्त रूपात मांडल्या. ज्या पध्दतीने नविन अभ्यासक्रम यायला पाहिजेत त्याच्यबरोबर पद्धतीत बदल होणे ही काळाची गरज आहे. आयडॉलसारख्या दूरस्थ शिक्षण संस्था महत्वाच्या असल्यामुळे भवितव्य खूप चांगले आहे. आपण सगळयांनी त्यांना जोरदार पाठिंबा दिला पाहिजे. त्याच बरोबर त्याच्या प्रशासकीय प्रक्रिया आणि शैक्षणिक प्रक्रीयेवर प्रशासनाने जातीने लक्ष देणे, फार गरजेचे आहे. डॉ. सुप्रिया करंडे यांनी सांगितले की, जेव्हा विद्यार्थी आयडॉलला प्रवेश घ्यायला येतात, त्यावेळेला त्यांना लिंकची मोठी समस्या असते. खुप वेळा त्यांना लिंक मिळत नाही. लिंक मिळाल्यानंतर त्यांनी नोंदणी केल्यानंतर त्यांना त्यांचे पैसे भरायला मिळत नाहीत आणि पैसे भरल्यानंतर त्यांच्या खात्यामधुन पैसे वजा होतात पण ते भरल्याचे दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपली नोंदणी झाली आहे असे वाटते आणि जेव्हा परीक्षा जवळ येते त्यांना हॉलतिकीट मिळत नाही तेव्हा ते धावपळ करतात. तेव्हा त्यांना समजते की, त्यांची नोंदणी झाली नाही. म्हणजे आपल्याला ते तंत्रज्ञान अद्ययावत करण्याची गरज आहे. श्री. सुधाकर तांबोळी यांनी सांगितले की, परीक्षा भवन आणि आयडॉलमध्ये 'क्युआरएस मशिन' लावल्या होत्या आणि त्यामधुन विद्यार्थ्यांना सगळी माहिती मिळत होती. त्या आता धुळ खात पडलेल्या आहेत. ज्या कपंनीकडून घेतल्या त्यांच्याकडून त्याची देखभाल का केली जात नाही. अभ्यासक्रमाच्याबाबतीत जे अभ्यास साहित्य दिले जाते ते चुकीच्या पध्दतीने दिले जाते. पुस्तके रद्दीमध्ये काढली जातात. हा पैशांचा अपव्यय आहे. तसेच संबंधीतांवर कारवाई करण्याची विचारणा केली. डॉ. वैभव नरवडे यांनी सांगितले की, श्री. प्रदिप सावंत यांनी जो उल्लेख अभ्यास साहित्य संदर्भात केला. आपल्या मुद्रणालयात बरेचसे अभ्यास साहित्य मुद्रित होते. तीन-चार महिन्यांचा कालावधी कमी पडत असल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य उशीरा मिळते. विद्यार्थ्यांना जेव्हा अभ्यास साहित्य मिळते, तेव्हा ते आधीच उत्तीर्ण झालेले असतात. त्यांचा अभ्यासक्रम संपलेला असतो. ही कमतरता कशी भरुन काढता येईल, अशी विचारणा केली. प्र-कुलगुरू यांनी संगितले की, सन्मानीय सदस्यांची आयडॉलबाबत असणारी कळकळ महत्वाची आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्यादृष्टीने आयडॉलसाठी खूप चांगला विकास मागील ३ ते ४ महिन्यात झाला आहे. आयडॉलच्या विस्ताराबाबत जी समस्या होती ती NAAC cycle III accreditation A++ grade मुळे निकाली लागली आहे. त्यामुळे त्याकाळात जो संभ्रम होता तो दूर झालेला आहे. २०२०-२१ मध्ये सगळीकडेच नावनोंदणी कमी आहे. आता सगळेच पोर्टल सुरू झालेले असून बरेचसे प्रवेश व्हायचे आहे. आता आपण ३० हजारचा आकडा पार केलेला आहे. आयडॉलचे

सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून उपपरीसर मंडळाची एक बैठक घेतेलेली होती. आपल्याकडे रत्नागिरी व ठाण्याला आयडॉलचे उपकेंद्र आहे. सिंधुदुर्ग सावंतवाडीला उद्घाटन झाले आहे आणि त्या उपकेंद्रामध्ये कोणते अभ्यासक्रम सुरू केले पाहिजेत त्यासाठी प्राध्यान्य आयडॉलला दिले आहे, सांवतवाडीला काही अभ्यासक्रम यावर्षीपासून सुरू होत आहेत. पालघरला श्री. प्रदिप सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे पालघरसाठी विद्यार्थ्यांना सोनोपंत दांडेकर महाविद्यालय उपकेंद्र म्हणून उपलब्ध केले आहे. उपकेंद्र त्या भागातील सगळया महाविद्यालयांशी व्यवस्थित संपर्क साधेल, ज्यामुळे परीक्षा केंद्रामध्ये जो काही त्रास/ अडचणी येतात त्या नक्कीच सुटतील. त्यामुळे आपण ब-यापैकी विकेंद्रीकरण स्थितीमध्ये जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करत आहोत. ठाणे, रत्नागिरी, सिंधुदूर्ग आणि पालघरच्या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये, माध्यमांमध्ये आयडॉलची प्रसिद्धी करत आहोत त्यामुळे तिथे चांगली विद्यार्थी संख्या वाढेल. एका अभ्यासक्रमाला किमान दोन प्राध्यापकांची आवश्यकता असते. प्राध्यपकांच्या सगळया जागा मान्य झाल्या आहेत. सध्या ३३ प्राध्यापक कार्यरत आहेत. पूर्वीच्या रेडियो मस्टला पुनर्रूजिवित केलेले आहे. भविष्यातले दूर शिक्षण ऑनलाईन पध्दतीने होणार आहे, त्यात आयडॉलचा खुप मोठा सहभाग असेल. आंतरराष्ट्रीय दूरस्थ शिक्षणाचा जागतिक स्तरावर मोठा परिणाम होणार आहे. त्यामुळे आयडॉलचे महत्व वाढणार आहे. अभ्यास साहित्यासाठी आपण कोणतेही शुल्क आकारत नाही. अभ्यास साहित्त्यामधील ज्या काही चुका होतात, त्या संदर्भात आयडॉल संचालकांनी सगळया प्राध्यापकांच्या विषय निहाय बैठका घेतल्या आहेत आणि त्यादृष्टीने चुका दूर करण्याच्या प्रयत्न केले आहेत. आयडॉलमध्ये नविन अभ्यासक्रमाबाबत विद्यापरिषदेने मान्यता दिली आहे. आपण ए.आय.सी.टी.ची परवानगी घेवून 'मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज' सुरु केले आहे. एम.एम.एस. ला ७२० विद्यार्थ्यांना परवानगी दिलेली आहे. मास्टर ऑफ कॅम्युटर ॲप्लीकेशनला २ हजार विद्यार्थ्यांना परवानगी दिलेली आहे. ४५ अभ्यासक्रम प्रस्तावित आहेत. त्यादृष्टीने लागणारा शिक्षक, कर्मचारीपण वेगवेगळया विभागामधून मान्य केला आहे. आयडॉल मुंबई विद्यापीठाच्यादृष्टीने महत्वाचा घटक आहे. त्यादृष्टीने गेल्या ६ महिन्यात आयडॉलवर खूप लक्ष देण्यात आलेल आहे. आपण काही 'दूरस्थ शिक्षण संस्थेचे तज्ञ बोलविले त्यातून खूप चांगल्या सूचना आल्या आणि त्या सूचनांच्याआधारे आयडॉलपुढे जात आहे. मा. कुलगुरू म्हणाले की, या कोरोनामुळे भविष्यातले शिक्षण हे 'ब्लेंडेड मोड' असणार आहे. त्यादृष्टीने सगळयात मोठी सुविधा मुंबई विद्यापीठामध्ये आयडॉलच्या रूपात आहे. आता केवळ दूरस्थ शिक्षणाच्या जोडीला आपण ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करायला पात्र आहोत. त्यासाठी आयडॉलचे स्वतंत्र आयटी प्लॅटफॉर्म असणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने आयडॉल संचालकांना सूचना दिलेल्या आहेत. त्यासंबधी तज्ञांचे मार्गदर्शन पण घेतलेले आहे. त्या पध्दतीने आयडॉलचे शिक्षण आणि ती संख्या अधिक कशी वाढविता येईल हे पाहिले जाईल. चांगले शिक्षक, चांगले साहित्य सामग्री आणि त्याचा स्वतंत्र आय.टी. व्यासपीठ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु

झाले असून यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व काही केले जाईल. ॲड. वैभव थोरात यांनी याबाबत असमाधान व्यक्त करताना सांगितले की, आम्ही जे १०-१२ अभ्यासक्रम सुचविले होते, त्यापैकी फक्त एकच सुरु झाला असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी जहिरात करण्यासाठी आर्थिक तरतूद फक्त ५ लाखांची असून जी आता १२ लाखापर्यंत केली आहे, जी कमी आहे. महाविद्यालयांना संलग्नता देताना आयडॉल केंद्र घेण्याची अट टाकली पाहिजे. आपल्याकडे चांगले ग्रंथालय, कर्मचारी संख्या, वाचन कक्ष इ. सुविधा होणे आवश्यक आहे, असे अनेक विषय मांडले. यावर उत्तर देताना मा. प्र-कुलगुरूंनी स्पष्ट केले की, आता अभ्यासक्रमात बदल झाला आहे. वार्षिक परीक्षांच्या ऐवजी आता सत्र परीक्षा आहे. परंतु त्या दोन्ही प्रकारच्या शैक्षणिक साहित्याची एक सॉफ्टकॉपी आणि एक छापील प्रत देणार आहोत. केवळ परीक्षा पद्धतीत बदल झाल्यामुळे काहीसा विलंब झाला आहे. यावर बोलताना श्री. प्रदिप सावंत यांनी शैक्षणिक साहित्य मिळण्यास कमालीचा विलंब झाल्याबद्दल गेल्यावर्षीचा अनुभव सांगितला. त्यावर मा. प्र-कुलगुरूंनी यापुढे असे होणार नाही याची ग्वाही दिली. श्री. प्रदिप सावंत यांनी यु.जी.सी.च्या पुनर्रमान्यतेची वाट न बघता नोंदणी सुरू केल्यास पुरेसे विद्यार्थी मिळतील अन्यथा खूप उशिर होईल असे सुचविले, मा. प्र-कुलगुरूंनी नियमित महाविद्यालयाचे आणि आयडॉलचे शैक्षणिक वर्ष यात फरक असून त्यांचे नियमही वेगळे आहेत. कोरोना महामारीमुळे कदाचित आपल्याला नोव्हेंबरपर्यंत नोंदणी प्रक्रिया सुरू करता येईल असे प्र-कुलगुरूंनी आश्वासित केले. श्री. सुधाकर तांबोळी यांनी बदललेल्या तंत्रज्ञानाचा मुद्दा सांगताना जुनी मशीन्स, तंत्रज्ञान यावर लाखो रुपये वाया गेले कारण थोड्याच वर्षात ह्यामध्ये बदल करण्यात आला आहे. त्यामुळे शिस्त आणि कार्यवाही त्या दोन्ही गोष्टी जोपासल्या पाहिजेत, अशा सूचना केल्या. प्र-कुलगुरूंनी यावर उत्तर देताना, आयडॉलसाठी स्वतंत्रपणे संचालकाची नियुक्ती करण्यात आली आहे, असे सभागृहाला सांगितले. श्री. महादेव जगताप यांनी शैक्षणिक साहित्य उशिरा मिळत असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित करताना सॉफ्ट कॉपीवरून विद्यार्थ्याला अभ्यास करणे कठीण जाते हे स्वानुभवातून सांगितले. ॲड. वैभव थोरात यांनी नवीन होऊ घातलेले किती अभ्यासक्रम आहेत याबाबत विद्यापीठाकडून माहिती सादर करावी, अशी मागणी केली. उत्तर देताना १४ नवीन प्रस्तावित अभ्यासक्रम आहेत आणि एम.एम.एस., भूगोल, बी.कॉम. अकाउंटस अँड फायनास एम.सी.एच. असे ४ अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत असे एकूण १७ अभ्यासक्रम होतात अशी माहिती देऊन प्र-कुलगुरूंनी ॲड. वैभव थोरात यांना त्याचा स्थगन प्रस्तान मागे घेण्याचे आवाहन केले. त्यावर आयडॉलच्या विद्यार्थी संख्यावाढीबद्दल नाराजी व्यक्त करून इतर मुक्त विद्यापीठाची तुलना करताना आपण कसे मागे आहोत हे आकडेवारी देऊन सांगितले आणि संचालकांनी याचे उत्तर द्यावे, अशी जोरदार मागणी केली. आयडॉलचे संचालक सभागृहात का उपस्थित नाहीत, अशी विचारणा करून ॲड. वैभव थोरात आणि श्री. सावंत यांनी त्याचे ठोस कारण सांगण्याचा आग्रह धरला. इतर स्वायत्त आणि खाजगी विद्यापीठ येत असल्यामुळे आपल्यापुढे मोठे आव्हान असल्याबाबत जागरुक राहणे आवश्यक असल्याचेही सांगितले. इतर विभागाचे प्रमुख हजर

असतानासुध्दा आयडॉलचे संचालक गांभीर्याने हा विषय घेत नाहीत, असा आरोप आणि अनुपस्थितीबाबत नाराजी व्यक्त केली. त्यानंतर मा. अध्यक्षांनी, संचालकांनी आवश्यक ती माहिती दिलेली आहे आणि त्यांच्या वैयक्तिक अडचणींमुळे ते आता हजर नाहीत, परंतु पुढे असे होणार नाही याचे आश्वासन सभासदाना दिले. त्यावर ॲड. वैभव थोरात यांनी आयडॉलसाठी आर्थिक तरतूद अत्यंत कमी आहे या बाबतीत, जरूर विचार केला जाईल असे अध्यक्षांनी सभागृहाला असे आश्वासित केले. तसेच इतर खाजगी विद्यापीठ किंवा संस्था यांच्याशी आपली तुलना होऊ शकत नाही आपल्याला परिक्षेत्राची मर्यादा आहे. परंतु आपल्यापरीने करता येईल तेवढे चांगले आपण करणार आहोत असे सांगितले. श्री. प्रदीप सावंत आणि ॲड. वैभव थोरात यांनी संलग्नित महाविद्यालयांना असे केंद्रर सुरू करण्याबाबत सक्ती करावी अशी पुन्हा मागणी करून निश्चित आश्वासन देण्याची विनंती केली. त्यानंतर मा. प्र-कुलगुरूंनी संलग्नता देताना ही अट मांडली जाईल, असे सांगितले. श्री. राजन कोळंबेकर यांनी प्रवेशासाठीच्या जुलै आणि जानेवारीच्या बॅचसंबंधी माहिती मागितली. डॉ. सुप्रिया करंडे यांनी गेल्या चार वेळा आयडॉलवर स्थगन प्रस्ताव आले आहे, याचे गांभीर्य ओळखून विचार केला पाहिजे असे सांगितले. पालघरसह सर्वच केंद्रे आणि महाविद्यालयांमध्ये ह्या गोष्टी सुरु झाल्या पाहिजेत आणि कृती अहवाल येणे अपेक्षित असल्याचे सांगितले. मा. प्र-कुलगुरूंनी आयडॉलच्या विविध केंद्राची माहिती देऊन सदस्यांना पुन्हा एकदा आश्वासित करून कार्याला कशी गती आलेली आहे. त्याचे विवेचन केले आणि २०२२ चे उद्दिष्टही सांगून यापुढे अशा प्रकारचा स्थगन प्रस्ताव आणायची वेळ येणार नाही आणि युजीसीच्या परवानगीने नवीन प्रस्तावित अभ्यासक्रम सुरू होतील आणि ॲड. वैभव थोरात यांच्या पूर्णवेळ प्राध्यापक संदर्भात आणि आर्थिक तरतूद वाढविण्यासंदर्भात बोलताना मा. कुलगुरूंनी ज्या काही सूचना असतील त्या संबंधित समिती समोर ठेवण्यात येतील त्यामध्ये आर्थिक तरतूद वाढविणे, नविन नियुक्त्या यांचा समावेश आहे. ग्रंथपालाची स्वतंत्रपणे नेमणूक करण्यासंदर्भातली सूचना मा. प्रकुलगुरूंनी नोंद करून घेण्यात येईल असे सांगितले. ॲड. वैभव थोरात यांच्या स्थगन प्रस्तावामधल्या परीक्षा घेण्यासंबंधी संबधित महाविद्यालयाच्या केंद्राला सांगता येऊ शकते, असे परीक्षा विभाग संचालक डॉ. विनोद पाटील यांनी उत्तरामध्ये सांगितले. सर्व चर्चेअंती ॲड. वैभव थोरात यांनी केलेल्या सूचना आणि मांडलेले मुद्दे केवळ पटलावर न ठेवता त्यावर योग्य ती कार्यवाही होईल हे आश्वासन मान्य करून सदर स्थगन प्रस्ताव मागे घेत असल्याचे सांगितले.

ॲड. वैभव थोरात यांनी खालीलप्रमाणे त्यांचा दुसरा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. प्रदिप सावंत यांनी अनुमोदन दिले.

*२. स्थगन प्रस्ताव*

*आपण विद्यार्थ्यांच्या पैश्यामधून महागड्या व चैनीच्या गाड्यांची खरेदी करून आपण गोरगरीब विद्यार्थ्यांच्या पैश्यांचा गैरवापर केला असून या गैरप्रकाराबाबत लक्ष वेधण्यासाठी सदर सभागृह स्थगित करण्यात यावे.*

मा. अध्यक्षांनी याआधीच्या अधिसभेमध्ये याला उत्तर दिलेले आहे, त्यामुळे पुन्हा-पुन्हा तोच विषय आणू नये असे आवाहन केले. श्री. प्रदिप सावंत यांनी वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या आणि मा. मंत्री महोदयांनी त्यावर दिलेली प्रतिक्रिया याविषयी माहिती विचारली. परंतू प्र-कुलगुरूंनी यांचे उत्तर आधीच दिलेले असल्याने नियम ८ (घ) च्या नुसार नाकारण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. यालाच दुजोरा देताना एकाच अधिसभेमध्ये या सगळ्यांची उत्तरे दिली गेली असल्याने आणि व्यवस्थापन परिषदेमध्ये तसा ठराव झाल्यानंतर आता तो विषय पुन्हा चर्चेला घेऊ नये, असे आवाहन केले. ॲड. निल हेळेकर यांनी याविषयी चर्चेदरम्यान आपले मत मांडताना यासंदर्भात आर्थिक तरतूद वाढविण्याची प्रक्रिया यावर चर्चा झाली. कोणीही कुठल्याही प्रकारे प्रश्न उपस्थित केले नाहीत किंवा आक्षेप नोंदवलेला नव्हता. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयाला आपण बांधिल असले पाहिजे, अशी माहिती दिली. परंतू सदर चर्चा ही शासन निर्णय निघण्याच्या आधीची होती म्हणून या सभागृहात त्यावर चर्चा करायला काय हरकत आहे? असा मुद्दा श्री. प्रदीप सावंत यांनी उपस्थित केल्यावर मा. अध्यक्षांनी त्यावर स्पष्टीकरण देताना सांगितले की, सगळे काही चर्चा, निर्णय होऊन झालेले असेल आणि तरीही सदस्यांना त्यांचे समाधान होत नसेल तर प्रशासन किंवा महामहिम राज्यपालांकडे तशी तक्रार करण्यास प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. अध्यक्षांनी आदेश दिल्यानंतर यावर कृपया चर्चा करू नये, अशी विनंती केली. पण श्री. प्रदिप सावंत, श्रीमती शितल देवरुखकर-शेठ, ॲड. वैभव थोरात यांनी शासन प्रतिनिधींकडून उत्तर देण्याचा आग्रह धरला. प्र-कुलगुरू त्यांना तसे करू नये, हे सांगत होते. जोपर्यंत चर्चा होणार नाही तोपर्यंत आमच्या विषयावर ठाम राहू आणि इतर कामकाज होऊ देणार नाही आणि सभागृहाचे कामकाज रेटून नेऊ नये, असे श्री. प्रदिप सावंत, श्रीमती शितल देवरुखकर-शेठ, ॲड. वैभव थोरात यांनी सांगितले. श्री. सुधाकर तांबोळी यांनी वर्तमान चर्चेचा मुद्दा प्रलंबित ठेवून पुढच्या विषयावर चर्चा सुरू करावी, अशी मागणी केली. परंतू ॲड. वैभव थोरात यांनी त्याला विरोध करत म्हटले की, इतर विषयांना पण प्रलंबित ठेवायला सांगितले तर काय होईल असे म्हणून आपली मागणी लावून धरली आणि डॉ. सुरेश मैंद यांनी व्यवस्थापन परिषदेमध्ये झालेल्या निर्णयाचा संदर्भ देण्याचा प्रयत्न केला, मा. अध्यक्षानी, शासन प्रतिनिधी यावर उत्तर देतील असे जाहीर करून इतर सदस्यांना थांबण्याची विनंती केली. श्रीमती. सोनाली रोडे, सह-संचालक उच्च शिक्षण यांनी महागड्या गाड्यांची खरेदी आणि तथाकथित गैरवापराचा आरोप यावर विचार करून शासनातर्फे याची संपूर्ण चौकशी केली जाईल असे सांगितले. मा. अध्यक्षांनी सांगितले की, शासनाच्यावतीने श्रीमती. सोनाली रोडे, सह-संचालक उच्च शिक्षण संचालनालय यांनी सांगितले असेल तर माझा आक्षेप नाही परंतू मी जो निर्णय दिला आहे त्यात काही बदल होणार नाही असे स्पष्ट केले. श्री. प्रदिप सावंत यांनी शासन प्रतिनिधीचे उत्तर रेकॉर्डवर घेण्याचा आग्रह धरला. ॲड. निल हेळेकर यांनीही दुजोरा सांगितले की, जी काही चर्चा स्थगन मांडण्यापासून उत्तर देण्यापर्यंत झाली, ते सर्व

रेकॉर्डवर येणारच आहे. त्यामुळे नोंदवून घ्या असे म्हणण्याची गरजच नाही तो इतिवृत्ताचा नक्कीच भाग असणार आहे. हे निदर्शनास आणून दिले. मा. अध्यक्षांनीही आपले विचार व्यक्त करताना, आपल्या सगळ्यांचे उद्दिष्टेही विद्यापीठाचा विकास हाच आहे. त्यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. स्थगन प्रस्तावामध्ये आलेला विषय हा आधी चर्चेला येऊन त्यावर निर्णय झालेला होता एवढेच म्हणणे होते. माहिती न देणे किंवा चुकीची माहिती देणे असे काही झालेले नाही. प्रत्येकाच्या प्रश्नांना उत्तर दिलेली आहेत. शासनाकडून आलेल्या पत्रालाही उत्तर पाठवले आहे. महामहीम राज्यपालांनाही याविषयी कळविण्यात आले आहे, प्रस्ताव फेटाळला असा अर्थ कोणी घेऊ नये, असे आवाहन केले.

श्री. प्रदिप सावंत यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. राजन कोळंबेकर यांनी अनुमोदन दिले.

### *३. स्थगन प्रस्ताव*

*महाराष्ट्र शासनाने मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात 'मास्टर दिनानाथ मंगेशकर शासकीय संगीत महाविद्यालय' याकरिता जागा उपलब्ध करून देण्याची मागणी फेटाळून संबंधित विद्यार्थ्यांना चांगल्या शिक्षणापासून वंचित ठेवणे तसेच विद्यापीठाच्या भोंगळ कारभाराकरिता सभागृह तहकूब करण्यात यावे.*

श्री. प्रदिप सावंत यांनी आपला स्थगन प्रस्ताव मांडताना पुढील मुद्दे उपस्थित केले. महाराष्ट्र शासनाने मुंबई विद्यापीठाच्या कलीना परिसरात संगीत महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. परंतू विद्यापीठाने ती फेटाळली यामुळे संगीत क्षेत्राबाबत जे मार्गदर्शन मिळणार होते ते मिळणार नाही आणि इतरही विषयासंदर्भातले मुद्दे आहेत, त्यासाठी काही वेळ हे सभागृह स्थगित करावे, अशी विनंती केली. त्याप्रमाणे आपला स्थगन प्रस्तावातील मंगेशकर महाविद्यालयाबाबत बोलताना श्री. प्रदिप सावंत यांनी तपशिलवार विवेचन केले. शासनाने स्वतः खर्च करून शासकीय महाविद्यालय विद्यापीठ उपपरिसरात बांधण्याचा मानस व्यक्त केला. तेव्हा व्यवस्थापन परिषदेने तो राजभवनकडे पाठवला. विद्यापीठ किंवा आपले इतर उपकेंद्र यांची जागाही शासनामुळेच प्राप्त झाली आहे. राज्यपाल हे आपले मार्गदर्शक जरूर आहेत, परंतु विद्यापीठाने प्रत्येक गोष्टीसाठी राजभवनाचा विषय पुढे आणणे कितपत योग्य आहे? प्रत्येक बाबतीत त्यांचा सल्ला घेणे असा विषय असेल तर मग एस.आर.ए.च्या बाबतीतपण आपण त्यांना तशी माहिती पुरवली असली पाहिजे. एम.एम.आर.डी.ए. ला किंवा आयटाला जमीन देण्याबाबत राजभवनाला कळवले नव्हते. आत्ताच हे सर्व राज्यपालकडे कशासाठी पाठवले मुंबई विद्यापीठ संचालित जर संगीत महाविद्यालय झाले तर संपूर्ण भारतातून विद्यार्थी येतील. मंगेशकर कुटुंबीयां-व्यतिरिक्त ज्या अनेक तज्ञांची समिती आहे. त्यामध्ये श्री. ए.आर. रहमान, श्री. सुरेश वाडकर,

श्री. झाकीर हुसेन, अशी मोठी मंडळी आहेत. यांचे मार्गदर्शन आपल्याला लाभले असते. परंतु या प्रस्तावाचा आपण शासनाकडे पाठपुरावा केलेला नाही, व्यवस्थापन परिषदेमध्ये बोलताना मी दोन्हीकडे पाठपुरावा करावा, असे म्हटले होते. परंतु विद्यापीठाने हा प्रस्ताव परस्पर राज्यपालांकडे पाठवला. विकास प्रकल्प किंवा योजना सुरू असल्याने त्यावर निर्णय होत नाही. आता असलेल्या संगीत विभागामध्ये दिडशेपेक्षा कमी मुले आहेत, ही संख्या वाढली असती त्याचबरोबर आर्थिक भार देखिल शासन उचलणार होते, असे मत व्यक्त केले. सदर प्रस्तावाला अनुमोदन देणारे सदस्य श्री. राजन कोळंबेकर यांनी यावर भाष्य करताना अनेक संस्थांनी जागा मागितल्या काहींना दिल्या गेल्या म्हणजे कर आपण भरायचा आणि व्यावसायिक वापर इतरांनी करायचा, हे बरोबर नाही असे सांगत राजभवनाला पाठविलेल्या प्रस्तावाचा पुनःश्च विचार करावा, असे सांगीतले. श्री. मिलिंद साटम यांनीही आपले विचार मांडताना शासनाची विद्यापीठाला अनेक बाबतीत चांगल्यापैकी मदत होत असते. ही बाब लक्षात घेऊन मोठे संगीत घराणे मंगेशकर कुटुंबियांना यासोबत जोडल्याने हा एक चांगला प्रस्ताव आहे. विद्यापीठासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. म्हणून कौशल्याला-उद्योगाची जोड मिळाली तर विद्यार्थी उपलब्ध होऊन विद्यापीठाला त्याचा फायदाच होईल. तसेच बॉलिवूड इंडस्ट्रीचाही फायदा करून घेता येईल. त्यामुळे तो प्रस्ताव मान्य करावा, अशी ही विनंती आपल्या निवेदनाच्या शेवटी केली. याच प्रस्तावावर श्रीमती शितल देवरुखकर-शेठ यांनीही आपले मत मांडताना महान संगीतकारांच्या नावाने एखादी संस्था उभी रहात असेल तर त्याला आपण सहकार्य केले पाहिजे. इतर संस्थांना दिल्याप्रमाणे या महाविद्यालयात जागा का देत नाही असे श्री. महादेव जगताप यांनी विचारले, यु.जी.सी.च्या बाबतीत असलेले मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे आपल्याला शासनाकडे जावे लागेल. त्यामुळे अशा एका महत्वाच्या प्रस्तावाला अनुमती देऊन मंगेशकर परिवाराचा उचित सन्मान करावा असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाला केले. श्री. प्रविण पाटकर यांनीही त्यांची भूमिका मांडताना शासन आणि राज्यपाल यांच्यामधला विषय इथे येता कामा नये. शासनच शासनाची जागा मागत आहे. जो प्रस्ताव आला त्यावर शासन आणि महामहिम राज्यपालांशी व्यवस्थित पत्र व्यवहार करणे गरजेचे होते. एखाद्या गोष्टीला विलंब झाला की, पुढे त्याचे महत्व उरत नाही. त्यामुळे यावर योग्य त्या कृतीची आवश्यकता असल्याचे सांगितिले. श्री. सुधाकर तांबोळी यांनी सूचना मांडताना जागेचा आणि संगीत महाविद्यालयाचा प्रश्न आपण आपल्याकडे असलेल्या संगीत विभागाचा विस्तार करून त्यासाठी थोडी मोठी जागा उपलब्ध करून हे करू शकतो, असे मत व्यक्त केले आणि त्यासाठी एक समिती करावी अशी सूचना केली. तसेच यापुढेही जागेची मागणी अनेक संस्था आणि प्रत्येक सरकारकडून येण्याची शक्यता लक्षात घ्यावी. त्यामुळे उपलब्ध साधन-सामुग्रीचा आधी वापर झाला पाहिजे आणि त्याचा विकास झाला पाहिजे, असे सांगितले. डॉ. सुप्रिया करंडे यांनी याविषयावर भाष्य करताना अधिसभा सभागृह हे राजकीय व्यासपीठ नाही. आपल्याकडे येणारा विद्यार्थी हा गरीब आणि होतकरु आहे,

त्यामुळे त्याच्या संगीतज्ञानाला व्यापकतेची जोड मिळाली तर चांगलेच होईल. त्यामुळे शासनाच्या सूचनेचा आपण आदर केला पाहिजे, असे सांगितले. राजकीय गोष्टी बाजूला ठेवून आणि विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून पुढे गेले पाहिजे, त्यामुळे शासनाच्या सदर प्रस्तावांचा सकारात्मक विचार झाला पाहिजे, असे डॉ. सुप्रिया करंडे यांनी सांगितले, सर्व राजकीय गोष्टी बाजुला ठेवून विद्यार्थी हितासाठी सगळयांनी सकारात्मक राहिले पाहिजे. आपल्याकडे असलेल्या विविध इमारती आणि मालमत्ता, बजाज भवन, संस्कृत भवन इ. ची अवस्था फारशी चांगली नाही. यामध्ये कोणी जबाबदारी घेत असेल विकास करून देत असेल तर आपण ते स्विकारले पाहिजे. श्री. सुधाकर तांबोळी यांनी सांगितले की, शासन प्रस्ताव देत असेल तरी आपण त्याचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे पण जागा शक्यतो देऊ नये. शासनाने यासाठी इतर ठिकाणची जागा वापराची किंवा उपलब्ध करून द्यावी. याच विषयाला जोडून श्री. धनेश सावंत यांनी मंगेशकर महाविद्यालयाच्या विषयाबाबत काय माहिती उपलब्ध झालेली आहे? त्याची अर्थसंकल्पीय तरतूद कशा रीतीने करण्यात आलेली आहे? असे प्रश्न उपस्थित करून विद्यापीठाच्या जागेवरच्या अतिक्रमणाबाबतही विचार करायला हवा असे सूचित केले. त्याचबरोबर मंगेशकर हे खूप मोठे नाव असले तरी आपल्याकडेही संगीत विभाग आहे एखाद्या मोठ्या प्रकल्पामुळे आपले विभाग आणि आपले कर्मचारी यांचाही विचार होणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात विद्यापीठाच्या म्हणून काही योजना असणारच आहेत. त्यामुळे असणाऱ्या इमारतीची देखभाल दुरुस्ती आणि त्याचे वेळोवेळी परीक्षण होणे, ह्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत असे सांगीतले. मंगेशकर कुटुंबियांचा (MOU) प्रस्तावित असेल तर त्याचा जरूर विचार करावा असे अनुमोदनही दिले. डॉ. सुरेश मैंद यांनी या विषयावर बोलताना हा नविन महाविद्यालयाचा प्रस्ताव अटीरहित असला पाहिजे किंबहुना आपले वर्तमान विभागाला अधिक सक्षम बनविणेच आज महत्त्वाचे आहे. रानडे भवन, ज्ञानेश्वर भवन आणि इतर विभागाचे अस्तित्व अबाधित राहून त्यांचा कसा विस्तार होईल हे पाहिले पाहिजे. आताच्या संगीत विभागासाठी स्वतंत्र इमारतीची व्यवस्था केली तर त्याचा फायदा होईल. ॲड. निल हेळेकर यांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ कलम ५ चा आधार घेऊन आपण स्वतंत्रपणे काम करत असलो तरी शासन आणि मा. कुलपतींची आपण वेळोवेळी मदत घेऊ शकतो त्यामुळे विद्यापीठाबाबतचे जे प्रश्न असतात त्यासाठी मदत होऊ शकते. कारण कलम ९ खाली तसे अधिकार मा. कुलपतींना देण्यात आले आहेत. तसेच केवळ देणगी देऊन कोणीतरी त्यांच्या नावाने एखादी वास्तू उभी करण्याचा प्रयत्न करत असेल तर आपल्याकडच्या सांस्कृतिक केंद्राच्या संगीत विभागाला त्याचे नाव देऊन केले तर, योग्य होणार नाही का? असा प्रश्न विचारून आपले विविध विभाग अधिक सक्षम करणे आवश्यक आहे, तसेच मा. कुलपतींकडे एखादी गोष्ट मार्गदर्शनासाठी पाठविणे काही गैर नाही. त्यामुळे हा विलंब मुद्दामहून केलेला आहे असे वाटत नाही. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या निर्णय हा योग्यच होता. इतर सन्माननीय सदस्यांनीही यावर अधिक प्रकाश टाकावा अशी भूमिका मांडली. या वक्तव्यानंतर

श्री. प्रदिप सावंत यांनी सहमती व्यक्त करतानाच मे महिन्यापासून ऑक्टोबरपर्यंत झालेला विलंब, त्यामुळे राजकीय दबाव यामध्ये येतो आहे. या मतावर ठाम राहणे, व्यवस्थापन परिषदेतील चर्चा असे विविध मुद्दे उपस्थित केले आणि शेवटी सांगितले की, शासनाने विद्यापीठावर अधिकार गाजवलेला नसून विनंती केली आहे, त्याला विहित वेळेत उत्तर दिले पाहिजे. श्री. मिलिंद साटम यांनी, राज्यपालांनी निरीक्षण करणे, चुकत असेल तर तिथे लक्ष घालणे, हे राज्यपालांचे काम आहे. परंतु विद्यापीठाला निर्णय घेण्याचे सर्व अधिकार स्वायत्ततेमुळे प्राप्त झालेले आहेत त्यामुळे काही संभ्रम असेल तेव्हाच मार्गदर्शन घेणे योग्य ठरेल. डॉ. सोनाली रोडे, सहसंचालक, उच्चशिक्षण संचालनालय, मुंबई विभाग यांनी आपले मत व्यक्त करताना वृत्तपत्रामधून S.R.A. चा विषय छापून आलेला आहे. त्यामध्ये विद्यापीठाची जागा ही शासकीय जागा आहे तेव्हा त्या ठिकाणी अतिक्रमण झाल्यानंतर कायदेशिर समुपदेशक घेऊन आपण शासनाला कळविले होते काय? तसेच जागांची नवीन नांवे पुढे येत आहेत त्यासाठी पण शासनाची परवानगी लागते. राजपत्र भाग ८ च्या ५ व्या खंडामध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की, एखादी नवीन गोष्ट उभी करायची असेल तर शासनाची परवानगी घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आपण चर्चा करत असलेल्या संगीत महाविद्यालयाची सुरुवात झाली, तर ती विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असेल, त्यामुळे या प्रसावाला मान्यता देण्यात यावी, असे शासनाच्यावतीने सांगितले. शिक्षण सहसंचालकांनी मांडलेली भूमिका मान्य करतानाच जागा जरी शासनाची असली तरी विद्यापीठ हे विद्यार्थी हितासाठी म्हणून काही वेगळा विचार करू शकते. केवळ शासनाने मागीतली म्हणून दिली असे होता कामा नये. नविन विभाग सुरु करण्यासाठी जागा असणे आवश्यक आहे. महामहिम राज्यपाल महादेयांकडे आपला प्रस्ताव पाठविणे, हे आपली पालक संस्था म्हणून योग्यच आहे, असे सांगताना प्राचार्य रोकडे यांनी संगीत कलेबाबत अनुभव कथन करताना पुणे विद्यापीठाने त्या संदर्भात कसे काम केले आहे, याचा दाखला दिला. मा. प्र-कुलगुरुंनी तपशिलवार उत्तर देताना पुढील काही मुद्दे मांडले. विद्यापीठाची पुनर्विकास योजना महामहिम राज्यपालांनी स्वतः भेट देवून लक्ष घालून पुढे आणली आहे. शासनाच्या प्रस्तावा व्यतिरिक्त इतर ही प्रस्ताव आलेले आहेत. विद्यापीठाची साधारणत: २४३ एकर जमीन असून ६७ इमारती आहेत. अलिकडेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन संस्थेचेही भूमीपूजन झालेले आहे. आपल्याकडे सरळ आणि सलग प्लॉट घेतला तर एकूण जमीनीमध्ये कुठेही सलग २.५ एकरच्यावर रिकामी जागा नाही. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे महामहिम राज्यपाल महोदयांकडे प्रस्ताव पुढील मार्गदर्शनासाठी पाठवावे लागले. एक स्वतंत्र प्रकल्प समिती मास्टर प्लॅनवर काम करत आहे. उपयुक्त जागा तशी कमी आहे त्यातून भविष्यातील योजनांसाठी जागा उपलब्ध करणे अवघड जाणार आहे. महामहिम राज्यपालांनी दिलेल्या उत्तरात पुनर्विकासावर भर देऊन त्यानंतर त्याचा विकास करणे शक्य होईल, असे स्पष्ट केले आहे. मा. प्रकुलगुरू यांनी त्यासाठी विविध सांख्यिकी तपशीलही दिले. मा.कुलगुरु यांनी विविध सदस्यांनी केलेल्या

चर्चेदरम्यान काही चुकीचे शब्दप्रयोग केल्याचे निदर्शनाला आणून देताना विद्यापीठ, शासन आणि मा. राज्यपाल हे तीन वेगवेगळे बिंदू आहेत परंतू ते एकमेकांपासून वेगळी नसून परस्पर पूरक आहेत. महामहिम राज्यपाल यांनी महाराष्ट्रातल्या सर्वच विद्यापीठांना जे पत्र पाठवले, त्याचाच हा भाग आहे त्यामध्ये विद्यापीठातल्या अतिक्रमणाचा मुद्दा समान आहे. आपल्याकडेही जागेच्या मागणी संदर्भात ८-१० पत्र आली आहेत. कायद्याप्रमाणे व्यवस्थापन परिषद किंवा मा. कुलगुरुंना याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार कुठेही दिसून येत नाही त्याचा अंतिम सल्ला हा महामहिम राज्यपालच देऊ शकतात, तेच अंतिम प्रमुख असतात. हे आपण समजून घेतले पाहिजे. अर्थात महामहिम राज्यपाल हे विद्यापीठाचे प्रमुख असले तरी सरकारचाही भाग आहेत, म्हणून त्यांनी विद्यापीठाचं जे स्वतःचं नियोजन आहे ते आधी होऊ दे, नंतर त्याचा विचार केला जाईल, असे स्पष्ट म्हटले आहे. कुठलाही प्रस्ताव फेटाळला गेला नाही. शासनाकडून स्पष्टपणे पाच एकरच्या जागेसंबंधी एकही पत्र आलेलं नाही शासन थेटपणे निर्णय घेऊ शकते. युवासेनेचेही पत्र मिळाले. सदस्यांच्या भावना संबंधितांपर्यंत पोचवल्या जातील असे सभागृहाला आश्वासन देतो. महामहिम राज्यपाल आणि विद्यापीठ प्रशासन एकत्र बसून निर्णय घेतील आणि चांगला तोडगा काढता येईल. संगीत क्षेत्रात आपल्याला प्रगती करायची आहे आणि त्यात संशोधनही झाले पाहिजे, असे माझे मत असून कुलगुरू हे कुठल्याही प्रकारचे राजकारण करत नाहीत हे कृपया समजून घेणे आवश्यक आहे. मा. मुख्यमंत्री आणि श्री. आदित्य ठाकरे साहेब यांनाही भेटण्याची वेळ मागीतली आहे. ते नक्कीच विद्यापीठाला सहकार्य करतील. आपण सर्वांनी एकत्र बसून प्रयत्न करूया, असे कुलगुरू महोदयांनी सर्वांना आवाहन केले. स्थगन प्रस्ताव मागे घेण्याचे विनंती केली असता श्री. प्रदीप सावंत यांनी कुलगुरुंनी प्रतिनिधी म्हणून महामहिम राज्यपालांना भेटून हे आधीच चर्चा करायला हवी होती. गेल्या २४ तारखेच्या पत्रातही याचा उल्लेख विद्यापीठाने केलेला नाही. या विषयावर स्पष्टपणे कोणीही बोलत नाही. शासन आणि महामहिम राज्यपाल यांच्यात निर्माण झालेल्या वादामध्ये विद्यापीठाने पडू नये, असे श्री. प्रदीप सावंत यांनी चर्चा करताना स्पष्ट केले. महामहिम राज्यपालांविषयी केलेल्या टिप्पणीत मा. कुलगुरुंनी नाराजी व्यक्त केली आणि शब्दप्रयोग जपून करण्याचे आवाहन केले. परंतु आपल्या मतावर ठाम राहून श्री. प्रदीप सावंत यांनी प्रस्ताव मागे घेण्यास नकार दिला. परंतु मा. कुलगुरुंनी पुन्हा महामहिम राज्यपालांशी झालेल्या पत्रव्यहाराची उजळणी केली आणि प्रत्रातल्या काही ओळीही उधृत केल्या आणि सांगितले की, २४ तारखेच्या पत्रामध्ये मंगेशकर कुटुंबियांबद्दल नाही तर आय.आय.टी. बॉंबे, मुंबई फुटबॉल असोशियशन, AFCT, MCA इ.चा उल्लेख आहे. हे स्पष्ट केले. त्यामुळे एखाद्या बाबतीत स्पष्टता नसेल तर राज्यपालांकडे जाण्यात काय चुकीचे आहे. तरीसुद्धा तुम्ही म्हणता त्याप्रमाणे त्यांच्याकडे पाठविले जाईल. मा. कुलगुरू यांनी महामहिम राज्यपालांशी तोंडी चर्चा केल्याचे सांगितले. परंतु त्यांना पत्र किंवा स्मरणपत्र देणे बरोबर नसते, असे सांगितले. स्थगन

प्रस्ताव मागे घेण्याबाबतचा संभ्रम कायम असतानाच श्री. धनेश सावंत आणि श्रीमती शितल देवरुखकर-शेठ यांनी विद्यापीठाची जमीन देण्याबाबत कुठल्या प्रक्रिया आहे. याची विचारणा केली. त्यांचा भर प्राधान्यक्रम कसा ठरविला जातो. सदर प्रस्तावाला समर्थनार्थ श्री. महादेव जगताप यांनीही आपले मत मांडले, डॉ. महादाप्पा गौंडा यांनी अध्यक्ष आणि बोलणा-या सदस्यांमध्ये विश्वासाचा अभाव दिसतो आहे, असे सांगून यावर खूप चर्चा झालेली असून कुठेतरी थांबणे आवश्यक आहे अशी अपेक्षा केली. सदर चर्चेत सहभागी होताना आक्षेप घेतला व आवाहन केले की 'प्रस्ताव फेटाळला' हा शब्द कामकाजातून वगळावा कारण महामहिम राज्यपालांनी असे काही केलेलेच नाही. शासनाने आपल्याकडे पत्रव्यवहार केला तसा त्यांनी महामहिम राज्यपालाकडेही पत्रव्यवहार करायला हवा होता आणि विद्यापीठाने यामध्ये समन्वयकाची भूमिका करायला हवी होती. म्हणून आता कृपया मा. कुलपतींची वेळ घ्यावी आणि हा विषय मार्गी लावावा. जर व्यवस्थापन परिषदेलाही जर निर्णय घेण्याचा अधिकार नसेल तर तोडगा कसा निघणार अशी शंका श्री. कोळंबेकर यांनी व्यक्त केली आणि विद्यापीठ प्रशासन यावर कसा उपाय शोधणार आहे, हे ही विचारले. श्री. प्रदिप सावंत यांनी सदर चर्चेत पुन्हा बोलताना सांगितले की, शासनाच्या असो की, विद्यापीठाच्या ज्या काही अटी/ शर्थी असतील त्या एकदा नक्की करा आणि महामहिम राज्यपालांना कळवा. श्री. धनेश सावंत यांनी विचारले की, केवळ जागा देण्याने मंगेशकर कुटुंबियांचा सन्मान होईल असे नाही, अजून काही केले पाहिजे. डॉ. अनुजा पळसुले देसाई यांनी संगीत महाविद्यालयासाठी प्रस्ताव आला तर त्याचे काही परवानगी किंवा शिफारशीचे काही नियम असतात, त्यावरही विचार करावा, असे मत व्यक्त केले.

मा. कुलगुरुंनी सर्व सदस्यांना सदर विषयावर भरपूर चर्चा झाली असल्या कारणाने ती थांबविण्याचे आवाहन केले आणि सोबतच महामहिम राज्यपालांनी पाठवलेल्या इंग्रजी पत्रातील काही वाक्ये वाचून दाखवली आणि महामहिम राज्यपालांनी प्रस्तावाच्या संदर्भात एखादा निर्णय घेण्यापूर्वी महामहिम राज्यपालांशी सल्ला-मसलत करून विधायक पद्धतीनेच निर्णय घ्यावा तोही विद्यापीठाच्या पुनर्विकास प्रकल्पाची पूर्तता झाल्यावर हे स्पष्ट केले आणि यामध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण करण्याचा प्रश्नच येत नाही. आपण काही प्रतिनिधींच्या समवेत महामहिम राज्यपालांशी भेट घेऊ असे अतिमतः स्पष्ट केले. आजच निर्णय दया असा आग्रह ॲड. वैभव थोरात व श्री. महादेव जगताप यांनी धरला. मुंबई विभागीय सहसंचालक डॉ. सोनाली रोडे यांनी यामध्ये सहभाग घेताना मध्यम मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विद्यापीठ प्रशासन आणि अधिसभा सदस्यांना उद्देशून सांगितले की, मंगेशकरांच्या वतीने अशी जागा मागितलेली नाही. सदर प्रस्ताव हा शासनाचा आहे. त्यासाठी सोमवारी मंत्री महोदय आले की, त्यांची वेळ घेऊन शिष्टमंडळासह भेटायला जाता येईल, असे शासनाच्यावतीने सांगितले. प्रदिर्घचर्चेनंतर मा. कुलगुरूनी प्रशासनाच्यावतीने तिथे जाऊन भेटायची तयारी दर्शवली. त्यावर श्री. सुधाकर तांबोळी यांनी कुलपतींसोबतची शिष्टमंडळाची भेटही नक्की करावी.

त्यावर मा. कुलगुरुंनी सदर प्रस्तावासाठी ज्यांना ज्यांना भेटणे आवश्यक असेल त्यांना भेटू, असे आश्वासन दिले. तरीही मंगेशकर महाविद्यालय होणार आहे किंवा नाही असा मागणीवजा प्रश्न ॲड. वैभव थोरात, श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ, श्री. महादेव जगताप, डॉ. सुप्रिया करंडे यांनी पुन्हा-पुन्हा विचारत राहिले. त्यामध्ये कला संचालनालयाकडून झालेल्या पत्रव्यवहाराचा तपशीलच डॉ. सुप्रिया करंडे यांनी सभागृहासमोर मांडला. कला संचालकांच्या पत्राला उत्तर न मिळाल्यामुळे शासनाने १९ मे, ला पत्र काढले त्यालासुद्धा उत्तर ऑक्टोबरमध्ये गेले आहे. तसेच प्र-कुलगुरू म्हणत आहेत की, सलग पाच एकर जागा देणे शक्य नाही. परंतु शासनाच्या निदर्शनास या गोष्टी आणून दिल्या असत्या तर आज या सगळ्या गोष्टींचा उहापोह झाला नसता. मा. अध्यक्षांनी यावर स्पष्टीकरण देताना म्हटले की, प्रस्ताव महामहिम राज्यपालांकडे पाठवला असून त्यांच्या कार्यालयातून उत्तर येण्यास उशीर झाला उत्तर आल्यानंतर आपण त्वरित तो राज्य शासनाकडे पाठवला. मा. अध्यक्षांनी सभागृहाला आश्वस्त केले की, दोन दिवसात शिक्षण मंत्र्यांची आपण भेट घेतो आणि सकारात्मक पद्धतीने या बाबीकडे लक्ष दिले जाईल. त्यावर सिनेट सदस्य प्रदीप सावंत, सौ. शितल देवरुखकर-शेठ, श्री. प्रविण पाटकर व डॉ. सुप्रिया करंडे यांनी सभागृहाला विनंती केली की प्रस्ताव आज अधिसभेमध्येच मान्य करून घ्यावा आणि त्यानंतर आपण शिक्षणमंत्र्यांची भेट घेऊ. मा. अध्यक्षांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, जागेच्या संदर्भात आपण व्यवस्थापन परिषदेमार्फत मा. कुलपतींना प्रस्तावासंदर्भात पत्र पाठवले आहे. त्यांचे उत्तर येईपर्यंत वाट बघणे गरजेचे आहे. त्यावर अधिसभा सदस्यांनी आग्रह धरला की, अधिसभेमध्ये हा प्रस्ताव मंजूर करून घ्यावा आणि पुढील कारवाईसाठी मान्यतेसाठी तो कुलपतीं कडे पाठवावा. शासनाच्या प्रतिनिधी सह-संचालक डॉ. सोनाली रोडे यांनीदेखील अध्यक्षांना विनंती केली की, मंगेशकर संगीत महाविद्यालयाला जागा देण्यासंदर्भात ना-हरकत प्रस्ताव अधिसभेमध्ये मान्य करून शासन दरबारी पाठवावा. मा. अध्यक्षांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, मा. कुलपतींकडून आलेल्या पत्रात असा उल्लेख केला आहे की, जागा देण्यासंदर्भातील सर्व निर्णय हे मा. कुलपती कार्यालयात विचारविनिमय करून पुढे कळवले जातील. त्यामुळे आपण जागेविषयी ना-हरकत प्रस्ताव या अधिसभेमध्ये चर्चेसाठी ठेवू शकत नाही. श्री. सुधाकर तांबोळी आणि डॉ. सुरेश मैद यांनी सभागृहासमोर मत ठेवताना सांगितले की, पूर्वी जागा देण्यासंदर्भात बऱ्याच चुका झाल्या आहेत. त्या आता अजिबात घडू नयेत, त्यामुळे या गोष्टीचा व्यवस्थित विचार करून निर्णय घ्यावा. प्रत्येकजण जागा मागेल तर काही दिवसांनी विद्यापीठाकडे जागा उरणार नाही असे मत श्री. सुधाकर तांबोळी यांनी व्यक्त केले. ॲड. नील हेळेकर यांनी आपले मत मांडताना सभागृहाला सांगितले की, दोन दिवसानंतर शिक्षण मंत्र्यांची आपण भेट घेणारच आहोत. त्यावेळी अधिसभेमधील प्रतिनिधी व अधिकारी यांनी चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा. परंतु जागा हस्तांतरण याविषयी प्रस्ताव हा कुलपतींच्या कार्यालयात प्रलंबित असताना आपण या ठिकाणी अधिसभेमध्ये

हा निर्णय घेऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी अध्यक्ष महोदयांना विनंती केली की हा प्रस्ताव याठिकाणी स्थगित करून सभागृहाचे पुढील कामकाज चालू करावे. खाली बसलेल्या अधिसभा सदस्यांनी प्रशासनाविरुद्ध घोषणा दिल्या. श्री. धनेश सावंत यांनी देखील ॲड. नील हेळेकरांच्या मताला दुजोरा देत अध्यक्ष महोदय यांना सांगितले की, आमचा विरोध मंगेशकर संगीत महाविद्यालयाला नसुन जागा हस्तांतरण करण्याच्या प्रक्रीयेसाठी आहे. सदर प्रस्तावाबाबत बराच वेळ झाला तरीही तोडगा निघत नसल्यामुळे मा. अध्यक्षांच्या परवानगीने पंधरा मिनिटांकरिता सभागृह तहकूब करण्यात आले. मा. अध्यक्षांनी पंधरा मिनिटानंतर सभागृहासमोर आपले निवेदन देताना सांगितले की, मंगेशकर कुटुंबाबद्दल आपणाला आदर आहे. मंगेशकर यांच्या नावाने जी संस्था होत आहे त्याला कोणाचाच विरोध नाही. मा. अध्यक्षांनी सभागृहासमोर प्रस्ताव ठेवला की, मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय हे कलिना उपपरिसराच्याच्या आवारात सुरू केले जाईल. परंतु मुंबई विद्यापीठाचे ते संचालित महाविद्यालय असेल आणि अशा स्वरूपातील प्रस्ताव आपण शिक्षण मंत्री यांचे कार्यालय तसेच कुलपती कार्यालयाला पाठवूया. अध्यक्ष महोदयांनी पुढे असेही नमूद केले की मुंबई विद्यापीठाचे मास्टर दिनानाथ मंगेशकर हे संचालित महाविद्यालय असल्यास आपली संगीताशी निगडीत जे विभाग आहेत ती विलीन करता येतील. तसेच संलग्न महाविद्यालयामधील प्राध्यापकांचीदेखील या महाविद्यालयासाठी नेमणूक करणे जास्त सोयिस्कर होईल. तसेच मुंबई विद्यापीठाच्या उप-परीसरामध्ये मुंबई विद्यापीठाचे संचालित महाविद्यालय असल्यामुळे त्याच्या प्रगतीकडे अधिक चांगल्या प्रकारे लक्ष देता येईल. अध्यक्ष महोदय यांनी आपली बाजू मांडताना पुढे असे म्हणाले की, सोमवारी होणाऱ्या शिक्षणमंत्र्यांच्या बैठकीमध्ये पुढील अटी आणि शर्ती याबद्दल चर्चा करू. श्री. सुधाकर तांबोळी, ॲड. नील हेळेकर तसेच श्री. धनेश सावंत यांनी अध्यक्षांच्या प्रस्तावाला दुजोरा देत संचालित महाविद्यालय हे जास्त सोयीचे कसे ठरेल याबद्दल आपापली मते मांडली. अध्यक्ष महोदयांनी श्री. प्रदीप सावंत यांना आपला स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची पुन्हा एकदा विनंती केली. त्यावर श्री. प्रदीप सावंत यांनी अध्यक्षांना सूचित केले की विद्यापीठामध्ये ज्या पद्धतीने अल्केश दिनेश मोदी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट तसेच गरवारे इन्स्टिट्यूट चालतात त्याच पद्धतीने त्याच धर्तीवर मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाची स्थापना करावी. सह-संचालक, उच्च शिक्षण संचलनालय यांनीदेखील याबाबतीत सकारात्मक भूमिका मांडताना म्हणाल्या की एस.एन.डी.टी. विद्यापीठांमध्ये देखील B.Ed. महाविद्यालये ही संचालित महाविद्यालये आहेत आणि त्याच धर्तीवर मुंबई विद्यापीठ हा प्रयोग करणार असेल तर मुंबई विद्यापीठाला ती अभिमानाची गोष्ट असेल आणि मास्टर दीनानाथ मंगेशकरांच्या स्मृतीसाठी हे एक चांगले संगीत महाविद्यालय मुंबई विद्यापीठ चालू करणार असेल तर अभिमानाची गोष्ट आहे, आणि त्यासाठी त्यांनी आपले अनुमोदनदेखील दिले. मा. अध्यक्षांनी आश्वस्त केल्यानंतर श्री.

प्रदीप सावंत यांनी मा. अध्यक्षांनी प्रस्ताव मागे घेण्याच्या विनंतीस मान देऊन त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

डॉ. गुलाबराव राजे यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. रविकांत सांगुर्डे यांनी अनुमोदन दिले.

### ४. स्थगन प्रस्ताव

*"That this meeting of the Senate of University of Mumbai be adjourned for ten minutes to express grave concern of the House at the gross violation of Maharashtra Public Universities' ACT 2016 and university statutes/norms as well as arbitrary and undemocratic functioning of the University administration, causing severe harassment of teachers with serious repercussions on academic and administrative functioning of University and affiliated colleges."*

डॉ. गुलाबराव राजे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव सभागृहापुढे मांडताना सांगितले की, महाराष्ट्र अधिनियम २०१६ आणि परिनियम यांची मोठ्या प्रमाणावर पायमल्ली होत असून शिक्षकांना होणारे त्रास यासंदर्भात मुंबई विद्यापीठातील आणि संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांचे प्रश्न या स्थगन प्रस्तावाद्वारे सभागृहासमोर मांडले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्याच्या कलम ९७ प्रमाणे महाविद्यालय विकास समिती स्थापन होत असते, परंतु अनेक महाविद्यालयात विद्यापीठ कायद्याचे उल्लंघन होत आहे. विद्यापीठाने सी.डी.सी.च्या गठनासाठी ६ पत्र पाठविली असताना ९०० महाविद्यालयांपैकी १६४ महाविद्यालयांनी म्हणजे केवळ १२% महाविद्यालयांनी त्याला प्रतिसाद दिला. जिल्हावार विचार केला तर रत्नागिरीतून आठ, रायगडमधून ८, आणि ठाण्यातून ३७ तर पालघरमधून १७ आणि उर्वरित ८३ महाविद्यालये मुंबईतली आहेत. माहिती पाठवितानाचा हा प्रतिसाद अतिशय निराशाजनक आहे, हे डॉ. गुलाबराव राजे यांनी तपशीलवार माहिती देऊन सांगताना सीडीसी संदर्भात अनेक मुद्दे उपस्थित करून मा. कुलगुरूंना सदर विषयाकडे गंभीरपणे लक्ष देण्याची विनंती केली. त्यामध्ये ज्या महाविद्यालयांनी नियमांचे उल्लंघन केलेले आहे अशा महाविद्यालयांवर कारवाई करण्याचे ठरलेले असताना तसे होत नाही हे लक्षात आणून दिले. डॉ. राजे यांनी भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेणचा विशेष उल्लेख करून त्या महाविद्यालयातील गैरप्रकारावर उच्चस्तरिय समिती स्थापन करावी आणि व्यवस्थापन समितीमध्येही त्याची चर्चा होऊन निर्णय घेतला जाईल असे आश्वासन दिले होते परंतू त्याची पूर्तता झालेली नसल्याचे सांगितले. आता याच सभागृहात समिती गठित करावी अशी मागणी करताना इतरही काही बाबी उपस्थित केल्या. प्राध्यापकांच्या पेंशनचा प्रश्नही गंभीरपणे घेणे आवश्यक असल्याचे डॉ. राजे यांनी तपशिलवार निवेदन करून विद्यापीठाला याबाबत शासनाकडे विनंती करण्याची मागणी केली. कॅसचा मुद्दा मांडताना डॉ. राजे यांनी प्राध्यापकांचे कॅसचे प्रस्ताव प्रलंबित ठेवतात असे सांगितले. डॉ. गुलाबराव राजे

यांच्या मताला समर्थन देताना, श्री. रविकांत सांगुर्डे यांनी देवगडच्या केळकर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यांच्या विरुद्ध समितिचा अहवाल असताना विद्यापीठाने त्याची दखल घेतली नाही आणि त्याचा कार्यतपास करून दोषींविरुद्ध कारवाई करावी आणि शिक्षकांविरुद्धचा अन्याय थांबवावा, अशी मागणी केली. त्याचप्रमाणे विविध महाविद्यालयांमध्ये प्रलंबित असलेल्या कॅसची प्रकरणे निकालात काढावीत आणि ज्या महाविद्यालयाने अशी प्रकरणे रखडवून ठेवली आहेत त्यांच्यावर कारवाई करावी, अशा प्रकारचे आश्वासन विद्यापीठाने द्यावे, असा आग्रह धरला. ॲड. निल हेळेकर यांनी श्री. सांगुर्डे यांच्या वक्तव्यावर भाष्य करताना, चौकशी समिती अहवाल देते, पुन्हा-पुन्हा चौकशी होते, परंतु कारवाईला विलंब होतो काही महाविद्यालये जाणीवपूर्वक असे करतात विद्यापीठाने कारवाई केली की विद्यार्थ्यांचेही काहीवेळा नुकसान होते. काही प्रकरणे उच्च-न्यायालयात प्रलंबित आहेत त्यासंदर्भात चर्चा करणे संयुक्तिक ठरणार नाही. अशा महाविद्यालयाच्या प्रश्नासंबंधी प्रशासनाच्या वतीने स्मरणपत्र पाठवावीत आणि प्रकरणांचा निपटारा करावा असे मत मांडले. डॉ. राजे यांनी सदर स्थगन प्रस्तावाला उद्देशून अन्य काही मुद्दे उपस्थित केले ज्यामध्ये तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांची होणारी हेळसांड, ज्यामध्ये कमी तासिका, कमी पगार विलंबाने मिळणारे मान्यतापत्रे, कमी कालावधीसाठीची नियुक्ती इ. अनुषंगिक मुद्देही उपस्थित केले आणि नवनियुक्त प्राध्यापकांना पूर्ण कार्यभार देण्यासंबंधी शासनाकडे मागणी करावी अशी उपस्थित शिक्षण सहसंचालकांकडेही मागणी केली. दरम्यान प्रा. डॉ. मृदुल निळे यांनीही स्थगन प्रस्तावातील प्रश्नांच्याबाबत काही समान मुद्दे विद्यापीठ विभागांमध्येही आहेत. विविध विभागातील संचालकांचा कार्यकाळ संपलेला असूनही अजून नियुक्त्या झालेल्या नाहीत, तसेच प्राध्यापकांच्या तदर्थ नियुक्त्या, स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या शिक्षकांचे प्रश्न असे अनेक प्रश्न आहेत त्यांचा निर्णय होत नाही अशी माहिती सभागृहासमोर मांडली. प्र-कुलगुरू उत्तर देण्यापूर्वी डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी उच्च-न्यायालयातील याचिकेच्या संदर्भातली वस्तुस्थिती विशद केली. तसेच अनुदानित महाविद्यालयातील शारिरिक शिक्षणासंदर्भात प्राध्यापकांच्या नियुक्त्या होणे शासनमान्यते नंतरही झालेले नाही, असा मुद्दाही उपस्थित केला. डॉ. राजे आणि डॉ. कुलकर्णी यांच्या स्थगन प्रस्तावातील समान मुद्दे वगळून वेगळे मुद्दे असतील तर मांडावेत, असे प्र-कुलगुरूंनी आवाहन केले. त्यावर डॉ. कुलकर्णी यांनी जिमखाना शुल्क विद्यापीठाने वाढवून दिलेली असल्याने या विभागामध्ये पदे भरण्याची प्रक्रिया शिक्षण सहसंचालकांनी करणे आवश्यक आहे असाही मुद्दा मांडला. प्र-कुलगुरुंनी यावर उत्तर देताना सांगितले की, डॉ. राजे यांनी ज्या गोष्टी उपस्थित केल्या त्या अतिशय गंभीर आहेत. कार्यवाही अहवाल जर पाहिला तर तुम्हाला दिसेल की, जर सी.डी.सी. स्थापन केली नाही, तर संलग्नतेवर त्याचा परिणाम होईल, अशी पत्र पाठविण्याची प्रक्रिया चालू आहे. आपण अकॅडेमिक ऑडिट पोर्टल सुरु केले आहे त्यामुळे आपल्याला सार्वजनिक प्रकटीकरण (पब्लीक डिस्क्लोजर) यंत्रणेद्वारे सी.डी.सी. संदर्भात व्यवस्थित माहिती मिळेल. महाविद्यालयांची संलग्नता वाढविताना

कर्मचाऱ्यांचे वेतन आणि सी.डी.सी. स्थापनेसंदर्भात प्रश्न विचारले जातात. एखादा अभ्यासक्रम बंद करण्यापूर्वी विद्यार्थी आणि तेथील शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावूनच आपण परवानगी देतो आणि कोणीही याचे उल्लंघन करतील त्यांच्यावर साहजिकच कारवाई होते. न्यायप्रविष्ठ प्रकरणावर चर्चा करणे बरोबर नाही. कोरोना काळात बरीच परिपत्रके निर्गमित केली आहेत आणि जिथे उपस्थिती आणि इतर प्रश्न आहेत तिथे संबधितांशी आम्ही प्रत्यक्ष संपर्क करून विषय निकाली काढण्याचा प्रयत्न केला गेला. निवृत्ती वेतनाचा प्रश्न शासन पातळीवरचा असला तरीही प्रशासकीय पातळीवर त्याला गती देण्याचे काम करत आहोत. देवगडच्या प्राचार्यांची मान्यता थांबिवली होती परंतू कर्मचा-यांच्या पगाराच्या प्रश्नांमुळे ती दिली गेली. उर्वरित प्राध्यापकांच्या प्रश्नांसंदर्भात संबंधित विभागाला सांगून तासिका तत्वावरच्या विद्यापीठ मान्यतेसंदर्भात जलदगती पद्धतीने काम सुरू केले आहे. शासनाच्या मान्यतेने विद्यापीठातील जागा भरल्या जातील. विविध प्रकारचे २०१७ पासून प्रलंबित असणारे अनेक प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. मा. कुलगुरूंनी "प्रशासनाच्या मदतीने झालेल्या प्रयत्नांचा उल्लेख करावा लागेल" अशा प्रकारची विस्तृत भूमिका मा. प्र-कुलगुरुंनी मांडली. कॅसच्या संदर्भातील प्रश्नांच्याबाबतीत लिखित स्वरुपाची माहिती देण्यास सांगितले. तसेच महाविद्यालये संदर्भात जाणीवपूर्वक दिरंगाई करतात त्यांच्यावर कारवाई करण्याचे आश्वासनही मा. प्र-कुलगुरूंनी दिले आणि डॉ. राजे आणि श्री. रविकांत सांगुर्डे यांना स्थगन प्रस्ताव मागे घेण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. अजय भामरे यांनी चर्चेमध्ये सहभाग नोंदवताना कुलगुरू प्रतिनिधी काही वेळा उपस्थित राहत नाहीत म्हणूनही अडचणी येतात. त्यामुळे आता असे होणार नाही याची विद्यापीठ काळजी घेईल, असे विद्यापीठाच्यावतीने आश्वासन दिले. डॉ. राजे यांनी १५ दिवसात काही विषयांवर निर्णय घेऊन प्रश्न सोडविल्याबद्दल आभारही व्यक्त केले. मा. प्र-कुलगुरुनी कॅसच्या बाबतीत अत्यंत गतीने काम सुरु आहे आणि गेल्या सहा महिन्यात ५०० च्या वर प्रकरणे निकालात काढली आहेत आणि ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठविले नाहीत त्यांची नांवे विद्यापीठ प्रशासनाला द्यावीत म्हणजे त्यावर निर्णय घेतला जाईल असे सांगितले. तर एल.आय.सी फॉर्ममध्ये आवश्यक तो बदल करण्याचेही आश्वासन मा. प्र-कुलगुरूंनी डॉ. राजे यांच्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये दिले त्यावर डॉ. राजे यांनी काही प्रलंबित प्रकरणे लेखी स्वरूपात देण्याची तयारी दर्शवून विद्यापीठाने यामध्ये गांभीर्याने लक्ष घालावे अशी विनंती केली आणि आपला स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस डॉ. अनंत लोखंडे यांनी अनुमोदन दिले.

<u>५. स्थगन प्रस्ताव</u>

*That this meeting of the Senate of University of Mumbai be adjourned for ten minutes to draw the attention of the House to the grave situation arising out of recent policy formulations,*

*inadequate infrastructure and insufficient funding in the midst of ongoing crisis of COVID 19 pandemic taking higher education beyond the reach of large sections of students as well as imminent closure of subjects in the jurisdiction of University of Mumbai.*

कोरोना संदर्भात घडलेल्या घटनांचा आढावा या विषयासंबंधी बोलताना डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी नमूद केले की, जेव्हा असा काही साथीचा रोग येतो त्यावेळी आपल्याकडे एक समर्थ यंत्रणा उभी करणे तसेच विविध विभागांमध्ये योग्य तो समन्वय साधणेही गरजेचे असते आणि अशा कार्यकाळात आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांच्याबाबतीत अगदी युद्धपातळीवर काम करण्याची गरज पडते. विद्यार्थी संख्या कमी होणे, अभ्यासक्रम बंद पडणे अशाही बाबी समोर आल्या आहेत, ज्यामध्ये चौफेर दृष्टीकोन ठेवून व्यापक स्वरूपाची मार्गदर्शकतत्वे तयार करण्याची गरज निर्माण होते. विद्यापीठाच्या परिपत्रकांच्याबाबतीत महाविद्यालयांनी आपापल्या परीने अर्थ काढला त्यामुळे त्याचे अर्थ वेगळे झाले महाविद्यालयांमध्ये कर्मचा-यांना कोरोनामुळे त्रास सहन करावा लागणाऱ्या कर्मचा-यांसाठी विशेष रजेची तरतूद करायला हवी. यासंदर्भातल्या सगळ्या गोष्टी विद्यापीठाला तपशिलवार सादर केल्या जातील. त्यासाठी विद्यापीठाने वेळ देऊन आमची बाजू ऐकून घ्यावी अशी. डॉ. कुलकर्णी यांनी विनंती केली. डॉ. अनंत लोखंडे यांनी अनुमोदन दिलेल्या सदर स्थगन प्रस्तावाच्या संदर्भ विविध महाविद्यालयांमध्ये केलेल्या सर्वेक्षणाचा आधार विद्याथ्यांची गळती कशी वाढलेली आहे हे निदर्शनास आणून दिले. कुडाळ महाविद्यालयामध्ये १०० च्याऐवेजी ३० विद्यार्थी असे प्रमाण कमी झाल्याचे उदाहरण देऊन इतर विद्याशाखांच्या बाबतीतही वेगळी स्थिती नाही, असे सांगितले. विद्यापीठाने नवीन ८४ महाविद्यालयांना परवानगी दिल्यामुळे ह्या समस्येमध्ये भरच पडणार असल्याचे सांगितले. ऑनलाईन वर्गांना ३०% च उपस्थिती असते कारण बऱ्याच विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे तांत्रिकदृष्ट्या कठिण जात आहे आणि त्याचा खर्चही बराच वाढला आहे. शासन स्तरावर काही उपाययोजना करता येतील का? असा प्रश्नही सभागृहासमोर उपस्थित करताना तासिका तत्वावरच्या नियुक्या होत नसल्याने ७०% विषयांचे वर्ग घेणे अडचणीचे झाल्याचेही निदर्शनास आणून दिले. त्यासाठी विद्यापीठाने ठोस धोरण आखून ह्या प्रश्नांची उकल करावी अशी विनंती केली. शेवटी डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी, कोविडसाथ, रोगप्रतिबंधक यंत्रणा, रोगप्रतिकारशक्ती त्यासाठी आवश्यक असणारी शारीरिक सुदृढता असे तदंनुषंगिक विषय सभेपुढे आणले आणि हे सर्व विद्यार्थ्यांच्या कसे हिताचे आहे हे तपशिलवार विवेचनातून प्रतिबिंबित केले. सदर स्थगन प्रस्तावावर बोलताना प्र-कुलगुरूंनी कोरोनाच्या आव्हानात्मक काळामध्ये अनेक समस्या आल्या, परंतू आपण हळू-हळू त्यामधून मुक्त होत आहोत. या कालवधीत कर्मचा-यांच्या बाबतीत काही प्रश्न उपस्थित झाले आहेत, काही शिक्षकांना त्रास झाला त्यांचे रजेच्या संदर्भातलेही काही प्रश्न निश्चितच आहेत.

प्र-कुलगुरूंनी यावर प्रतिपादन केले की, त्याच्या संदर्भातल्या विशेष रजेचा प्रश्न असेल, काही महाविद्यालयांमध्ये वेतनाबाबतचा प्रश्न असेल. इतर विद्यापीठांच्या तुलनेत विद्यापीठाचे ॲकॅडेमिक कॅलेंडर (शैक्षणिक दिनदर्शिका) खूप लवकर सुरू झालेले असून बऱ्यापैकी सुरळीत करण्याच्या स्थितीमध्ये आहोत. सुरुवातीला टाळेबंदी झाल्यानंतरच्या सत्रात चार महिन्याचे जे अध्ययन बुडाले व सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबरमध्ये परीक्षा घेतल्या, त्यामुळे मागचे शैक्षणिक वर्ष पूर्णपणे बाधित होते. आपण सगळ्यांनी वेळोवेळी सहकार्य केले. त्यामुळे आपले हे शैक्षणिक वेळापत्रक वेळेवर सुरू होत आहे. आपण म्हणाला होता की, यासंदर्भात आपल्या काही कल्पना आहेत, काही निरीक्षणे आहेत. त्यादृष्टीने मा. कुलगुरू यांनी आपल्याला काही वेळ देण्याचे मान्य केले आहे. नावनोंदणीचा विषय श्री. लोखंडे यांनी मांडलेला आहे. २०२१-२२ ची नावनोंदणी आधीच सूरू झाली आहे. तुम्ही सुर्वेक्षण केले ते मान्य, पण या बाबतीत शास्त्रीय विश्लेषण हवे. नावनोंदणीमध्ये नेमके सामाजिक विकास शिक्षणावरच्या नावनोंदणीवर झालेला परिणाम असेल किंवा त्या संदर्भातल्या गॅझेट्स नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर झालेला परिणाम, वेगवेगळ्या अध्यासनाच्या माध्यमातून जे 'स्टुडण्ट यूथ मुव्हमेंटशी' संबंधित आहेत त्यांच्यामार्फत ते सुरू करायला आधीच सांगितले आहे. डॉ. अनंत लोखंडे यांनी विचारले की, या कोरोना काळामध्ये अगोदरच पद भरतीला बंदी आहे. निदान सी.एच.बी. ची पदे भरायला हवी होती. रायगडमध्ये ८९ पदे रिक्त होती. त्यातील १० सी.एच.बी. भरली गेली. गेल्यावर्षी तिथे मुले काय शिकली? तेंव्हा प्र-कुलगुरू यांनी प्रतिपादन केले की, सी.एच.बी. बाबतीत प्रक्रियेचा विद्यापीठाचा भाग आपण सोपा करीत आहोत. शासनाच्या संदर्भात आम्ही काही निर्णय घेऊ शकत नाही. डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी मा. अध्यक्षांनी प्रस्ताव मागे घेण्याच्या विनंतीस मान देऊन डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

श्री. महादेव जगताप यांनी खालीलप्रमाणे त्यांचे स्थगन प्रस्ताव मांडले व त्यांस श्री. राजन कोळंबेकर यांनी अनुमोदन दिले.

<u>६. स्थगन प्रस्ताव</u>

*१) मुंबई विद्यापीठातील विविध विभागातील नाकर्तेपणा व प्रशासकीय गोंधळ, परस्परामध्ये समन्वयाचा अभाव आणि अकार्यक्षमता याबाबत स्थगन प्रस्ताव सादर करीत आहे.*

*२) मुंबई विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्रामधील अनागोंदी व भोंगळ कारभाराबाबत स्थगन प्रस्ताव सादर करीत आहे.*

श्री. महादेव जगताप यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडताना असे नमूद केले की, विद्यापीठ कुठल्याही प्रस्तावाला कार्यवाही अहवालामध्ये कुठलेही उत्तर देत नाही. त्याला श्री. राजन कोळंबेकर यांनी अनुमोदन दिले. श्री जगताप म्हणाले की आस्थापनामध्ये हंगामी कर्मचारी आहेत. त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन दिले

तरी त्यांचा प्रश्न सुटणार नाही. त्यांना समान काम, समान वेतन या नियमानुसार वेतन हवे. हंगामी कर्मचाऱ्यांमध्ये काही ठोक वेतनावर होते. ते न्यायालयात गेले. त्यांना रोजंदारीवर केले. हा कुठला न्याय? अशी त्यांनी विचारणा केली. त्याचप्रमाणे ते पुढे म्हणाले की, अनेक महाविद्यालयांनी सी.डी.सी. केलेली नाही. त्या लोकांना ॲडिशनल कोर्ससाठी २० टक्के वाढीव जागा देतो. या जागा देऊ नका. या महाविद्यालयांवर 'ॲडमिशन मॉनिटरिंग कमिटी' गेली पाहिजे. त्यांनी कशाप्रकारे प्रवेश प्रक्रिया केली याची चौकशी व्हायला हवी. काही महाविद्यालये लाखो रुपये घेतात, यांची चैकशी व्हायला हवी, याची त्यांनी मागणी केली. परीक्षा विभाग व एम.के.सी.एल. यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत ते पुढे म्हणाले की, महत्वाचा विषय परीक्षा विभागात इंजिनिरिंगचे निकाल लावताना परीक्षा विभाग एम.के.सी.एल.वर वारंवार चर्चा झाली. एम.के.सी.एल. मध्ये काय केले जाते? एम.के.सी.एल. चा एम.ओ.यू. झालेला आहे तो काय आहे? त्यांनी कुठली कामे करायची? आणि ते कुठली करतात? हा मोठा संशोधनाचा विषय आहे. एम.के.सी.एल.ची कामे सी.सी.एफ. ला करावी लागतात. कामे सी.सी.एफ. करणार आणि क्रेडिट एम.के.सी.एल.ला मिळणार, याकडे त्यांनी लक्ष वेधले. बार काऊंसिलची मान्यता घेताना जो स्टाफ तुम्ही दाखवला, तो तिथे आहे का? याची विचारणा केली. तसेच विद्यार्थी वाढवण्याच्या दृष्टीने फी कमी करण्याची मागणी त्यांनी केली. श्री. महादेव जगताप यांनी अशी विचारणा केले की, UMLA चा आणि ठाणे उप परिसराचा जर एकच अभ्यासक्रम आहे तर याला एक न्याय व त्याला एक न्याय असे का? त्याचप्रमाणे श्री. महादेव जगताप यांनी अशी विचारणा केली की, सलंग्नता शुल्क जमा न करता त्यांना परवानगी कशी दिली स्वायत्ततेसाठी? करोडो रुपये फी थकलेली असताना असे डोळे झाकून निर्णय कसे घेता? यावर प्रा. डॉ. अजय भामरे यांनी प्रतिपादन केले की, सलंग्नता शुल्क ज्या महावद्यालयांची बाकी असेल त्यांच्याकडून पूर्ण पुनर्प्राप्ती घेण्यात येईल. श्री. सुधाकर तांबोळी यांनी विचारले की, ज्यांना कंत्राट दिले आहे वसुलीचे त्यांनी किती पैसे कमावले? विद्यापीठाला एक दमडा तरी मिळाला का? त्यावर प्रा. डॉ. अजय भामरे म्हणाले की, त्या कंपनीला काम देणे बंद केले आहे. डॉ. सुप्रिया करंडे यांनी अशी विचारणा केली की, तुम्ही मान्य केले होते की, एम.के.सी.एल. ची बैठक आपण स्वतंत्र घेऊ या आणि त्या बैठकीला आम्हाला बोलावलेच नाही. त्यावर प्र-कुलगुरू यांनी बैठक बोलावण्याचे आश्वासन दिले. मा. प्र-कुलगुरू आणि प्रा. डॉ. अजय भामरे यांनी श्री. महादेव जगताप यांना त्यांचे स्थगन प्रस्ताव मागे घेण्यास विनंती केली असता, ८ दिवसांमध्ये सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासनाकडून मिळतील, अशी अशा बाळगून श्री. महादेव जगताप यांनी त्यांचे स्थगन प्रस्ताव मागे घेतले.

डॉ. धनराज कोहचाडे यांनी खालीलप्रमाणे त्यांचे स्थगन प्रस्ताव मांडले व त्यांस श्री. मिलिंद साटम यांनी अनुमोदन दिले.

## ७. स्थगन प्रस्ताव

*विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यावर होणारा अन्याय व विद्यापीठातील समस्या या विषयावर अधिसभेमध्ये मी स्थगन प्रास्ताव मांडतो आहे आणि सभागृह १० मिनिटांसाठी स्थगित कण्यात यावे.*

डॉ. धनराज कोहचाडे यांनी सांगितले की, विद्यापीठात वारंवार आम्ही ई-मेल, पत्रव्यवहार, फोन हे सगळे करत असतो. त्यात कुठल्याच प्रकारची दाद आम्हाला मिळत नाही. पी.एच.डी. च्या पेट रिझल्टची गोष्ट घ्या. आदल्या दिवशी कळते विद्यार्थी पास आहे. दुसऱ्या दिवशी तपासल्यावर कळते नापास आहे. हे काय आहे? मी तक्रार केली होती. विद्यार्थी विकास विभाग काही आर्थिक साहाय्य देतो. त्या निधीमधून विद्यार्थ्यांचे संशोधन चालू असते. अशी काही मदत नसेल तर विद्यार्थी त्यांचे लक्ष संशोधनावर कसे केंद्रित करू शकतील? डॉ. सुरेश मैंद यांनी सभागृहामध्ये पी.एचडी.च्या संदर्भात तीन मुद्दे मांडले. त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, सिनोप्सीस आणि व्हायवा या दोन्ही वेळेस दहा-दहा हजार रुपये शुल्क आकारण्यात येते. जेव्हा प्रशासनाकडून सांगितले गेले होते की, एकदाच शुल्क घेतले जाईल परंतु प्रत्यक्षात हे शुल्क दोन वेळा आकारण्यात येत आहे. दुसरा मुद्दा असा की, आपल्याकडे परदेशी विद्यार्थी संशोधनाकरिता येतात त्यासंदर्भात वि.सी.डी.मध्ये कुठलेही निर्देश नाहीत की त्यांनी पेट परीक्षा द्यायची का? आपण त्याकरीता कुठली वेगळी परीक्षा घेणार आहोत का? यासंदर्भात परीक्षा संचालक प्र-कुलगुरू यांच्याशीही संपर्क साधला होता. तिसरा मुद्दा असा आपल्याकडे जे बाहय परीक्षक म्हणून येतात त्यांना आपण पंधराशे रुपये इतके तुटपुंजे मानधन देतो. ॲड. वैभव थोरात यांनी डॉ. धनराज कोहचाडे यांच्या स्थगन प्रस्तावात दरम्यान सभागृहाच्या लक्षात आणून दिले की पेट परीक्षेचा निकाल लागला आणि त्यामध्ये गोंधळ उडाला ज्यांचा निकाल आज पास आहे तो उद्या नापास म्हणून जाहीर होतो. श्री. प्रदीप सावंत यांनी सभागृहासमोर एक बाब लक्षात आणून दिली की RUSA कडून एक करोड रुपयाचे स्कॅनिंग मशीन विद्यापीठाला मिळाले परंतु आजही स्कॅनर बंद आहे. २०१५ मध्ये स्कॅनर आला असून तो आजही वापरात नाही त्यावर प्र-कुलगुरू यांनी उत्तर दिले की स्कॅनर सॉफ्टवेअर विकत घेतला नसल्यामुळे तो स्कॅनर आजपर्यंत चालूच करू शकलो नाही तरी लवकरात लवकर सॉफ्टवेअरसाठी परचेस ऑर्डर देऊन एक दोन महिन्यात तो स्कॅनर चालू करता येईल. श्री. प्रदीप सावंत यांनी ऑनलाइन व्हेरिफिकेशन यासंदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित केला की, ऑनलाइन पडताळणीसाठी स्कॅनिंग ही प्रक्रिया लागणार आहे त्याच्यासाठी किती खर्च होतो. पडताळणीच्या माध्यमातून विद्यापीठ उत्पन्न वाढवू शकते. परंतु विद्यार्थ्यांकडून पडताळणीचे पैसे न घेता फक्त एम्प्लॉयर कडूनच पैसे घ्यावेत, अशी सूचना केली. तसेच श्री. प्रदीप सावंत यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, ट्रांस्क्रीप्ट तसेच मायग्रेशनच्यासाठी ५००/- रुपये लावताना देखील विचार-विनिमय केला गेला होता,

यावेळी ते वेरिफिकेशनच्या एजन्सीला २७५/- रुपये जर स्कॅनिंगसाठी देत असतील तर ते फारच जास्त आहेत. त्यामुळे व्हेरिफिकेशनच्या संबंधित जे कोणी व्यक्ती असतील त्यांना बोलावून याचे एक प्रेझेंटेशन देण्यात यावे, अशी विनंती त्यांनी सभागृहाला केली. त्यावर प्र-कुलगुरू पुढील आठवड्यातच त्यावर बैठक लावली जाईल, असे आश्वासन दिले. प्र कुलगुरू यांनी डॉ.धनराज कोहचाडे यांनी उपस्थित केलेल्या हिंदी विभागाच्या पी.एचडी.बद्दलची तक्रार विशेष कक्ष यांच्याकडे दिले आहे. डॉ. विनोद पाटील यांनी डॉ धनराज कोहचाडे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना माहिती दिली की २५ मार्च रोजी पेट परीक्षा झाली त्याचा निकाल १६ एप्रिल ला जाहीर झाला आहे. ७९ विषयात परीक्षा झाली होती त्यातील लॉ मधील उत्तरपत्रिकेत काही तांत्रिक चुकांमुळे निकाल लागल्यानंतर बऱ्याच विद्यार्थ्यांना नापास निकाल आला होता त्यात यावेळी विद्यार्थ्यांनी चौकशी केली व तात्काळ त्या विषयात लक्ष घातले आणि एजन्सीसोबत संपर्क केल्यानंतर लॉ विषयाच्या उत्तर-पुस्तिकेतील काही तांत्रिक अडचणीमुळे तसा निकाल लागला होता याची खात्री करुन घेतली आणि तत्काळ चा निकाल अपडेट केला. नापास झालेले काही विद्यार्थी पास झाले परंतु पास झालेला कुठलाही विद्यार्थी नंतर नापास म्हणून दाखविण्यात आला नाही. त्यावर डॉ. धनराज कोहचाडे यांनी आपले मत मांडताना नमूद केले की विभागांमध्ये विद्यार्थ्यांची तक्रार आली पण इतर विषयांच्या विद्यार्थ्यांबद्दलदेखील अशीच परिस्थिती असू शकते त्यामुळे सर्वच विषयांचा अहवाल मिळाला पाहिजे. त्यावर डॉ. विनोद पाटील यांनी उत्तर देताना सांगितले की, केवळ एका विषयाच्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी नव्हे तर इतर विषयांच्या विद्यार्थ्यांनीदेखील तक्रारी केल्या आणि त्याची दखल घेतली गेली आहे. डॉ. विनोद पाटील यांनी नमूद केले की, सर्व विषयांसाठी किती विद्यार्थी बसले त्यातील किती पास आणि किती नापास झाले याची माहिती आपणांस दिली जाईल. डॉ. धनराज कोहचाडे यांना माहिती देताना डॉ. विनोद पाटील यांनी सांगितले की, विलंब शुल्क दहा हजार रुपये बद्दल मुदतवाढ दिली गेली आहे. प्र-कुलगुरू यांनी पुढे असे देखील नमूद केले की अधिसभा ही दोन दिवस चालते त्यामुळे सगळ्यांनी सहकार्य करावे आणि तात्काळ प्रश्नांची विभागणी करून समित्या गठीत कराव्यात. प्रलंबित प्रश्नांचा तत्काळ निपटारा व्हावा, याकडे सर्वच विभाग प्रमुख आणि अधिकाऱ्यांनी लक्ष दिले पाहिजे. डॉ. धनराज कोहचाडे यांनी सिनॉपसिस फी कमी करण्याबद्दल प्रशासनाला सांगितले त्यावर मा. कुलगुरूंनी यावर चर्चा करू, परंतु पैशासंदर्भात विषय असल्यामुळे ताबडतोब कारवाई करून निर्णय देता येणार नाही, असे नमूद केले. डॉ. विनोद पाटील यांनी डॉ. धनराज कोहचाडे यांना आरक्षणाबद्दल माहिती देताना सांगितले की, पालघर जिल्ह्याचा स्वतंत्र उल्लेख महाराष्ट्र शासन निर्णयात आहे. त्याची विद्यापीठाच्या विशेष कक्षाकडून माहिती घेऊन काही सुधारणेची गरज असेल तर आपण तसे करू. डॉ. धनराज कोहचाडे यांनी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबद्दल तरतूद नाही विद्यापीठ तशी तरतूद करणार का? असे विचारले. प्र-कुलगुरू यांनी पुढील माहिती देताना नमूद केले की, यूजीसीकडून येणारी शिष्यवृत्ती

गेली दोन वर्ष बंद आहे त्या काळात विद्यापीठाने स्वतःच्या फंडातून त्याची पूर्तता केलेली आहे. त्यावर डॉ. धनराज कोहचाडे यांनी विनंती केली की, काही मागासवर्गीय विद्यार्थी जे संशोधन करतात पी.एचडी. करतात अशा मुलांसाठी काहीतरी तरतूद करावी. त्यावर प्र-कुलगुरू यांनी सकारात्मक उत्तर देऊन प्रस्ताव मागे घेण्याकरिता विनंती केली. श्रीमती शितल देवरुखकर-शेठ यांनी डॉ. धनराज कोहचाडे यांनी मांडलेल्या स्थगन प्रस्तावाला समर्थन देत विद्यार्थ्यांच्या बाजूने एक मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधून घेतले की विद्यापीठांमध्ये विद्यार्थी शुल्क भरत असतात परंतु विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मूलभूत सुविधा या अतिशय तुटपुंज्या आहेत. कलिना कॅम्पसमधील इंटरनेट आणि टेलिकॉमची दुरावस्था याचा त्यांनी उल्लेख केला. त्यावर प्रशासन कुठल्याही प्रकारची ठोस भूमिका घेत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. प्रभारी कुलसचिव यांनी याबाबत माहिती देताना श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ यांना सांगितले की, इंटरकॉम आणि टेलिफोन संदर्भात मार्च महिन्यापासून पाठपुरावा केला जात आहे. फोर्ट कार्यालयाचे इंटरकॉम सुरू झाले आहे. तसेच कलिना उपपरिसरामधील इंटरकॉम दुरुस्तीचे कामदेखील सुरु आहे. तसेच एम.टी.एन.एल. विविध अधिकाऱ्यांची ऑनलाईन सभादेखील झाल्या आहेत. त्यामुळे लवकरच यावर तोडगा निघेल, असे कुलसचिव यांनी आश्वस्त केले. श्रीमती शितल देवरुखकर-शेठ यांनी EPABX मशीन जे बंद आहे आणि ते नऊ लाखाला विद्यापीठाने खरेदी केले होते त्याबद्दल प्रश्न उपस्थित केला त्यावर कुलसचिव यांनी तांत्रिकदृष्ट्या ते वापरता येते का हे बघावे लागेल, अशी माहिती दिली. तसेच श्रीमती शितल देवरुखकर-शेठ यांनी मुद्दा उपस्थित केला की, एम.टी.एन.एल.ला जागा भाडेतत्त्वावर दिली त्याला बराच काळ लोटला परंतु त्याबद्दल नवीन करार झाला नाही. त्यावर माहिती देताना कुलसचिव म्हणाले की, त्याबद्दल नवीन करार करताना सर्व गोष्टी लक्षात घेण्यात येतील आणि त्याबद्दल माहिती दिली जाईल. मा. कुलगुरूंनी हस्तक्षेप करत कुलसचिव यांना निर्देश दिले की, यासंदर्भात आपल्या अधिकाऱ्यांकडून त्याची योग्य माहिती घेऊन आठवड्याभरात सौ. शितल देवरुखकर-शेठ यांना माहिती द्या. यानंतर डॉ. धनराज कोहचाडे यांनी कुलगुरूंच्या विनंतीला मान देऊन त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला. तसेच एक सूचना मांडली की, जमनालाल बजाज मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट मध्ये MMAS करिता एक अतिरिक्त तुकडी चालू करावी जेणेकरून अधिकाधिक विद्यार्थी त्या ठिकाणी प्रवेश घेऊ शकतील.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी खालीलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

<u>८. स्थगन प्रस्ताव</u>

*मुंबई विद्यापीठाला थांबलेला विकास/ परदेशी-व्यक्ती/ विद्यार्थी-मुंबई विद्यापीठ/ देशी-व्यक्ती विद्यार्थी-मुंबई विद्यापीठ/ इतर संस्था NGO/ कंपन्या/ दानशूर व्यक्ती (मा. विद्यार्थी मुंबई विद्यापीठ)*

*यांच्याकडून मिळालेल्या देणग्या स्वरुपात रक्कम/ जागा/ मुंबई विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय कन्वेन्शन सेंटर/ MMRDA मास्टर प्लान (आराखडा-विकास)/ शासनाकडून न मिळालेले थकीत वेतन/ पेन्शन/ मुंबई विद्यापीठातील सुरक्षा रक्षक कायम स्वरूपी न करणे तसेच वेतन निश्चित न करणे/ या विषयांबाबत मुंबई विद्यापीठाची उदासीनता/ विलंब याबाबत सभागृह १० मिनिटे तहकूब करावे.*

श्री. सुधाकर तांबोळी यांनी सदर प्रस्तावाबाबत नमूद केले की, मुंबई विद्यापीठाचे अनेक माजी विद्यार्थी, एन.जी.ओ. पैशाच्या स्वरूपाने किंवा जागेच्यारूपाने देणगी देत असतात हे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, माजी कुलगुरू राजन वेळुकर यांच्या काळात एका माजी विद्यार्थ्याने विद्यापीठाला दहा ते पंधरा कोटी देण्याचे आश्वासन दिले होते तशी घोषणादेखील अधिसभेत करण्यात आली होती. अधिवेशन केंद्राबाबत (convention centre) उभा करायचे ज्यात जवळपास पाच हजार लोक सामावून घेण्याची क्षमता असेल त्याचा खर्च अंदाजे शंभर कोटी इतका होता या रूपाने ३५ ते ४० कोटी तसेच शासनाकडून देखील काही रक्कम मान्य केली होती परंतु या अधिवेशन केंद्राबाबत (convention centre) आज पर्यंत काही काम होऊ शकले नाही. त्यावर माहिती मागितली होती की, कुठल्या लोकांकडून किती देणग्या मिळाल्या आहेत, त्यावर आजपर्यंत योग्य माहिती उपलब्ध झाली नाही, तसेच दादरमध्ये एका महिलेने एक जागा आपल्याला देणगी स्वरुपात दिली होती, ही जागा आपल्या ताब्यात आहे की नाही याची माहितीदेखील आपल्याकडे नाही यासंबंधी श्री. सुधाकर तांबोळी यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे सवाल केला. श्री. सुधाकर तांबोळी यांनी एम.एम.आर.डी.ए. मास्टर प्लानबद्दल विचारणा करता सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, मुंबई विद्यापीठातून बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्सकरिता तीस मीटर रुंदीचा मार्ग निघेल त्याकरिता एम.एम.आर.डी.ए. ला साधारणता मुंबई विद्यापीठाची ३४ हजार ७१५ स्क्वेअर मीटर एवढी जागा हस्तांतरित करण्याची मान्यता दिली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर त्यांना जागा दिली आहे, परंतु आजपर्यंत त्यांच्याकडून आपणाला कुठलाच मोबदला मिळाला नाही. एम.एम.आर.डी.ए.ने दोन ते तीन अंतर्गत रस्ते डागडुजी करून दिले एवढेच, पुढे नॅकसाठी वगैरे सर्व पैसा हा विद्यापीठाच्या तिजोरीतून खर्च झाला. एम.एम.आर.डी.ए. ला जागा दिली त्यावरील रस्ता आता पूर्ण होत आला आहे आणि तो आता सर्वांसाठी खुलादेखील होईल मग त्यानंतर एम.एम.आर.डी.ए. आपणाला दाद देईल का? असा प्रश्न त्यांनी अधिसभेत उपस्थित केला. प्रत्येक वेळेला माहिती घेतल्यावर एम.एम.आर.डी.ए.सोबत आपण बैठक घेत आहोत एवढेच प्रशासनाकडून सांगितले जाते. जर आज मेट्रोचा विकास जलद गतीने होत असेल तर विद्यापीठाचा का नाही? आपण मुख्यमंत्री महोदयांना भेटणे गरजेचे आहे. नवीन मुख्यमंत्री आल्यानंतर आपण त्यांची एकही भेट घेऊ शकलो नाही. विद्यापीठ आणि एम.एम.आर.डी.ए. मध्ये करार हा १२ मे, २०१६ रोजी झाला. आपली जागा दिल्यानंतर एम.एम.आर.डी.ए. यांनी आपणास सांगितले

होते की, जागेचा मोबदला हा पैशाचा स्वरूपात न देता टी.डी.आर.च्या माध्यमातून दिला जाईल शासन आपल्याकडे विविध गोष्टी मागत आहे. आपण त्याची जलद गतीने पूर्ततादेखील करत आहोत तरीदेखील आज चार वर्षांपासून यावर काही ठोस माहिती उपलब्ध होत नाही. तसेच मुंबई विद्यापीठातील सुरक्षारक्षकांबाबत बोलताना श्री. सुधाकर तांबोळी यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले की, १४० सुरक्षारक्षक हे हंगामी आहेत त्यापैकी काही सुरक्षारक्षक रोजंदारीवर काम करतात आणि आपल्या कर्मचाऱ्यांचा पगार ९०००/- आणि बाहेरून आयात केलेल्या सुरक्षारक्षकांना २५०००/- दोघांची कामे ही तर सारखीच आहेत असा दुजाभाव का करतो आहोत? श्री. सुधाकर तांबोळी यांनी पुढे अशी सूचनादेखील केली की, सुरक्षारक्षकांचा रोजंदारी हा शब्दच काढून त्याठिकाणी हंगामी हा शब्द वापरा जेणेकरून त्यांना विविध सुविधा मिळतील. तसेच त्यांनी प्रशासनाच्या लक्षात आणून दिले की, सुरक्षा रक्षकांसोबत वारंवार बैठका झाल्या हंगामी हा शब्द वापरला तर त्यात अडचण नाही रोजंदारी हा शब्दाचा इतिहास जमा झाला आहे. तसेच सुरक्षारक्षक आणि कंत्राटी कामगार त्यांच्या प्रश्नावर विशेष लक्ष देण्याची गरजदेखील त्यांनी नमूद करून त्यांनी लक्षात आणून दिले की, कामगार आयुक्तांच्या अधिपत्याखाली वेगवेगळ्या विभागात काम करणाऱ्या कामगारांचे दर निश्चित केले जातात. एकूण ६७ उद्योगांचे दर ठरलेले आहेत. त्यात कारखान्यात काम करणारे, चित्रपट निर्मिती, उद्योगात काम करणारे, दुकान आणि व्यापारी असतात. श्री. तांबोळी यांनी असे नमूद केले की, विद्यापीठात काम करणारे कामगार हे आयुक्तांनी दुकान व व्यापारी आस्थापन उद्योगात मोडत असून त्या पद्धतीने दर निश्चित केला आहे. परंतु हे सत्य नाही आपण शिक्षण क्षेत्रात काम करतो शिक्षण क्षेत्र हे काही दुकान नव्हे, त्यामुळे कामगार आयुक्त आणि मंत्री महोदय यांना विश्वासात घेऊन शिक्षण विभाग हा स्वतंत्र आहे आणि त्याकरिता स्वतंत्र दर निश्चित केले जावेत, जेणेकरून न्यायालयातदेखील हा प्रश्न लवकर सुटेल आणि कामगारांना त्यांचे योग्य वेतन मिळेल.

श्री. सुधाकर तांबोळी यांच्या स्थगन प्रस्तावाला समर्थन देताना श्री. प्रविण पाटकर यांनी सभागृहासमोर सुरक्षारक्षक आणि कंत्राटी कामगार यांचा प्रश्न मांडला. त्यांनी प्रशासनाला सांगितले की, आज एकीकडे आपण पंचवीस ते तीस कोटी चा फायदा होऊ शकतो असे बोलतो त्याच वेळी कामगार हे गेली अनेक वर्ष आठ ते नऊ हजार पगारावर काम करतात. एखादा माणूस वित्त व लेखा विभागामध्ये लाखो रुपयांचा घोटाळा करतो आणि दुसऱ्या बाजूला हे कामगार वर्षानुवर्षे अतिशय तुटपुंज्या पगारात आपले जीवन जगत आहेत. श्री. प्रविण पाटकर यांनी प्रशासनास इशारा दिला की, आता हृदय शून्य होऊन चालणार नाही. कंत्राटी कामगार आणि सुरक्षारक्षक यांना न्याय मिळाला नाही तर खूप मोठे आंदोलन घेण्यात येईल. डॉ. सुप्रिया करंडे यांनी या विषयात बोलताना सभागृहाच्या लक्षात आणून दिले की न्यायालयाने आदेश दिले होते की, समान काम समान वेतन करा त्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन न ठेवता विद्यापीठाने त्यामागे लाखो रुपये खर्च केले आहे.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी सभागृह समोर कंत्राटी कामगारांनी सुरक्षारक्षक यांच्याबद्दल माहिती देताना नमूद केले की, विद्यापीठात काम करताना गंभीर दुखापत झाली असताना एक रुपया देखील वैद्यकीय मोबदला दिलेला नाही. या मुलांना कुठल्याही प्रकारच्या सुविधा मिळत नाहीत मार्च २०२१ रोजी मंत्रीमहोदयांनी बैठक घेतली त्यात श्रीमती मनीषा कायंदे डॉ. विनोद पाटील तसेच कुलसचिवसुद्धा होते. मंत्री-महोदयांनी निर्णय दिला की, जरी न्यायालयीन प्रक्रिया चालू असेल तरी देखील बाकीचे फायदे हे मिळालेच पाहिजेत. विद्यापीठाच्या वकिलांचेदेखील तेच मत होते. तरीदेखील विद्यापीठ प्रशासनाकडून त्याबद्दल कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. किमान वेतनदेखील त्या मुलांना मिळत नाहीत तरी काम करीत आहेत. त्यांच्या वयाची चाळीशी आली यानंतर कुठेच नोकऱ्या मिळणार नाहीत. १४२ कोटी ठेवी, महागड्या गाड्या या सर्व गोष्टी चालू राहतील, परंतु आपण या मुलांना साधे दोन हजार रुपयेदेखील वाढवून देऊ शकलो नाही. आपण पी.एफ. चा दंड ३२ लाख रुपये भरला परंतु या मुलांचा पी.एफ. नाही भरू शकलो. निधीमधूनदेखील यांना कुठल्याही प्रकारची मदत आजपर्यंत मिळाली नाही. जादा वेळेचे पैसे फक्त दहा रुपये ते बारा रुपये प्रति तास एवढेच मिळतात आपणाला यांची काळजी आहे का? या मुलांकडे लक्ष द्यायला वेळ आहे का? असा सवाल डॉ. सुप्रिया करंडे यांनी सभागृहात मांडला त्यावर डॉ. संगीता पवार यांनीदेखील या विषयाला समर्थन देत सुरक्षारक्षकांच्या दुहेरी वेतना बद्दल खंत व्यक्त केली.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी प्रशासनास विचारले की, लसीकरणासाठी दोन-दोन वेळा पत्र देऊन देखील या मुलांच्या लसीकरणाची सोय करण्यात आली नाही. जेव्हा की कोरोनाच्या काळात कुलसचिव, उपकुलसचिव व अधिकारी वर्ग हजर असताना हीच मुले विद्यापीठात काम करून विद्यापीठाच्या प्रशासनाला मदत करीत होती त्यांना वैद्यकीय मोबदला (mediclaim) आपण दिलाच नाही. लसीकरणाची सोयदेखील उपलब्ध करू शकलो नाही. श्री. सुधाकर तांबोळी यांनी प्रशासनाला माहिती दिली की त्यांच्या मागण्यांबद्दल २५ ऑगस्टला कुलसचिव यांच्या नावाने एक पत्र दिले होते सप्टेंबर गेला. आज ऑक्टोबर आहे त्याला कुठलंही उत्तर दिलेलं नाही. एकाच प्रकारचे काम करणारे सुरक्षा रक्षक जे आठ ते दहा हजार पगार घेऊन घरी जातात आणि त्याच वेळी बाहेरून आयात केलेले सुरक्षारक्षक पंचवीस हजार पगार घेऊन जातात हा दुजाभाव नाही का? असा प्रश्न श्री. सुधाकर तांबोळी यांनी अध्यक्ष महोदयांना केला.

श्री. रविकांत सांगुर्डे यांनी अध्यक्ष महोदयांना विनंती केली की, आठ ते दहा हजारा मध्ये लाईट बिल, मुलांचे शिक्षण, प्रवासखर्च या सगळ्या गोष्टी शक्य होणार नाहीत त्यामुळे कमीत-कमी त्यांचा पगार १५०००/- करण्यात यावा त्यावर श्री. प्रविण पाटकर यांनी अध्यक्षांना विनंती केली की, कमीत कमी १८०००/- तरी पगार देण्यात यावा. श्री. प्रविण पाटकर यांनी अध्यक्ष महोदय यांच्या लक्षात आणून दिले की, या कर्मचाऱ्यांचे पगार कमी असल्यामुळे परिस्थिती अतिशय बिकट आणि हालाकीची आहे. त्यांचे शर्ट फाटलेले असतात चप्पल तुटलेली असते विद्यापीठाचा गणवेश नसतो.

विद्यापीठात येणारे विद्यार्थी या विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची हालत बघत असतात अशी खंत त्यांनी व्यक्त केली. कामगारांच्या प्रश्नांवर डॉ. सुप्रिया कारंडे, श्री. राजन कोळंबेकर, श्री. सुधाकर तांबोळी, डॉ. सुरेश मैंद, श्री. रविकांत सांगुर्डे, श्री. महादेव जगताप आक्रमक झाले. डॉ. सुरेश मैंद यांनी सांगितले किमान वेतन कायद्याप्रमाणे विद्यापीठ प्रशासनाने कामगारांना वेतन देणे भाग आहे. त्यावर श्री. महादेव जगताप म्हणाले समान काम समान वेतन या नियमाप्रमाणे कामगारांना वेतन मिळणे गरजेचे आहे. श्री. रविकांत सांगुर्डे यांनी प्रशासनाला जाब विचारला की, कामगार न्यायालयाचा निर्णय आणि उच्च न्यायालयाचा निर्णय झाला असताना आपण सर्वोच्च न्यायालयाकडे का जावे.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी प्रश्न केला की, आपल्याला जे पत्र आला आहे त्यावर आपण उत्तर दिले का आणि दिले असेल तर ते मलाही दाखवा. डॉ. सुप्रिया करंडे यांनी व्यवस्थापन परिषदेत हा निर्णय झाला असता समान काम समान वेतन तर ह्या अडचणी आल्या असत्या आणि व्यवस्थापन परिषद अशा प्रकारचा निर्णय घेऊ शकते याबद्दल त्या आग्रही होत्या. डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी सभागृहाला सूचित केले की, किमान वेतन कायदा आपल्याला पाळणे बंधनकारक आहे, त्याच्यामध्ये १४ हजार ६७८ रुपये हे किमान वेतन देणे भाग आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात आपण जे अपील केले आहेत ते मागील वेतनासंदर्भात आणि इतर गोष्टीसंदर्भात आहेत त्यांना काय पगार द्यावा त्याच्यावर नाही आणि तिसरी गोष्ट प्रसूती रजा बंधनकारक आहे तो मान्य होत नसेल आणि महिलावर्गाचा छळ होत असेल तर त्यासाठी अ-जामीनपात्र गुन्हा आणि शिक्षा सुद्धा आहे. डॉ. सुप्रिया करंडे यांनी प्रशासनास विनंती केली की, येणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये आपण किमान वेतनाचा निर्णय घ्यावा आणि मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणदेखील मागे घ्यावी. श्री. सुधाकर तांबोळी यांनी अध्यक्षांकडे मागणी केली की कामगार आयुक्तांनी व शिक्षणमंत्र्यांनी प्रत्येकाचे दर ठरवलेले आहेत त्यात शिक्षण विभाग समाविष्ट केला आहे का आणि केले असेल तर ते दाखवा.

कुलसचिव यांनी या सर्वांच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी सभागृहासमोर माहिती दिली की, मार्च २०२१ पासून जी काही प्रक्रिया आजपर्यंत झाली आहे त्यामध्ये सर्वप्रथम मार्च २०२१ मध्ये मा. शिक्षण मंत्री यांच्याकडे बैठक झाली होती. या प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्रीमहोदयांनी प्रशासनाला आदेश दिले तसेच कामगार आयुक्तांनी मंत्रालयातील संबंधित सर्व विभागांनासुद्धा निर्देश दिले समान काम समान वेतन या मुद्द्याअगोदर किमान वेतन दिले गेले पाहिजे. ही मंत्री महोदय यांची भूमिका आणि त्याच अनुषंगाने त्यांनी मंत्रालयाला सूचना दिल्या होत्या की, मुंबई विद्यापीठा व्यतिरिक्तदेखील महाराष्ट्रातील इतर सर्व विद्यापीठांमधील माहिती (data) मिळवा त्यांनादेखील याचा लाभ झाला पाहिजे आणि तसे आदेश निर्गमित करा त्यानुसार मुंबई विद्यापीठाला विभागाकडून आदेश अपेक्षित होते. सदर आदेश हे कामगार आयुक्त यांना दिले गेले. कामगार

आयुक्तांकडून विद्यापीठाला पत्र आले, हे पत्र फक्त मुंबई विद्यापीठासाठी लागू होते. महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांतकरीता नव्हते. कामगार आयुक्तांच्या पत्रांमध्ये असा उल्लेख आहे की, या अस्थायी कामगारांना दुकाने व व्यापारी अस्थापना यानुसार वेतन करावे. त्याबाबत मुंबई विद्यापीठाकडून तत्परतेने कामगार आयुक्तांकडे पत्रव्यवहार केला आणि शिक्षण क्षेत्राचा ६८ विभागात कुठेही उल्लेख केलेला नाही. दुकाने व व्यापारी अस्थापना मधील कामगार आणि विद्यापीठांमधील कामगार यांच्या कामाचे स्वरूप यात समानता नाही तसेच मुंबई विद्यापीठामध्ये एकूण ५१ वेगवेगळ्या प्रकारची पदे आहेत त्यात कोणाला कोणत्या प्रकारचे वेतन द्यावे यात कुठेही समानता नाही आहे. त्यानुषंगाने मुंबई विद्यापीठाने कामगार आयुक्त कार्यालयात पत्रव्यवहार केला. तसेच कामगार आयुक्त कार्यालयाला विनंती केली की मुंबई विद्यापीठ विभाग देखील त्या यादीमध्ये समाविष्ट करावा ज्याचा फायदा मुंबई विद्यापीठा व्यतिरिक्त महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांना देखील होईल कुलसचिव यांनी अधिसभा सदस्यांनादेखील विनंती केली की, आपण देखील याचा पाठपुरावा करून यात लक्ष घालावे जेणेकरून लवकरात लवकर कामगार आयुक्तांच्या यादीत मुंबई विद्यापीठ सामाविष्ट केले जाईल. श्री. प्रदीप सावंत यांनी प्रशासनाला सूचित केले की विद्यापीठाला स्वायत्तता आहे त्यामुळे वेतन निश्चिती करण्याकरिता शासन आपल्याला अडवणार नाही व्यवस्थापन परिषदेमध्ये निर्णय मान्य करून जर आपण उपकुलसचिव पदाला अतिरिक्त मानधन देऊ शकतो तर कुलगुरू महोदय यांच्या अधिकाराखाली आपण कामगारांचे वेतनदेखील वाढवू शकतो. डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी सभागृहाला माहिती करून दिली की, पेंढारकर महाविद्यालया विरुद्ध विद्यापीठ या प्रकरणामध्ये आपण कुठे बसतो ते पहावे. मा. उच्च न्यायालयाने आदेश दिला आहे उपदानासाठी औद्योगिक न्यायालय आदेश देऊ शकतो तर किमान वेतनासाठीसुद्धा देऊ शकणार त्याव्यतिरिक्त स्टॅण्डर्ड कोडमध्ये कोणाला किती पगार द्यावा हे देखील नमूद केलेलं आहे. श्री. सुधाकर तांबोळी यांनी, कर्मचाऱ्यांची कंत्राटी हंगामी सुरक्षा रक्षकांची आपल्या विद्यापीठाला आवश्यकता आहे की नाही ते सांगावे, असा सवाल केला विद्यापीठ त्यांच्याकडून काम करून घेते मग त्यांना जे वेतन देतो ते योग्य की अयोग्य असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यावर श्री. प्रवीण पाटकर यांनी अधिसभेपुढे मागणी केली की, उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करून मा. सर्वोच्च न्यायालयातील केस मागे घ्यावी आणि याबद्दल जोपर्यंत आश्वासन देत नाही आम्ही मागे हटणार नाही. मा. कुलगुरू यांनी संपूर्ण चर्चेअंती सभागृहाला आश्वस्त केलं की, लवकरच केवळ या एका विषयासाठी व्यवस्थापन परिषदेची सभा आयोजित करून त्यावर चर्चा करण्यात येईल. श्री. सुधाकर तांबोळी यांनी दिलेल्या उत्तराबद्दल कुलगुरूंचे धन्यवाद मानले. डॉ. संगीता पवार यांनी अध्यक्षांना लक्षात आणून दिले की, आता सर्व जणांना संपृक्तता (saturation) आले आहे परंतु वेळेचे व्यवस्थापन हे अध्यक्षांना जमले नाही त्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

मा. कुलगुरूंनी यावर खुलासा करत डॉ. संगीता पवार यांना सांगितले की, काही गोष्टी अशा असतात की सर्व वेळापत्रक कोलमडून जाते सर्वच प्रश्न हे तळमळीचे आहेत आता माझी कार्यकाळ संपत आहे आणि कुठेतरी असे होऊ नये की कुलगुरू काहीच लक्ष देत नाहीत जे पण शक्य आहे ते तळमळीने मी करतो आहे. यावर श्री. सुधाकर तांबोळी यांनी नमूद केले की, अध्यक्ष महोदय आपण ज्या तळमळीने बोलता आहात ते सर्व मान्य करून राहिलेल्या चार पाच मुद्द्यांवर कुलसचिव लवकरच उत्तरे देल्तील अशी अपेक्षा व्यक्त करत तसेच आपला शब्द अंतिम असे सांगत श्री. सुधाकर तांबोळी यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

बाब क्रमांक ५ रेकमेंडेशन फोर डिग्री पद्मभूषण उस्ताद झाकीर हुसेन ही बाब आधीसभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली त्यावर सर्व अधिसभा सदस्यांनी एकमताने मान्य केली.

बाब क्रमांक ६ विद्यापीठ वर्ष वृत्त २०१९-२० हा मसुदा अधिसभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला सदर बाब सर्व अधिसभा सदस्यांनी एकमताने मान्य केली.

बाब क्रमांक ७ गव्हर्निंग स्ट्रक्चर फॉर ऑटोनॉमस युनिव्हर्सिटी डिपार्टमेंटस सेंटरस स्कूल आणि इन्स्टिट्यूट सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली. यावर डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी प्रस्तावाच्या प्रती मिळाल्यानंतर आम्ही रिमार्क इनपुट्स आणि मॉडिफिकेशन ई-मेल द्वारे सादर करू असे कळवले. डॉ. सुरेश मैंद यांनीदेखील डॉ. कुलकर्णी यांच्या मताशी सहमत असल्याचे सांगितले. श्री. मिलिंद साटम यांनी गव्हर्निंग स्ट्रक्चर ई-मेल वर उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली.

कुलसचिव यांनी बाब क्रमांक ८ स्टॅटयूट फॉर अपॉइंटमेंट ऑफ हेड डायरेक्टर ऑफ युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट सेंटर स्कूल व बाब क्रमांक ९ स्टॅटयूट फॉर अनफेअर मीन्स इन एक्झामिनेशन सभेच्या मान्यतेसाठी सादर केल्या.

बाब क्रमांक ७, ८, ९ बाबत चर्चेनंतर असे ठरविण्यात आले की, बाब क्रमांक ७, ८, ९ पुढील आधिसेभेच्या बैठकीत मंजुरीसाठी ठेवण्यात यावेत.

श्री. रविकांत सांगुर्डे यांनी २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये काही पुर्ननियोजन (reappropriation) करावयाचे असेल तर त्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देऊया असा प्रस्ताव मांडला, त्यास प्रा. डॉ. अजय भामरे यांनी अनुमोदन दिले व सदर बाब अधिसभेने मंजूर केली.

प्र-कुलगुरू यांनी असे नमूद केले की, प्रश्नोत्तरांचे प्रश्न तसे लेखी स्वरूपात दिले आहेत पण त्या प्रश्नोत्तरात आपले बहुतेक सगळे प्रश्न स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून किंवा वेगवेगळ्या संदर्भातून आलेले आहेत, फक्त वेतनासंदर्भातील जी बाब आहे त्याबाबत DTE बैठक आयोजित केली आहे. श्री. राजन कोळंबेकर यांनी महामारी मध्ये दोन वर्ष घालविले आहे जवळ जवळ दीड वर्षानंतर अधिसभेची ऑफलाइन बैठक होत आहे तरी आमच्या सर्व सिनेट सदस्यांची विनंती आहे की किमान एक वर्षाची टर्म वाढवावी आणि त्यासाठी महामहिम राज्यपालांकडे सर्व अधिसभा सदस्यांमार्फत एक

प्रस्ताव सादर करावा अशी विनंती केली. त्यावर मा. कुलगुरूंनी अशा प्रकारचे निवेदन लिहून द्या, असे सदस्यांना सुचवले.

मा. कुलगुरूंनी अधिसभेला विनंती केली की, अधिसभा घेण्याची दोन दिवसांची परवानगी ही फक्त रात्री बारा वाजेपर्यंत होती आणि आता जवळ जवळ अर्धा तास अधिक वेळ ही सभा घेतली. त्यासंदर्भात महामहिम राज्यपाल महोदयांना अर्धा तास वाढल्या बद्दलची परवानगी घेतली जाईल. त्याला आपण आता मान्यता द्यावी सर्व अधिसभा सदस्यांनी ही विनंती एकमताने मान्य केली.

मा. अध्यक्षांनी सर्व उपस्थित सदस्यांचे सभेमध्ये सहभागी झाल्याबद्दल त्यांनी केलेल्या सर्व सहकार्याकरिता आभार मानून मुंबई विद्यापीठाच्या पुढील वाटचालीत सहकार्य तसेच सूचना करण्यासंबंधी आवाहन केले आणि सर्व सहकाऱ्यांप्रती आभार व्यक्त केले.

कुलसचिवांनी उपस्थित सन्माननीय सदस्यांचे, अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याकरिता आभार मानून, मा. अध्यक्षांच्या वतीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

कुलसचिव

प्र-कुलगुरु

कुलगुरू